
# पतीची निवड

लेखक
न. चि. केळकर




भरत नाट्य संशोधन मंदिर
N07126
क्र. नं. 9
६५
२६६
9902

# पतीची निवड

★

साहित्य सम्राटांच्या
पल्लेदार लेखणींतून
निघालेलें हें नाटक
प्रसंगनिष्ठ विनोदानें
चिक्कार भरलेलें आहे
मराठामोळा समा-
जांतील नायक —
नायिकांनीं केलेल्या
भाषिक व
प्रसंगनिष्ठ विनोदानें
वाचकांची भरपूर
करमणूक होईल.

★

साहित्य सम्राटांच्या
निर्याणानंतर प्रसिद्ध
होणारें पहिलेंच अप्रकाशित नाटक

सुनन्दा प्रकाशन १ लें

# पतीची निवड

( एक विनोदी सामाजिक प्रहसन )

लेखक

श्री. नरसिंह चिंतामण केळकर.

( प्रथमावृत्ति )

१९५०

किंमत दोन रुपये

# : या नाटकांतील पात्रें :

खंडेराव:—एका खेडेगांवांतील सुखवस्तु गृहस्थ
म्हाळसा:—खंडेरावांची द्वितीय पत्नी.
लंबोदर:—म्हाळसाबाईचा पूर्वपतीपासून झालेला मुलगा.
नीला:— म्हाळसाबाईच्या बहिणीची मुलगी.
मंजुळा:—म्हाळसा व खंडेरावांचें अपत्य.
सर चिंतामणराव:—खंडेरावांचे मित्र.
मुरलीधर:—सर चिंतामणरावांचें चिरंजीव व मंजुळेचा नियोजित वर
हातिसिंग:—मुरलीधराचा मित्र व नीलेचा प्रियकर.

चिंग्या वगैरे नोकर चाकर.

## : स्थळ :

खेडेगांवांतील पेशवाई थाटाचा वाडा : खेडेगांवांतील रस्ता:

## : काळ :

एका दुपारपासून दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत–चोवीस तास.

● ● ●

---

[ "पतीची निवड" या नाटकाचें यापुढील आवृत्यांचें पुनर्मुद्रण, भाषांतर, चित्रपट सिनेरिओ, यासंबंधीं सर्व हक्क श्री. काशिनाथ नरसिंह केळकर यांनीं आपणांकडे राखून ठेवले आहेत ]

---

★ ★ ★

—मुद्रक— व —प्रकाशक—

द. रा. कानेगांवकर,
एम्. ए.
प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस,
२५२, नारायण पेठ,
पुणें २.

द. रा. कानेगांवकर,
एम्. ए.,
सुनन्दा प्रकाशन
१९८।७, सदाशिव पेठ,
पुणें २.

# प्रस्तावना

ती० तात्यासाहेब केळकर यांनीं आलिकडे लिहिलेले पण त्यांच्या हयातींत प्रसिद्ध न झालेलें हें नाटक आज वाचकां-पुढें येत आहे. यांतील मध्यवर्ति कल्पना त्यांना एकाद्या इंग्रजी प्रहसनांवरून सुचली किंवा काय तें माहीत नांहीं. या नाटकांतील पात्रें मराठा समाजांतील असून, कांहीं पात्रांच्या तोंडची हुबेहुब कुणबाऊ भाषा, आणि प्रसंगनिष्ठ विनोद यांमुळें या नाट-काचा प्रयोग रंगभूमीवर केला तर तो हमखास रंगेल असें वाटतें. कदाचित् सरकारी धोरणास अनुसरून रंगावृत्तींत कांहीं फेरफारहि करावे लागतील. कसेंहि असलें तरी, मूळ लिखाणाप्रमाणें अक्षरशः हें नाटक आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

पुणें — काशिनाथ नरसिंह केळकर.

१५ जानेवारी, १९५०

## प्रकाशकाचें दोन शब्द

कै. तात्यासाहेब केळकरांचें हे अप्रकाशित लिखाण प्रसिद्ध करण्याचे केवळ योगायोगानेंच जमलें ! श्री बापूसाहेब केळकर यांची व माझी एरवींच गांठ झाली असतां त्यांनीं या पुस्तक प्रकाशनासंबंधानें सहजीं विचारलें व माझीही तात्यासाहेबांचें एकादें पुस्तक प्रसिद्ध करण्याची पूर्वीची सुप्त मनीषा हांकारून जागी झाली ! मीही ठरवलें न् बापूसाहेबांनीं त्वरा केली. अर्ध्या तासाच्या आंत सर्व ठरलें नी मी पुस्तक छापून प्रसिद्ध केलेलें आपण पाहातांच ! आजही संक्रांतीचा योग साधून हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. सुनन्दा प्रकाशनाचें हें पहिलें पुष्प म्हणून जनतेपुढें ठेवण्यांत मला अत्यानंद वाटत आहे.

या नाटकासंबंधीं मी जास्त काय लिहूं ? वाचक व टीकाकार ठरवितील. याच विषयावरचें दुसरें एक नाटक बाजारात आहेच, पण साहित्यसम्राटांच्या लेखणीनें या विषयाला नवीन रंग दिलेला यांत आढळेल व त्याच दृष्टीनें या नाटकाला महत्व आहे. आधींच मराठींत प्रसंगाधिष्ठित विनोदी नाटकें कमी, त्यांत या नाटकानें आणखी भर पडत आहे. थोडयाशा नेपथ्यविधींत हें नाटक बसवितां येण्यासारखें व सर्वांना सारखें खुलवीत ठेवणारें असें असल्यानें, मराठी रंगभूमीवर त्याचें स्वागत होईल अशी अपेक्षा आहे.

२५२ नारायण पेठ, पुणें २.
मकर संक्रमण १८७१

दत्तो रामचंद्र कानेगांवकर,
एम्. ए.

भरत नाट्य संशोधन मंदिर
११२, सदाशिव पेठ, पुणें २.

# पतीची निवड

## अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ खंडेराव किल्लेदारांचा वाडा : खंडेराव व म्हाळसाबाई ]

**म्हाळसा:**—जळलं मेलं. तुमचं सारं आपलं कांहीं तरीच जगावेगळं.

**खंडेराव:**—म्हणजे तें कसं काय म्हटलं? म्हाळसाबाईसाहेब?

**म्हाळसा:**—सदान् कदा या कुग्रामवस्तीशीं गांठ! इथंच काय असं डोकं धरून बसायचं वरसान् वरीस? सांगा बरं? किती वरसं झालीं? आपण पुण्यामुंबईला जाऊन?

**खंडेराव:**—फार नाहीं कांहीं! मंजुळेच्या लहानपणीं नव्हतों कां आपण तिला घेऊन गेलों पुण्याला? भय्यासाहेबांच्या घरच्या लग्नाला? तिथं आपण तो मीनाबाजार पाहिला! शेतकी-कॉलेजांतलं फुलांफळांचं प्रदर्शन पाहिलं! तुळशीबागेतल्या रामाचं दर्शन घेतलं! बंडगार्डनचा धबधबा पाहिला!

**म्हाळसा:**—म्हणजे त्याला थोडीं नाहीं—पुरीं दहा वर्षे झालीं! मंजुळा तेव्हां परकर नेशीत होती. आतां ती लग्नाला आली आहे. असेच कां इतर सारे लोक आपल्या सारखे खेडेगांवांत तोंड खुपसून बसतात दहा दहा वर्षे?

**खंडेराव**:—अहो बाईसाहेब, खेडेगांवांतलं सुख शहरगांवांत कां कधीं मिळणार आहे? इथं आपणांला दूधदुभतं भाजीपाला फळफळावळ हवी तितकी खायला मिळते. उलट त्या पुण्यामुंबईत कोण ती महागाई! इथं मीं मनांत आणलं तर दुधांत अंघोळ करीन. अन् पुण्यांत कोरं दूध रुपयाला पाऊण शेरहि मिळत नाहीं म्हणतात. इथं मनांत आणलं तर फुलांची शेजशय्या हांतरतां येईल. पुण्याला झेंडूच्या फुलाचं एक थोटुक सुद्धां देवाच्या माथ्यावर वहायला मिळायचं नाहीं हवं तेव्हां हुकुमी. म्हणे खेडेगांव अन् कुग्राम वस्ती. पुण्यामुंबईला जाऊन दुरून मोटारी धांवतांना पाहायच्या आणि अंगावर धुळ चिखल उडवून घ्यायचा, हेंच काय तें सुख!

**म्हाळसा**:—खेडेगांवांत राहिल्यानं खाऊनपिऊन रेड्यासारखं खूप माजतां येईल. पण अहाहा, शहरगांवच्या त्या झुळझुळीत सुधारणेच्या राहाणीत कितीपण सुख आहे? त्याची चव चाखायला. इथं मिळेल कां साऱ्या जन्मांत? असंच का राहायचं खेडवळासारखं नेहमीं? शहरगांवाला गेलं म्हणजे कीं नाहीं माणसाचे डोळे जरा मोठे होतात.

**खंडेराव**:—अग! त्या करतां तुला पुण्याला जायला नको. इथ दिवसांतनं तूं माझ्यावर दहादां रागावून डोळे वटारतेस. तेव्हां ते थोडे कां मोठे होतात?

**म्हाळसा**:—आपलेच स्नेही, महितराव आणि मैनाताई; वर्षातनं दोनदां तरी पुण्यामुंबईची फेरी करून येतातच!

**खंडेराव**:—होय कीं! तिथं जाऊन पांचशें रुपये कमीतकमी खर्च करतात. आणि बरोबर काय आणतात? नवे नवे ढंग आणि चोंचले. या खेडेगांवांत त्यांचे ते ढंग अन् त्यांचे ते ऐटदार पोषाख पाहून कौतुक करायला माणसं तरी कुठं आहेत—त्या योग्यतेची. आपण नटावं अन् आपलं आपलंच आरशांत पाहून घ्यावं अशी हौस फेडून घ्यावी लागती त्यांना. माझ्या लहानपणीं शहरगांवचा मूर्खपणा डांबरटपणा अन् व्यसन ही

मोठ्या शहरगांवांना चिकटुन राहत होतीं. तेंच बरं होतं. पण आतां तीं प्रवाशाच्या अंगाला गवती कुत्र्याप्रमाणं चिकटून आमच्या गांवठी जीवनांत प्रवेश करूं लागलीं आहेत. ते शहरी दुर्गुण शहरांनाच लखलाभ होवोत कसे ! पूर्वी ते गोगलगाईच्या पाठीवर बसून इकडं येत. तर आतां ते विंचवाच्या पाठीवर बसून तरातरा धांवत येऊं लागले आहेत. माझ्या तरुणपणचे दिवस कसे सुखाचे होते !

म्हाळसा:—पुरे झालं तुमच्या तरुणपणच्या दिवसांचं वर्णन. तें ऐकून माझे तर कान किटले. पुण्यामुंबईकडं कधीं जाणं नाहीं. कांहीं पहाणं नाहीं. कांहीं आणणं नाहीं. यामुळं आम्ही अगदीं आहों तसें आहों कोरडे शंख. हा आमचा वाडा जुना पेशवाई खरा, पण आतां त्याला पहा कसं अगदीं मोडकळीचं रूप आलं आहे. कुणी म्हणेल एखादा भटारखाना नाहीं तर खाणावळ. नाहीं तर धर्मशाळा. जरा तरी त्याची डागडुजी, थोडी रंगसफेती !

खंडेराव:—आणि तुम्हां बायकांना पुण्यामुंबईला नेऊन आणल्या म्हणजे मग वाड्याबरोबर सुरू होईल तुमच्या पेहरावाची डागडुगी आणि रंगसफेती. खांद्यांशीं चोळीच्या दोन टोकावर फुगे अन् बुरूज चढतील. आणि लिंगायती किंवा अग्नीहोत्री सकाळीं कपाळाला भस्माचे पट्टे लावतो तशी तुम्ही संध्याकाळीं गालांना पांढरी सुवासिक पूड फासूं लागाल.

म्हाळसा:—बरें कुणा सुधारलेल्या चार भल्या माणसांची गांठ पडावी मधून मधून, तर इथं या या खेडेगांवाला भेट द्यायला कोण येणार?

खंडेराव:—कां बरं ? हल्लीं ग्रामोद्योग, ग्रामसुधारणा करणारे परोपकारी तरुण येतातच कीं मधून मधून आपल्या घरीं !

म्हाळसा:—पण ते येतात ते कसे अगदीं खेडवळाहून अधिक खेडवळ दिसावे असे सजून !

खंडेराव.—बरोबरच आहे. मग दरबारी पोशाख घालून बूटसूट

चढवून यावं त्यांनीं ग्रामोद्योगाचं व्याख्यान तसे ते आले तर आपल्याला सध्यां ग्रामीण राहणीचा जो उपदेश करायला येणार, त्यावर आमचा विश्वास कसा बसेल ? मग ते आपल्या घरीं कसेहि वागोत.

**म्हाळसाः**—तसले पाहुणे हवेंत कुणाला इथं यायला ? यावे ते असलेच यावे कीं त्यांचं आम्हीं खेडवळांनीं नवीन कांहीं तरी शिकावं अन् सुधारावं. आम्ही आतां बायका मागतो तलमसुतांचीं पातळं आणि हे आम्हाला म्हणणार खादी गोणपाटाचीं ठाणं वापरा !

**खंडेरावः**—कां बरं ? दुसरेहि कांहीं पाहुणे येतातच कीं आमच्या घरीं मधून मधून ?

**म्हाळसाः**–म्हणजे ते हेच ना ? एकतारीवर भजन करणारे माळकरी ? कपाळावर मुद्रा छापणारे पुराणीक ? पंचाग सांगणारे कुडबुडे ज्योतिषी ? आणि फार तर ते मुद्दाम वांकडा रुमाल बांधणारे वेदांती ! ही मंडळी आली तर तुम्ही बसतां दिवसभर त्यांना घेऊन ब्रम्हज्ञानाच्या अन् परलोकांच्या गोष्टी बोलत. आज जिवंत जगांत काय चाललं आहे यांतली एक तरी गोष्ट येती का कधीं कानावर ?

**खंडरावः**—अग तुला माहीत नाहीं जगांत आज काय चाललं आहे ते ? उपासमारीच्या रडकथा, लूटमार, खून, दंगेधोपे आणि महायुद्ध. असल्या दुःखद भयंकर वार्ता ऐकून मन दुःखीच करून घ्यायचं कीं नाहीं ? त्या पेक्षां तें न ऐकलेलेंच बरें नव्हे कां ? वेदांताच्या देवादिकांच्या गोष्टी कानावर पडल्या तर घरच्या संसारांतल्या दुःखाचीहि आठवण क्षणभर बुजते !

**म्हाळसाः**—पुरे झाल्या त्या जुन्या भाकड कथा.

**खंडेरावः**—(हंसून) आणि मला तर सगळं कांहीं जुनं आवडतं ! म्हाळसाबाई, जुन खाणंपिणं, चालीरिती, जुन्या पुराणकथा, तेंच काय, पण नुसतीं म्हातारीं माणसं पाहिलीं तीं जुनीं म्हणून तरी मला प्रेम वाटतं. त्याचं हेंच प्रत्यंतर पाहाना ! ( तिचा हात धरतो ) तूंहि आतां म्हातारी

झाली आहेस. म्हणून तूंहि मला पूर्वींपेक्षां अधिक आवडूं लागली आहेस! तुझं म्हाळसा हें नांव जुन्याची आठवण करून देणारं म्हणूनच मीं ते लग्नांत ठेवलं. नाहीं तर नव्हती का दुसरी नव्या थाटाची किती तरी—

(येथें दहा पांच नव्या पद्धतीचीं नांवें देणें)

**म्हाळसा:**—तर तर! लग्नांत माझं नांव ठेवतांना मला कुणी विचारलं? विचारलं असतं म्हणजे म्हाळसा हें नांव ठेवूं नका असं मी सांगितलं असतं. पण जुनी चाल म्हणजे लग्नाच्या बायकोवर तिचं नांव ठेवण्यापासून शिरजोरी, अजून झालं तरी मी मंदा, माधुरी, मदालसा, असलंच एखादं छानदार नांव पसंत करीन. तुम्ही आपणांस्वतःवरून मला म्हातारी म्हणा हवी तर. पण मी तुमची दुसरेपणची बायको आहे हें विसरतां! विसांत वीस मिळवून सांगा—तितकंच माझं वय आहे. पसतीस म्हणजे कांहीं म्हातारी नव्हे.

**खंडेराव:**—(हंसून) विसांत वीस मिळविले म्हणजे पन्नास होतात ना? म्हातारी नाहीं तर काय?

**म्हाळसा:**—मला हिशेब येत नाहीं. पण असं पहा, माझ्या पहिल्या घरोब्याचं लग्न झालं त्याच वर्षीं मला माझा लंबोदर हा मुलगा झाला. आणि तो आज अवघा वीस वरसांचा आहे. मग बोला माझं वय किती तें?

**खंडेराव:**—अहो विधवेनें दुसरा घरोबा करायचा मनांत आणलं म्हणजे तिच्या वयांत आपोआपच दहा वर्षांचा वाढता प्रौढपणा येतो.

**खंडेराव:**—माझा मुलगा लंबोदर— अजून कायद्याप्रमाणं तो अज्ञानच आहे म्हणतात—इतका लहान.

**खंडेराव:**—कायद्याप्रमाणं कां? खराच तो अज्ञान आहे. आणि पुढंहि असा अज्ञानच राहणार. फक्त त्यांच्यांतली ज्ञानाची जागा खोडकरपणानं

भरून घेतली आहे इतकंच. त्या खोडकरपणाच्या गुणांत तो प्रौढांना, म्हाताऱ्यांनाहि मागं टाकील.

म्हाळसा:—नसेना कां त्याला ज्ञान कीं काय म्हणतात तें–शाळेंत शिकून येतं तें ! त्याच्या पहिल्या घरच्या बापानं त्याला खूप मिळकत ठेवली आहे. घरबसल्या महिना दीडशें रुपये येतात. जाईल त्याचा जन्म सुखांत हवा तसा–

खंडराव:—म्हणजे खोड्या करण्यांत–

म्हाळसा:—खोड्या कसल्या ? तो केवळ गमतीखातर विनोद करतो हो !

खंडेराव:—म्हणे विनोद. काल त्यानं मला डुलकी लागली असं पाहून माझी मोकळी सुटलेली शेंडी खुर्चीला मागं बांधून ठेवली. अन् मला शिंक येऊन मानेला हिसका बसला, तेव्हां या स्वारीची खोडी उमगली. अशीच बायका माणसांच्याहि तो खोड्या करतो.

म्हाळसा:—त्या काय ?

खंडेराव:—परवां त्यानं काय केलं माहीत आहे ? त्या पारूनं न्हातांना आपली चोळी काढून ठेवली होतीन् कट्ट्यावर, त्यांत खाजकुयली घालून ठेवलीन्. एक ना दोन. घरीं कुणी पाहुणा आला म्हणजे तो या खोडकर बाळाच्या तावडीतनं कसा एकदांचा सहीसलामत सुटून जातो ही काळजी करीत बसावं लागतं मला ! त्या हरदासबुवांच्या पडशींत बेडूकच भरून ठेवलेन् दहापांच. तो शाळेंत गेला असता तर त्याचा हा उनाडपणा थोडा कमी झाला असता. पण शाळेंत पाठवायला तुमची हरकत—

म्हाळसा:—तो बिचारा आजारी असतो ना. मग शाळेंत कसा जाणार ? आणि तो खोकतो कसा तो बघतांना ? त्याला क्षय होईल कीं काय अशी मला भीति वाटते.

खंडेराव:—ताडी, माडी, तंबाखू चुकून घशाखालीं गेली तर ठसका

लागून खोकला येणारच. पण तो फुप्फुसांतला क्षयाचा खोकला नव्हे कांहीं. दिवसेंदिवस अंगानं फुगत जाणं हें कांहीं क्षयाचं लक्षण नाहीं म्हणत कुणी. आणि बाब्या ओरडतो किती मोठ्यानं, कर्णा फुंकल्या सारखा. नाहीं तर गाढव ( लंबोधर येतो ) गर्जल्यासारखा !

**म्हाळसाः**—बाळ, लंबोधर ये की, बैस ना इथें जरा. घरांत बसावं थोडा वेळ स्वस्थ. यांच्या, माझ्या जवळ बसावं. कांहीं बोलावं सवरावं म्हणजे आम्हांला बरं वाटतं. ( लंबोधर कांहीं न बोलतां जाऊं लागतो )

**लंबोदरः**—छेः, इथं रिकामं बसायला मला मुळीच वेळ नाहीं. आज गांवदेवीचा उत्सव आहे. त्याची व्यवस्था मला करायची, पहायची आहे. माझी सोबतीमंडळी माझी वाट पाहात बसली असेल. तिकडे मला लवकर गेलं पाहिजे ना !

**खंडेरावः**—खरंच ! ताडीच्या गुत्त्याशेजारच्या अंधारखान्यांत मंडळी जमली असतील खरी ! देवीचं देऊळ राहिलं लांब.

**म्हाळसाः**—बाळ, जाऊं नको. थंडीचा पाहा कसा कडाखा पडला आहे तो. होऊं दे–त्या तुझ्या सोबत्यांची एक दिवस निराशा होऊं दे.

**लंबोः**—आई त्यांची निराशा होईलच, पण न गेलों तर माझीहि निराशा होईल त्याची काय वाट !

**म्हाळसाः**—( त्याचा हात धरून ) नाहीं मी जाऊं देणार तुला.

**लंबोदरः**—( हात जोरानं सोडवून घेऊन ) बघूं या कीं कुणाच्या अंगात जोर अधिक आहे तो.

( दोघेहि भांडत पडद्यांत जातात )

**खंडरावः**—जशी आई तसा मुलगा ! भली जोडी जमली आहे. पण हीं दोन माणसंच काय ? जिकडं पहावं तिकडं हें असं सारं विपरीतच दिसूं लागलं आहे. आतां ही आली. आमची मुलगी मंजुळा. आम्ही स्वतः शहरगांवीं जात नाहीं. पण इथं शाळा नाहीं म्हणून ठेवली होती हिला,

पुण्यास आपल्या आतेच्या घरीं, कांहीं दिवस शिकायला. पण तेवढ्यांत ती घेऊन आली आपल्याबरोबर सर्व सुधारणांची सोंगं( मंजुळा येते ) यावं यावं मंजुळाबाई. मी राजा नाहीं. पण तूं माझी मुलगी मात्र राजकुमारी-सारखी नटली आहेस खरी. काय हा रेशमी कपड्यांचा थाट! तलम कापड! पण त्याचंहि ओझं व्हावं इतकं नेसली आहेस भाराभर. अग जगांत किती माणसं कपडा नाहीं म्हणून उघडी राहतात. दुकानासमोर कशा रांगा लागतात. इकडं थोडें पहावं. सुधारत्या जगांतल्या पोशाखी लोकांच्या अंगावरच तसु तसुभर कापड कातरून घेतलं तर त्यानं नाग-ड्यांचं नागडेपण झांकून काढतां येईल. इतकी कापडाची खैरात तुम्ही करतां. काय म्हणावं तुम्हांला? बाकी माझी मंजुळा मोठी गुणाची आहे हो!

**मंजुळाः**—हं! बाबा बाबा, काय झाला आहे तुमचा आमचा करार? तो विसरलांत वाटतं. करार असा—

**खंडेरावः**—तो काय?

**मंजुळाः**—करार असा-सकाळीं मी लोकांच्या गांठी घ्यायला हिंडते तेव्हां आपल्या आवडीचा पोशाख करावा. आणि दुपारनंतर मीं तुम्हांला शेती बागायतींत मदत करायची, तेव्हां मी खेडवळ पोशाख करायचा. असा आपला करार आहे. आतां सकाळची वेळ आहे. दुपारची नाहीं.

**खंडेरावः**—पाहीन पाहीन बरं! आज संध्याकाळींच. तूं हा करार कसा काय पाळतेस तो?

**मंजुळाः**—( आश्चर्यानें ) म्हणजे काय?

**खंडेरावः**—त्याचं असं कीं माझा मित्र सर चिंतामण मारुळकर यांचा मुलगा मुरलीधर हा जांवई करावा असं मी मनांत योजलं आहे. पूर्वी पत्रव्यवहारहि झाला आहे. त्याप्रमाणं मुरलीधर बहुधा आज संध्याकाळींच आपल्या घरीं येईल. मग आपल्या करारप्रमाणें शेती बागाय-

तीच्या कामाचा पोशाख तूं अंगावर कसा काय घालशील तें पाहीन कीं !

( बापाच्या खांद्यांवर हात ठेवून लाडिकपणानं )

मंजुळा:—हें काय हो बाबा असं करतां ? मला यांतले कांहींच विचा-लंत नाहीं एवढं सुद्धां ! ठरवायच्या आधीं ? मग आज सध्याकाळच्या पोषाखाची अडचणच पडणार कीं ? पहा हो. मी मला आवडेल तसा पोषाख करीन. मग तुम्ही मला नांवं ठेवतां कामा नये. तसंच तुम्ही हे नवरदेव बोलावून आणणार, पण ते मला पसंत पडले नाहींत तर ? मग म्हणाल—त्यांचा अपमान झाला.

खंडेराव:—त्याची मला फारशी भीती नाहीं म्हणा. बरं पण या मुरलीधराचं नांव तूं पूर्वी ऐकलंच आहेस माझ्या तोंडून पुष्कळदां. त्याचा बाप सर चिंतामण मारुळकर माझा परम स्नेही. त्याचाच हा मुलगा स्वरूपसुंदर सद्गुणी आहे. समजूतदार तसाच विद्वत्तेच्या जोरावर मुंबईच्या सरकारी कचेरींत नोकरी मिळवील, नाहींतर पुण्याच्या एखाद्या कॉलेजचा प्रिन्सिपाल होईल असा उमदा आहे. पोरी, माझ्या मुलीकरितां मी असा तसा पाहिन कां भावी नवरदेव ? पण त्यांतूनहि अखेर पसंती तुझीच हां ! मी माझा आग्रह बिनकुल चालविणार नाहीं.

मंजुळा:—सांगा बरं पुन्हा एकदां—मगाशीं त्यांच्या विषयीं म्हणालांत तें.

खंडेराव:—अग मी खोटं कसं बोलेन ? तो सुन्दर, सद्गुणी विद्वान् शूर आणि श्रीमंत असाच आहे.

मंजुळा:—( लाजून ) मग मला तरी न आवडायला काय झालं ?

खंडेराव:—पण सगळं खरं सांगायचं तर त्याच्या अंगचा एक दोषहि सांगितला पाहिजे हां !

मंजुळा:—(भिवया चढवून) तो काय ?

**खंडेराव**—तो पराकाष्ठेचा भिडस्त, संकोची वृत्तीचा, अगदीं मुख-दुर्बळ म्हणतात तसा आहे.

**मंजुळाः**—हें नाहींबाई मला आवडायचं.

**खंडेरावः**—त्यांत काय झालं ?

**मंजुळाः**—संकोची वृत्तीचीं माणसं कुब्या मनाचीं असतात. ती नुसत्या शंकाकुशंका घेतात. आणि फिरून त्या शंकाकुशंका मनांतल्या मनांत ठेवतात. मला मोकळ्या मनाचं माणूस फार आवडतं. मग त्यानं फटकळपणानं शिवी दिली तरी एकवेळ चालेल. संशयखोर त्रिनबोल्या नवरा म्हणजे बायकोला तो एक गुप्त रोगच नव्हे काय ? " माझ्या विषयीं यांना मनांत काय वाटत असेल बरं ? " अशा चिंतेत नेहमीं चूर राहणं हें कुणाहि बायकोला सुखाचं कसं होईल ?

**खंडेराव**— मीं पूर्वी त्याला पाहिला तेव्हांच मला दिसलं कीं तो खरा विनयशील आहे. म्हणूनच थोडा लाजाळूहि आहे. प्रांजळ पण दुर्गुणी माणसांपेक्षां संकोचवृत्तीचा पण सद्गुणी बरा नव्हे का ? असेना मुखदुर्बळ ?

**मंजुळाः**— पण मुख दुर्बळपणामुळें स्त्रीपुरुषांच्या प्रेमळपणाच्या खेळी-मेळीवर थोंडं विरजण पडत नाहीं काय ? असो. पडतील जा मला पसंत !

**खंडेरावः**—(हंसून) पण मंजुळे, त्यानंच तुला पसंत नाहीं केलं तर ? मग कसं ? माझी मंजुळाहि सुंदर आहे. पण आवड द्वाड अशी म्हण आहे ना ?

**मंजुळाः**— कां हो बाबा अशी थट्टा करतां माझी उगीच ? आणि समजा, मीं त्यांना पसंत पडलें नाहीं तरी काय झालं ? माझं कांहीं काळीज फुटणार नाहीं त्यामुळं. मला फसविणारा आरसा फार तर मी फोडीन. मीहि स्वाभिमानी मुलगी आहे बाबा. अशी तशी नाहीं. आम्ही सुशिक्षित मुली आपापसांत म्हणतोंच थट्टेनं—कीं ' अग हा नाहीं तर दुसरा.'

खंडेराव—अग मला त्याची तशी भीति वाटतच नाहीं. पण—असो. जा तूं आतां. संध्याकाळीं पाहुणे येणार त्याकरितां त्यांच्यापुढें हजर राहून कामं कशीं नीट बिनबोभाट करावी याची थोडीशी तालीम मला घरच्या नोकरांना देऊन ठेवली पाहिजे. आमच्या घरीं फारसे कधीं पाहुणे येत नाहींत. यामुळें त्यांना तशी संवय नाहीं. म्हणून यजमान दक्ष असला तरी नोकर वेंधळे असले म्हणजे गोंधळ व्हायचाच. आणि आज पाहुणे यायचे ते आमची बायको म्हणाली त्याप्रमाणें हरदास पुराणिक, भिक्षुक असे नव्हेत नेहमीचे ! तर शहरीं विद्वान प्रतिष्ठित, श्रीमंत् आणि कदाचित भावी जांवई होणारे ! लष्कर भरतीत रंगरूट घेतले म्हणजे पहिल्या दिवशींच्या कवाइतीत राइट लेफ्ट करतांना त्यांची खूप फजिती होते म्हणतात, तशी व्हायची आमच्या घरच्या नोकर महाराजांची. आमची बायको आम्हांला गांवढळ म्हणते तें कांहीं खोटं नाहीं म्हणा पण स्वतः ती तरी गांवढळ कुठं. नाही ?

(जातो)

मंजुळा:—बाबांनीं सांगितलेली बातमी ऐकून माझं मन कसं अगदीं गोंधळून गेलं आहे. सुंदर, सद्गुणी, श्रीमान् हें सर्व ठीक आहे. पण लाजाळू, भिडस्त संकोची—हें नाहीं आपणाला आवडत. पण एकदां लग्न तर होऊं दे. मग त्यांचा भिडस्तपणा कितीसा टिकतो तें मी पाहून घेईन. पण मला आधीं प्रियकर जिंकायचा, तेव्हां मग नवरा शिकवून तयार करायचा. उमदा घोडा आधीं हस्तगत करावा, आणि मगच त्याची बूज काढून टाकायचा विचार करावा. ( नीला येते ) ये ये. नीले. आलीस बरंच झालं. बघ बरं नजर टाकून एकदां माझ्या चेहऱ्याकडं आणि सांग आज मी कशी काय दिसते आहे तें. ठीक दिसते आहे . कीं कांहीं बिघडलेलं दिसतं ?

नीला:—ठीक दिसतेस कीं ! तुला काय झालं आहे ? पण थांब हो. ( तिच्या हनुवटीला हात लावून ) फिरून एकदां पाहुं दे. आहे खरी तुझ्या चर्येत थोडीशी चलबिचल आहे. मग तुझ्या बंधुराजांनीं कांहीं खोडी

केली ? कीं वाचून खालीं ठेवलेली कादंबरी मनाला दुःख देणारी होती ? काय ?

मंजुळा:—तसलं कांहीं नाहीं. दुसरंच आहे कांहीं. हें पहा बाबांनीं योजलेले माझे नवरदेव आज संध्याकाळीं उतरायला आमच्या घरीं पाहुणे म्हणून यायचे आहेत ! त्यानं उरांत अगदीं धडकी भरली आहे. कसं काय निभावेल याचा धाक वाटूं लागला आहे.

नीला:—अस्सं. अन् त्या नवरदेवांचं नांव काय ?

मंजुळा: नागपूरच्या सर चिंतामण मारुळकरांचे चिरंजीव मुरलीधरपंत.

नीला:—अग बाई, काय योग पहा. म्हणजे मुरलीधरपंत हे माझ्या हातीसिंगांचे अगदीं जिवलग स्नेही आहेत. मला कांहीं तशी वर्दी नाहीं. पण ते दोघे मिळूनच येत आहेत कीं काय कुणाला ठाऊक ? तुम्ही आम्ही पुण्यास शिकत होतों तेव्हां आपण त्यांना पर्वतीला जाताना पाहिलेच आहेत कीं !

मंजुळा:—( विचार करून ) नाहीं. नीटसं लक्षांत येत नाहीं.

नीला:—हे मुरलीधरपंत थोडे चमत्कारिक आहेत म्हणे. संभावित स्त्रियांत मोठे भिडस्त, लाजाळू. पण म्हणे इतर प्रकार म्हणजे गांवढळ, बाजारी बायकांच्या संगतीत मोठे धीट आणि बोलके !

मंजुळा: अस्सं कां ? मग कसं निभणार गं ? आमचं कसं काय जुळणार ? बरं पाहून घेईन कसं काय होईल ते ! पण तुझं कसं काय ? आमच्या सावत्रआईसाहेब, म्हाळसाबाई साहेब, त्यांच्या मुलग्याला माझ्या सावत्रभावाला, लंबोदराला तुझ्या गळ्यांत बांधू पाहतात, त्यांचं काय ? तुला सून करून घेणार म्हणतात त्या. मग ?

नीला:—होयच ना ! पण खरं बोलायचं तर लंबोदरापेक्षां म्हाळसाबाईचाच त्रास मला अधिक होतो बघ. त्याच माझ्या अंगाला फार झटतात.

लंबोदर राहिला दूरच. त्यांच्या तोंडून लंबोदराचं गुणवर्णन ऐकणं म्हणजे तो एक कंटाळवाणा दूरचा प्रवास ठरतो. त्या राक्षसाला, माकडाला, देवासारखा भासवायचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला म्हणजे मला हंसवत नाहीं आणि गप्पहि बसवत नाहीं.

**मंजुळा:**—काय तरी बाई ! तुझ्या बापानं मरतांना तझी सारी मिळकत म्हाळसाबाईच्या स्वाधीन केली. आणि त्या मिळकतीबरोबर भाची म्हणून तुलाहि ती मिळकत आपल्या मुलाला, माझ्या सावत्र-भावाला लंबोदराला, मिळावी या हेतूनं आमच्या आईसाहेबांनीं ही खटपट चालविली आहे. पण स्वतः लंबोदराला हें आवडत नसावं बहुधा. तो बात्य खोडकर आहे. पण मनानं फार उमदा आहे. आईचं करणं त्याला तरी कुठं आवडतं आहे ?

**नीला:**—अगदीं बरोबर ! फार काय, तो आणि मी दोघं मिळूनच या संकटांतून एक विचारानं पार पडूं, असं मला वाटतं. तिला फसवायचा आम्ही दोघांनीं एक कटच केला आहे.

**मंजुळा:**— मौज आहे, कीं, तुझ्यासारखी मुलगी आणि तुझ्यासारखी संपत्ति—पण लंबोदर बाहेरून खोडकर तरी मनाचा खरा सज्जन आहे. म्हणूनच तुझं नुकसान करूं नये असं त्याला वाटत असावं. म्हणून मिळकत हातां येईपर्यंत तुम्हाला थोडं नाटक करावं लागेल. तरच आईसाहेब फसतील. मग ?

**नीला:**—तें करतां येईल कसं तरी. माझी मिळकत बहुतेक हिऱ्या मोत्यांच्या दागिन्यांची आहे. ती पेटी हातीं आली म्हणजे मिळविली. लंबोदरानं मला परवां गुप्तवचन दिलं आहे. तो म्हणाला, ' निलिटले, घाबरू नको. आईच्या कुलपांतली तुझ्या दागिन्यांची पेटी लवकरच तुझ्या स्वाधीन करीन. पण मग ते एकदां अंगभर घालून तूं मला दाखविले पाहिजेस ' एवढाच त्याला त्या दागिन्यांचा लाभ. कसा उदार उमदा आहे नाहीं ? ( जातात. )

# अंक १ ला

## प्रवेश २ रा

[ चावडीजवळील तालीम ]

**धाकू**—( प्रवेश करून ) अरे, लंबोदर, हे बाहेर कोण दोघे भले गृहस्थ आले आहेत! तुझ्याकडं नाहीं आणि माझ्याकडंहि नाहीं. पण भाड्याचा चारचाकी शिग्राम करून आले आहेत. त्यावरून ते कुणी श्रीमंत प्रवासी लांबून आलेले दिसतात. पण बहुधा ते वाट चुकले असावेत. अन् खंडेराव बागुल यांच्या घराचा पत्ता विचारत आहेत.

**लंबोदर**:—काय खंडेरावांचा पत्ता ? म्हणजे थेट आमच्याच घराचा पत्ता कीं! हं हं समजलों. मंजुळेला बघायला नागपूरचे कुणी मुरलीधरपंत आज आमच्या घरी यायचे आहेत. अस बाबांन बोलतांना ऐकलं होतं. खरं म्हणून वाटतं कीं हा तोच गृहस्थ असावा. बर गड्यांनों, हे कोण आलं आहे हे मीं पाहून येतो बाहेर जाऊन. तुम्ही जा तुर्त आंतल्या बाजूला.

[ मुरलीधर व हातीसिंग येतात ]

**मुरलीधर**:—कोण हा तापदायक प्रवास झाला. वाट चालतां चालतां कंटाळा आला. सांगणारानं सांगितलं कीं कुसगांव पुण्यापासून फक्त ४० मैल आहे. आणि मला तर वाटतं कीं काल आज मिळून आमची साठ मैलांवर मजल झाली असावी. शिग्रामवाल्यानं तरी कुठं कधीं हें कुसगांव पाहिलं होतं ? त्यानं ताशीं भाडं सांगितलं. आम्ही मूर्खांनीं तें कबूल केलं झालं. लागलों वाट चालायला अन् काय ?

हातिसिंगः—आणि, गड्या, तूंही असा मुखस्तंभ. तोंड उघडून वाट विचार म्हटलं तर तें स्वतः करीनास आणि मलाही पण करूं देईनास. चल पुढं, चल पुढं. म्हणत शिग्रामवाल्याला अनोळखी वाटेनं आपण पुढें दडपीत चाललों; बरं, तो बिचारा नाहीं कशाला म्हणेल? कारण तासावरी भाडं ठरलेलं.

मुरलीधरः—त्याचं असं आहे, हातिसिंग, वाटेच्या वाटसराला वाट विचारून त्याचे आपणांवर फुकट उपकार करून घेणं मला आवडत नाहीं. बर त्यानं माहिती दिली, अन् त्याला आपण पैसे दिले, तरी त्यानं दाखविलेली वाट, सांगितलेली माहिती, खरी कशावरून? बरं एकाद्याला वाट विचारली आणि त्यानं रागाऊन आपल्याला झिडकारल, तर त्याच्यावर आपणाला थोडाच हात उगारतां येतो? अपमान पदरांत घेवून मान खालीं घालावी लागायची ते कां करा?

हातिसिंगः–अरे वेड्या! पण अनोळखी मुलुखांत कुणाला तरी वाट विचारल्याशिवाय कसं निभणार? इथं भीड धरून उपयोगी नाहीं. वेळीं अपमानहि सोसलाच पाहिजे. नाहींतर मुक्काम गांठायचा कसा? ( इकडं तिकडं पाहून ) आतां इथं कुणी दिसत नाहीं. वाट तरी कुणाला विचारावी?

लंबोदरः—[ पुढं होऊन ] माफ करा हं सद्गृहस्थ, मी आपलं उगीच विचारतो· तुम्ही खंडेराव इनामदारांच्या घराची चौकशी करीत होता असं कोणससं म्हणालं. पण तुम्ही कोणत्या मुलखांत आलों हें आधीं तुम्हांला माहीत आहे कां?

हातिसिंगः–(हंसून) नाहीं बा, मुळींच नाहीं. ती माहिती तुम्ही सांगाल तर उपकार होतील?

लंबोदर—तुम्ही मागं टाकून आलां त्या गांवचं नांव काय? आणि पुढं जाऊं म्हणतां त्या गांवाचं नांव काय?

हातिसिंगः—ते आम्हांला कांहींच नीट सांगतां येत नाहीं बुवा. कृपा करून तुम्हीच सांगाना !

लंबोदरः तर मग मला तुम्हांला पहिलं हेंच सांगायचं आहे कीं तुम्ही आपली वाट चुकलां !

मुरलीधरः—वाहवा वाहवा ! काय हो आम्ही वाट चुकलों हें सांगायला तम्ही कशाला हवें ? हें आमचं आम्हांला कळतंच आहे कीं ?

लंबोदरः—बरं ! तुम्हीं माग गांव सोडला तो राहो. पण मुळांत कुठून आला त्या गांवचं नांव सांगा.

हातिसिंग.—( रागावून ) कोणत्या गांवाला जायचं हें कळायला कोणत्या गांवाहून आलों हें कळायला पाहिजे असं वाटत नाहीं.

लंबोदरः—भले गृहस्थ ! यांत रागवायला काय झालं ! तुम्ही एक प्रश्न विचारलां मीं एक उलट प्रश्न तुम्हांला विचारला, फार तर फिटासफीट झाली म्हणा. बरं हे तरी सांगा, मी म्हणतो तें. खरं आहे कीं नाहीं ? म्हणजे हा खंडेराव मोठा तिरसट गृहस्थ आहे. अगदीं सनातनी जुन्या वळणाचा. नुसता बुरसटलेला. तऱ्हेवाईक व लहरीहि तसाच. दिसण्यांत कुरुप. त्याला एक मुलगी आहे ती आहे अशीच हिकमती. आहे. उंच दिपमाळेसारखी. मोठी बोलकी, बोलभांड म्हणाना. आतां त्यांचा एक सावत्र मुलगा आहे. तो मात्र मोठा सुंदर आणि सज्जन आहे. तो सर्वांना प्रिय वाटतो.

हातिसिंगः-आम्हांला या कुटुंबांत या परस्पर नात्याचीं माणसं आहेत इतकंच माहित आहे. पण त्यांचे गुण दुर्गुण म्हणून जे तुम्ही वर्णन केले तें खरें खोटे म्हणण्याइतका त्यांचा आमचा पूर्वपरिचय नाहीं.

मुरलीधरः-नाहीं नाहीं, मला तुझ्याहून थोडी अधिक माहिती आहे. पण ती जरा वेगळी आहे. आणि ती अशी कीं ही मुलगी सुंदर

सुसंस्कृत संभावीत. म्हणजे तो हा मुलगा मात्र बोजड, कुरूप. वाईट स्वभावाचा, आईनं लाडावलेला असा आहे.

लंबोदर:—अस्सं कां ? तर मग मी सांगतों कीं तुम्ही वर्णन केलेल्या रूपगुणाची माणसं ज्या घरांत आहेत त्या घरीं तुम्ही आज रात्रीं पोचूं शकत नाहीं हें निश्चित.

हातासिंग:—म्हणजे पिडा झाली. पण कायहो सद्गृहस्थ, समजा, त्या माणसाचं आम्ही केलेलं वर्णन खोटं, आणि तुम्ही केलेलं वर्णन खरं, असं आम्हीं कबूल—हो क्षणभर कबूल केलं तर पोचूं कां हो त्या घरीं आज रात्रीं ? तसं होत असलं तर आम्ही तुमचं वर्णन मान्य करतो. आम्हांला काय ? रात्रीं मुक्कामाला पोहोंचल्याशीं गांठ.

लंबोदर:—बरं बरं. मी त्या गांवची, त्या घराची वाट सांगतों. पण ती फार वाईट आहे. जातांना खांच खळगे किती, चिखल किती ! कुंपण किती ! अंधार तर फारच. कारण दोहों अंगं झाडी. आणि त्यांतूनहि वाटेंत धोका. चिंग्या, सांग रे बाबा, यांना वाट, कुसगांवच्या खंडेराव इनामदारांच्या घराची ( डोळ्यांनीं 'सांगूं नको' म्हणून खुणावतो ) ते खंडेराव म्हणजे—दलदलीचे ते—खोल खड्डे—वलांडून टाळून दूर गेल्यावर लागतो ना—त्या वाड्याचे मालक ते—

चिंग्या:—व्हय का ? तर पाव्हणं तुम्ही लईच वाट चुकलां जी ! म्हंजी असं कीं, हतं यायला वाटंत तुम्हाला टेकडी लागली ना, अर्धा कोस मागं ? हंग तिथंच तुम्ही बगा डाव्या हाताला वळायला पाहिजे होतं. ते नं वळतां तुम्ही उजव्या हातच्या वाटेला लागला बघा. इकतीच चूक झाली जणुं.

हातासिंग:—( हंसून ) चूक थोडीच म्हणायची ! डाव्या ऐवजी उजवं इतकंच !

चिंग्या:—म्हंजी असं बगा, डाव्या हाताकडं टेकडीच्या पायथ्याशीं

वळला असतां, म्हंजी एक नांगरठीचं रान लागलं असतं. तें तुडवून गेल्यावर एक वढा लागला असता. व ओढा ओलांडल्यावर मग पाऊल वाटा फुटलेला चौक लागतो.

**लंबोदरः**—हां ! हां ! पण चार रस्ते लागले तरी त्यांतला एकच घ्यायचा बरं कां ?

**मुरलीधरः**—बरेच गमत्ये दिसतां कीं !

**चिंग्याः**—मग थोड पुढं गेल्यावर मसणवट लागती. ती वलांडून गेला कीं, एक मळलेलीच पण गाडीवाट लागेल. मग जा कीं थेट नाका-समोर. मग पिराचा मांगर लागेल. मग पहिली डावी, मग तिसरी उजवी, अन् दुसरी डावी घेतली कीं एक दळणाची गिरण लागल. तिथून पुढं गेलांत कीं खंडेरावांचा वाडाच बघा नेमका. हाय काय आणि न्हाइ काय !

**हातिसिंगः**—( हंसून ) कायरे, मुरलीधर लहानपणीं शाळेंत भूगोल शिकतांना आपणांला पृथ्वीच्या पाठीवरचे अक्षांश रेखांश शिकवीत असत, आठवतात कां ? तेवढेच सांगायचे आतां उरलेले दिसतात ( चिंतापूर्वक ) पण आतां काय करायचं ? काय हो ? या शेजारच्या घरांत रात्रीपुरती सोय होईल कां आम्हां दोघांची ? गाडीवाला गाडींत निजेल रात्रभर कसातरी—पण आमची वाट ?

**चिंग्याः**—व्हईल कीं. एक रिकामा बिछाना हंतरी वजा गवसंल कीं या घरीं. आम्ही तीन खुर्च्या हारीनं मांडून त्यावर एक फळी आडवी टाकली की व्हईल तयार दुसरा बिछाना बी !

**लंबोदर**—पण कायरे ? आधींच आणखी तिघे उतारूच इथं येऊन बसले आहेत. त्यांची वाट ?

**चिंग्याः**—हां पर, हे सरदार सात्र सैपाक घरांत चुलीपाशी तुरमुंडी देऊन पडल्याल तर व्हईल की सोय ? उशाला पाटा वरवंटा देतां यईल.

लंबोदरः—ते जाउं दे. पण रातोरातची सोय चांगली म्हणायची तर एक मैलावर एका जुन्या वाड्यात खाणावळ आहे, तिच्यांत होईल सोय. मग उद्यां सबंध दिवस आहेच तुमच्या पुढं वाट चालायला.

चिंग्याः—( लंबोधराच्या कानांत कुजबुजतो )

लंबोदरः—बरोबर. तोच वाडा. तीच खाणावळ ! तिथपर्यंतची वाट मात्र अगदी सरळ आहे. जा तिथवर अन् सपाटून हांका मारा म्हणजे दार उघडतील.

मुरलीधरः—चला, रात्रीपुरती सोय झाली पुरे. उद्यां पुढं पाहतां येईल. पण असं सरळ गेलं म्हणजे चुकणार नाहींना ?

लंबोदरः—पर एक मात्र सांगतो तें ध्यानांत धरा नीट.

हातिसिंगः—तें काय ?

लंबोदरः—या खाणावळीचा मालक झाला आहे श्रीमंत. म्हणून तो हा धंदा सोडायच्या विचारांत आहे. म्हणून तो खाणावळवाल्यासारखा न वागतां तुमच्याशी बरोबरीच्या नात्यानेंन वागायला लागेल. आस्थेवाईक यजमानाप्रमाणं तुमच्या पाठीशीं चिकटून राहील. आपल्या घराण्याच्या मोठेपणाच्या गोष्टी कंटाळा येईतों सांगत बसेल, त्याला कंटाळू नका.

चिंग्याः—मातर खाणावळींतलं जेवण, बैठक, हांतरूण, पांघरूण लई झकास.

हातिसिंग—जाउं दे हो. तेवढं आम्हांला पुरे. मग मालक कशा कां असेना !

मुरलीधर—मग काय उजव्या हाताला वळून नाकासमोर जायचं एवढंच ना ? ठीक आहे. कोचमन, चल हांकाल गाडी.

लंबोदरः—छेः छेः असं कसं होईल ? चिंग्या, लेका, हो पुढं आणि लाव यांना वाटेला. नीट वाट दाखवून दे. चुकूं नको. अरे असे मातबर

शहरवाले दूरचे पाव्हणे वाट चुकून आले, डोईवर रात्र आली. त्यांना वाट दाखविलीच पाहिजे. थोडे श्रम पडले तरी चालतील.

( चिंग्याबरोबर मुरलीधर व हातिसिंग जातात )

चिंग्याः–काय रे लेका लंब्या ? काय मनांत तरी काय आणलं आहेस ? खंडेरावांचं घर म्हणजे तुझंच घर ! त्या घरचे पाहुणे म्हणून हे गृहस्थ आलेले दिसतात. आणि तूं तर त्यांची समजूत करून दिलीस की ती खाणावळ म्हणून ! ती समजूत पटून ते तिकडं जाणार. आणि मग— ?

लंबोदरः–मग काय ? होईल कीं थोडी गंमत अन् काय ? ती पहायला जातोंच कीं, त्यांच्या मागनं आपल्याला काय ? कुचेष्टा केली. दिवसाचं काम झालं. आमच्या घरीं तरी काय सारीं माणसं तिस्मारखान. ते बाबा तसेंच, आणि ती आई तशीच.आणि ती मंजुळा अन् नीला. त्यांना वाटतं आपण पेशवाईतले सरदार आहों. उतरेल डोळ्यावरची धुंदी–दुसरं काय ? ( जातात )

• • •

# अंक १ ला

## प्रवेश ३ रा

[ खंडेरावांचा वाडा, खंडेराव व तीन चार नोकर येतात ]

खंडेरावः– हं समजलंना रे नीट ? आज तीन दिवस पढवितो आहे ते ? नामांकित पाहुणे येणार आहेत आणि त्यांना असं दिसायला हवं कीं अशा पाहुण्यांची बरदास्त ठेवणं ही गोष्ट या नोकरांच्या अगदीं संवयीची आहे.

सगळे नोकर:—व्हय कीं, आम्ही समंद अक्षी नीट करूं बगा, सांगाल तसं.

खंडेराव: म्हणजे पहिलं असं, कीं, सगळ्या नोकरांना जागा नेमून दिल्यासारखं, त्यांनी ठीकठिकाणीं नीट उभं राहिलं पाहिजे. नाहींतर हिकडून तिकडून आंत घुसायचं, उगीच तोंड दाखिवलंसं करून निघून जायचं असं करूं नका. नाहींतर उंदीर बिळातनं बाहेर पडून माणूस दिसतांच इकडून तिकडं पळत जातात आणि बिळांत शिरतात असं करूं नका.

सगळे नोकर:—छे छे, असं कसं होईल धनीसाब! अगदीं खांबासारखे उभे राहूं जागचे जागीं.

खंडेराव—( निराशेनं ) झालं, अरे मूर्खांनो ! अगदीं खांबासारखे उभे राहूनही चालणार नाहीं. हांक मारली, खूण केली कीं जागा सोडून पुढं यायला पाहिजे. जी म्हटलं पाहिजे. 'काय धनी'? असं विचारलं पाहिजे. घरचे उभे खांब कांहीं असं करीत नाहींत.

सगळे नोकर:—मग धनी आमासनी एकेकाच्या जागा ठरवून द्या कीं, म्हणजी आम्ही त्या संभाळूं.

खंडेराव—ठीक आहे. दिग्या, तूं त्या कोपऱ्यांत टेबलाशीं उभं राहायचं. त्या टेबलावर खाण्यापिण्याचे पदार्थ ठेवलेले असतील. पण तिकडं लक्ष नाहीं असं तूं दाखविलं पाहिजे. गोठ्यांतल्या सारखं तिथं घसमुसळेपणानें वागायचं नाहीं. आणि, राम्या, तूं रे. माझ्या खुर्चीमागें हातावर हात घेऊन नीट उभं राहायचं. हात खिशांत घालून ठेवायचे नाहींत. कधीं नव्हे, तो खिसेवाला डगला तुला दिला आहे त्याची अपूर्वाई वाटून तूं आपला खिशांतच हात घालून बसलास. बाहेर काढ तें पाहूं. हात मोकळे असल्याशिवाय त्यांच्याकडनं काम कसं होईल? पण लक्षांत ठेव, कीं, तूं पाहुण्यासमोर असलास म्हणजे नांगरांचं सगळं काम विसरून जायला

पाहिजे. नाहींतर बैलांना हांकल्यासारखं तोंडातून शब्द काढशील. चाबूक मारल्यासारखा हात उगारशील. पण तसं नाहीं चालायचं हं, राम्या, ते पहा दिग्यानं आपले हात कसे नीट ठेवले आहेत. पण तितकेही ताठ नकोत; थोडे ढिले ठेव.

**दिग्या**:—त्याचं असं. धनी, मी लष्कारांत होतो तवा कवाइतीवर जात होतो ना! तवा शिकलो मी असं ताठ हात धरायला. मी ते जरा सैल ठेवले कीं कवाईत शिकवणारा नाईक हातांतल्या काठीनं तडाखा द्यायचा बगा—

**खंडेराव**:—समजलं समजलं तुझं कारण, पण बोलतोस किती? तुझं सगळं लक्ष पाहुण्याकडं पाहिजे. आणि तोंड कसं वासराला मुसक घातल्या-सारखं हंव. अगदीं मिटलेलं. आम्ही पाहुणे मंडळी खाऊं पिऊं तिकडं आपलं लक्षच नाहीं असं दाखविलं पाहिजे.

**दिग्या**:—तेवढं मात्र, धनी, कठीण कीं! दुसऱ्याला खातांना बघितलं कीं माझ्यातर पोटांत भूक उठती अन् गोड गोड पदार्थ बघितलं कीं तोंडाला पाणी सुटतं.

**खंडेराव**:—अरे लेका, तसं व्हायचंच. पण मग फावल्या वेळा स्वयं-पाक घरांत जाऊन बधडावंना! भूक भागायला, तोंडचं पाणी आटायला, या दिवाणखान्यांतच खाल्लं प्यालं पाहिजे असं नाहीं. ते तिकडे स्वयंपाक घरांत केलं तरी एकच. आणि हें बघ, दिग्या, मी आमचे पाहुणे केव्हां कांहीं गमतीचंही बोलूं. थट्टा मस्करीही करूं. पण तुम्ही नोकरांनीं तें ऐकून हंसायचं नसतं. नाहींतर, लेकांनो, जसे तुम्ही आमच्यांतले समजून मजा वाटून खो खो हंसत सुटायचे.

**दिग्या**:—धनी पन् एक करा बगा. अन् त्या कानफाट्या गोसा-व्याची गोष्ट तेवढी मातर सांगू नका. आपण ती गोष्ट रोज कुणाला तरी

सागतां. अन् ती ऐकून रोज मी हंसतो. संवयच लागली आहे मला–ती गोष्ट ऐकून हंसायची ! पाहुण्यांना सांगितली तर मला हसूं येणारच बगा.

**खंडेराव:**—तूं म्हणतोस ते खरं आहे दिग्या, ती गोष्ट ऐकून हंसूं न येईल तर तो माणूस कांय ? पण असं आहे, घरीं पाहुणे आले परके म्हणजे थोडं संभाळलंच पाहिजे नोकरानीं. आपणच आपले असतो, तेव्हां गोष्ट वेगळी. हंसण्यानं दुर्लक्ष होतं कामाकडं–म्हणून हं. राम्या, आतां बघ नीट समज कीं, मी सरबताचा पेला मागतो आहे, बरं का तर तूं काय करशील रे ?

**राम्या:**—असं परभारं म्हणून कस चालंल धनी ? पाहुण्यापुढं आपण बोलाल, मागाल, थेट तसं बोला कीं म्हणजे दावतो मी काय करीन ते.

**खंडेराव:**—असं कां ? बरं तर. " कोण आहे रे तिकडं. जा आणि सरबताचे चार पेले घेऊन ये पाहूं " ( किंचित् थांबून ) काय रे लेकाच्यांनो, तुम्ही कुणीच जागेवरनं हालत नाहीं कीं ! मग पेले कसे येणार ?

**राम्या:**—आपण हुकूम केला खरा धनी. पण दिग्या पडलाना नाईक आमचा; असलं सरबताचं पेलं आणायचं जोखमीचं काम, त्याला त्याचाच हात लागायला व्हवा.

**दिग्या:**—अरे व्हय् लेका, मी नाईक तुमचा. पण धन्यांनीं आतां इतक्यांतच सरबताचे पेले आणायचं काम कुणाला शिकवलंरे, मला कां तुला. ?

**नोकर:**—हं हुकूम ऐकला मी धन्याचा. पण माझी जागा सोडून कसं मी हालावं ?

**नोकर३ :**—आन् तें तर काम मला सांगितल्यालंच नाहीं.

**नोकर ४ :**—अन् त्ये काम तर माझं नाहींच नाहीं. मी हा कपडा घेऊन कुठं सांडल सवरलं पुसायचं, इतकच माझं काम.

**खंडेराव:**—[ कपाळाला हात लावून ] झालं ' ही माझी जागा

नव्हे, हे माझं काम नव्हे ' असं तुम्ही करीत बसलां म्हणजे पाहु-ण्यानीं काय शंख करावा ? उपाशी मरण्याची पाळी तुमच्यावर यायची. हे पहा तुम्ही अधीक समजुतीनं वागलं पाहिजे. आणि काम ओळ-खून नीट केलं पाहिजे. एका ऐवजीं दुसऱ्यानं केलं तरी चालतं. मात्र दोघे तिघे एकदम एकाच कामाला हात घालाल, तर गोंधळ होईल. लक्षांत ठेवा. पण मी तुम्हांला तरी कसा बोल लावूं ? कुणी नांगर टाकून आला, कुणी मांगर टाकून आला, कुणी मोट सोडून आला, कुणी गोट सोडून आला. अशांना दिवाणखान्यांतली नाजुक कामं कशी पार पाडतां येतील ? पण कसं तरी करून हे पाहुणे निघून जाईपर्यंत चार दिवस निभावून नेलं पाहिजे खरं. बाळून चालून ठोंब्याशीं गांठ ! [ बाहेर गाडीचा आवाज ऐकूं येतो. ] अरे, पाहुण्यांची गाडी अंगणांत आलीच वाटतं ! पळा पळा, लेकांनों आपापल्या जागांवर आणि कामावर. त्यांना घरांत आणायला मलाच गेलं पाहिजे. [ जातो. नोकर लोक ' ही माझी जागा, ही माझी जागा नव्हे ' असं म्हणून भांडतात व गोंधळ करतात. ]

नोकर १:—चल उठ मी हतं उभं राहायचा.

नोकर २:—तर तर ! धन्यांनीं ही जागा मलाच दाविली नव्हं का ?

नोकर ३:—ही जागा तुझ्या बापानं ठेवली आहे जणूं ! इथलं भारी मातबर काम तुझ्यासारख्या शेणकुट्याला धनी सांगत्याल कां कधीं ?

नोकर ४:—मी शेणकूट आणि तूं दगड व्हय मोठ्या जड बुडाचा ! अरे नोकर तो नोकर ! लाथेचेच धनी सगळे, उगाच लहान मोठं काय लावलंस ?

नोकर ५:—अरे पन् माझी जागा कुठची ध्यानांत बी राहीना. अन् पाहुण्यांची मर्जी राखायचं काम कसं होणार माझ्याकडनं ? इथं थोडीच गुरं वळायचीं आहेत ? [ खंडेराव येतो. बरोबर मुरलीधर व हातिसिंग असतात. एक नोकर कंदील घेऊन पुढंच चालतो व तोंडानं म्हणतो. हां ! इकडूनशान् यावं धनी. तिकडं घाणीत पाय भरंल; खंडेराव जातो ]

हातिसिंगः—गड्या मुरलीधर ! चला ! दिवसभर दमलों, श्रमलों पदोपदीं निराशा झाली. पण आतां ते सगळं संपलं. खोली स्वच्छ मिळाली. आणि शेगडी थोडी पेटलेली असली, म्हणजे मनाचा सगळा शीण जाईल.

मुरलीधर—वाडा जुनाच दिसतो रे. खानावळीच्या मानानें मोठा आहे. टापटीप बरी दिसते, त्याचं असं असावं. वाडा मोठा नीट ठेवायचा कठीण. तो नीट ठेवतां ठेवतां बिचारा घरमालक खर्चांपायीं शिणला असेल. अन् या दियसांत संभावित कुटुंबाला देखील खानावळी सारखा कांहींतरी धंदा करून पोट भरावंच लागतं. वाडे जुने, पेशवाई म्हणून ते पोटाला थोडंच घालतात. सगळ्या पेशवाई घराण्यावर आज गरिबांची अशीच अवकळा आली आहे बघ.

हातिसिंग—तें ठीक आहे. पण खानावळवाल्यानं मोठं घर सजिवलं, म्हणजे आमच्या खारख्या प्रवाशाफिरस्त्यालाच त्याचे पैसे अप्रत्यक्षपणें द्यावे लागतात ! उपभोग थोडा पण बिलं मात्र मोठी.

मुरलीधरः—बिलाचं असो रे ! चांगल्या खानावळींत भारी बील द्यायला वाईट वाटत नाहीं. उलट भिकार खानावळींत बिलं भरावीं लागून वरती उपासमार होते.

हातिसिंगः—बरं हें बघ. आतां तुला एक सांगतो. तुझा भिडस्तपणा, मुखदुर्बळता इथं टाकून दे. नाहींतर उपासमार व्हायची. बोलून चालून खानावळच. घर मालकाचा हात मागंच असायचा नेहमीं. कोणत्याहि गोष्टींत कुणी सांगितल्याशिवाय कांहीं मिळायचं नाहीं. दोनदां मागावें तेव्हां एकदां मिळेल. दोन पदार्थ मागावे तेव्हां एकादा मिळेल. खरं म्हटलं तर तूं प्रवास कांहीं थोडा थोडका केला नाहींस. तरी तुझा भिडस्तस्वभाव जात नाहीं. अरे, वेळीं बायको माणसाजवळही भीड सोडून बोलावं लागतं. मग ती खानावळवाल्याची बायको, म्हणजे मालकीण असो किंवा कुणबीण असो.

मुरलीधरः— माझं आजवर चुकलं आहे तें हेंच बघ. कांहीं दिवस कॉलेजांत गेले, तेव्हां खानावळींत गेले. सभ्य बायकामाणसाशीं गांठ पडली म्हणजे थोडा संकोच वाटतो. आपल्या अशा तशा बिनसंभावित बायकांशीं गांठ पडली म्हणजे मग कठीण वाटत नाहीं बोलायला. त्या आणि आपण एकच वाटतं.

हातिसिं :— वाः म्हणजे आम्ही पुरुष असंभावीतच म्हणायचे. मी पाहून ठेवलं आहे, कुणा संभावीत बायकोची गांठ पडली, म्हणजे तुला एखाद्या चोरासारखं खोलींतून केव्हां निसटून पळून जाईन असं होतं.

मुरलीधरः— तसं होतं खरंच. पुष्कळदां मीं मनाशीं निश्चय करतो कीं, बायको संभावीत दिसली तरी तिच्याशीं भीड मोडून धीटपणानं बोलावं. पण होतं काय? कीं अशा कोणा स्त्रीनं डोळे उघडून माझ्याकडं पाहिलं कीं मी जागच्या जागीं थिजतो. कुणी मनुष्य स्वभावानं उद्धट असेल. तर त्याला विनयाचं सोंग आणतां येईल पण माझ्यासारखा म्हणजे ज्याच्या अंगीं खरा विनय आहे त्याला उद्धटपणा तर सोडून देच, पण धड धीटपणाचंही सोंग करतां येत नाहीं म्हणून हे असं होतं. खऱ्या विनयी स्वभावाच्या माणसाला नेहमीं ही भीति वाटत असते कीं मी इतर कुणाचा विनयभंग करितो कीं काय? आणि संभावित स्त्री भेटली म्हणजे तर ही भीति मला अधिकच जाणवते.

हातिसिंगः—तुझी मौज ही आहे कीं, पानाविड्यांच्या दुकानावर बसणारी बाजारी स्त्री, कॉलेजांत दूध घालायला येणारी गवळण, यांच्याशीं बोलतांना तूं जें अघळ पघळ थट्टा मस्करीचं विनोदाचं बोलतोस, त्यातलं निम्मं सुद्धां तुझ्या तोंडून कुणाहि संभावित स्त्रीला ऐकायला मिळत नाहीं.

मुरलीधरः—आहे खर तसं एकदा धुमकेतु अगर ज्वालामुखी पर्वत यांना मी भिगार नाहीं तितका संभावित स्त्रीला भितो. शोभिवंत पोशाख

केलेली संभावित स्त्री ही मला सृष्टींतली सर्वांत भयंकर गोष्ट वाटते. तसं आहे खरं. काय करणार ?

हातींसिंग मग राजेश्री अशानं आपलं लग्न कसं होणार ? कारण तूं लग्न करणार तें संभावित स्त्रीशींच ना ?

मुरलीधरः—खरं सांगू कां ? माझी बायको कुणी दुसऱ्यांनच माझ्या करितां ठरविली पाहिजे. राजे लोकांत अशीच परस्पर लग्नं ठरतात. हिंदुस्थांनात तर पूर्वीं असंच नव्हतं कां होत कीं, बायको घरीं आली म्हणजे मग तिची आणि तिच्या नवऱ्याची तोंड ओळख ! पण स्वतः तिची प्रणययाचना करायची ? कठीण काम ! आणि बायकाची गांठ एकट्यांनीं कुठं पडते ? त्यांच्या भंवतीं काक्या, माम्या मावशा असायच्याच. घोळका घातलेल्या अशा परिवारांत प्रेमाराधन करायचं. आणि शेवटीं एकटीं गांठून हळूचं म्हणायचं ' प्रियतमे तूं माझी होशील कां ? माझ्याशीं लग्न करशील कां ? ते कठीण काम माझ्या हातनं कधीं होईल असं मला वाटत नाहीं.

हातिसिंगः—पण कायरे, इथं तूं आला आहेस बापाच्या सांगण्यावरनं तें आपली बायको पाहून पसंत करायला ना ? मग स्वारी त्या भावी वधूशीं कशी वागणार ?

मुरलीधरः—इतर सभ्यस्त्रियांशीं वागतो तसाच. खालीं मान घालून बोलायचं. नुसतं होय, नाहीं म्हणायचं. पण वर मान करून तिचं तोंड पहायचं आपल्या हातुन व्हायचं नाहीं. इथनं परत निघेन तें थेट जाऊन बाबांचं तोंड पाहीन वर मान करून !

हातिसिंगः—तूं मित्र म्हणून पाहिला तर अमदीं गरमागरम मसालेदार. आणि प्रणयी म्हणून पाहिला तर मात्र बिलकुल बरफ. अशानं कसं होणार तुझं ? आश्चर्य वाटतं,

मुरलीधरः—तूं माझी काळजी कशाला करतोस हातिसिंग, खरं सांगूं कां तुला ? मी जो इकडं आलों तो माझ्या कामापेक्षां तुंझ्या कामा-

करतांच अधिक उत्साहानं आलों म्हणेनास? खंडेराव जिचे पालनकर्ते आहेत ती नीला तुझ्यावर प्रेम करते. पण या घरचे लोक तुला नीट ओळखीत नाहींत. मलाहि समक्ष ओळखीत नाहींत. पण नांवावरनं, बापाचा मुलगा म्हणुन तरी मला ओळखतात. आणि तूं माझा मित्र म्हणून मी तुला बरोबर घेऊन आलों तेव्हां तुझंहि स्वागत होणारच. मग सूर्य आहे जयद्रथ आहे. तुझं तूं आपलं पाहून घे. नीलेची घरची संपत्ति पुष्कळ आहे. ती तुलाच मिळणं योग्य. आणि ती मिळेलहि तिच्या बरोबर अगदीं मान्यतेनं.

हातिसिंगः—तिच्या संपत्तीचं कां बोलतोस? तिच्या संपत्तीवर लक्ष ठेवण्याइतका अधम मी नाहीं. तिच्या बापानं ती मला द्यायची ठरविलं होतं बाळपणापासून आणि तिचीहि त्या गोष्टीला संमति आहे जाणतेपणापासनं.

मुरलीधरः—जाऊं दे. तूं असा लाघवी आहेस कीं प्रेमळपणानं कुणाहि स्त्रीला तूं मोहांत पाडशील. तुला वाईटांबरोबर चांगल्या संभावित स्त्रियांशींहि कुशलतेनं धीटपणानं बोलतां येतं. मला येत नाहीं तसं. संभावित स्त्रियांना मी देवी सारख्या पूज्य मानतो पण त्यांच्याशीं धीटपणानं मला बोलायला येत नाहीं. त्याला नाइलाज आहे खरा. एखाद्या नटीशीं नाहीं तर बाजारी स्त्रीशीं बोलतांना माझं तोंड उघडतं. आहे खरं तसं! करणार काय? संभावित स्त्रीशीं बोलूं लागलों कीं बोबडी वळते शब्दाचे पाय पायांत घुटमळतात. पण जाऊं दे. ही पहा घरमालकांची स्वारीच इकडं येती आहे. ( खंडेराव येतो. )

खंडेराव—आपलं फिरून स्वागत करतों पाव्हणे मंडळी. माझी रीतभात जुन्या वळणाची आहे. कुणी पाहुणा आला म्हणजे अगदीं दाराशीं जायचं त्याला घ्यायला. आणि त्याचा गाडी, घोडा, मोतदार सगळ्यांची व्यवस्था अगदीं स्वतःच्या हातानं करायची. चाकरानोकरांवर तें काम विसंबायचं नाहीं.

मुरलीधरः—आपल्या स्वागताबद्दल आपले फार आभारी आहों.

हातिसिंगः—( खंडेरावाकडे दुर्लक्ष करून ) उद्यां सकाळीं आधीं पोशाख बदलायचे पहिलं काम. प्रवासानं किती खराब झाले आहेत पहाना.

खंडेरावः— पाहुणे मंडळी ! पोशाखाची खंत बाळगण्याचं कारण नाहीं. इथं या घरीं कसलाहि कुणाचा पोशाख असला तरी चालतो. इथं उपचाराचं म्हणून नांव नाहीं.

मुरलीधरः—( हातिसिंगाला ) पोषाखांत सुद्धां, पहिली लढाई जिंकील त्यानं निम्मं युद्ध जिंकलं हीच म्हण खरी आहे.

हातिसिंगः—पण सारा दारुगोळा पहिल्या हल्ल्यांत संपवून चालायचं नाहीं. शेवटीं मागं फिरावं लागलं तर कांहीं शिल्लक हवी.

मुरलीधरः—मला वाटतं प्रथम साधे पांढरे किंवा खाकी कपडे घालूं. आहे जरतारी पोशाख तो राहील शेवटीं एखाद्या समारंभांत घालायला.

खंडेरावः—आपण लढाईच्या गोष्टी काढल्या, त्यावरून मला या वाड्याच्या आसपास पूर्वीं महादजी शिंद्यांनीं केलेल्या लढाईची आठवण होते. काय केलं म्हणतां त्यांनीं—असंच निजामाला हुलकावणी दाखविण्याकरतां प्रथम अगदीं थोडं सैन्य पुढं काढलं.

हातिसिंगः—( खंडेरावाकडे दुर्लक्ष करून ) नुसत्या पांढऱ्यापेक्षां तो पिवळसर कोट बरा. इथल्या परिस्थितीप्रमाणं.

खंडेरावः— महादजीबुवांनीं झालं तरी प्रथम चार हजार फौजच पुढं घातली. हुजरात पागा सगळी मागं ठेवली.

मुरलीधरः—पण काय रे, बायकांमुलींच्या दृष्टीला पडायचं तेव्हां अगदीं साधे पोशाख घालून चालणार नाहीं.

खंडेरावः—आणि पाटीलबुवांच्या हाताखालीं होता ना तो तरुण सरदार—धर्माजी पायगुडा—तो म्हणाला बघा कीं, पाटील बुवा—या चार

हजार फौजेनंच केवढं काम करीन तें. आणि गड्यानं घातलान् वेढा गढीला अन् काय? अगदीं बळकट! बाहेरचं माणूस आंत नाहीं; आंतलं बाहेर नाहीं.

हातिसिंगः--मला वाटतं आपला कुणी पूर्वज या सैन्यांत लढाई-वर होता.

खंडेरावः--तर काय? माझा निपणजाचन् काय!

मुरलीधरः--पण मालकसाहेब, एक पेलाभर जर दारू द्याल तर गढीचा वेढा इथंहि अगदीं तंग बसेल.

खंडेरावः--काय दारूचा पेला? (स्वगत) बघून घ्या या पाहुण्याचा हा संभावितपणा. बेलाशक दारूचा पेला मागतो कीं मजजवळ!--

हातिसिंगः--कां आपल्याला आश्चर्य कां वाटलं? मगाशींच तुम्ही आम्हांला ठांसून बजावलं ना? कीं इथं संकोच धरूं नका. हवं तें बेलाशक मागून घ्या. इथं मुक्तद्वार आहे. आम्ही दिवसभर प्रवास करून थकलों आहों. एक पेलाभर स्वादिष्ट पेय घेतलं कीं सारा शीण सरेल.

खंडेरावः--कोण आहे रे तिकडं? दिग्या, ती दारूची सुरई आणि ते पेले इकडं आण बघूं.

( दिग्या आणतो )

घ्या कीं राव, तुम्ही आणि तुम्हीहि. आमच्या घरीं हें पेय चालतं. त्याची परवानगीच काढली आहे मी. आणि त्या पेयांत मीं आपल्या हातानं थोडा मसालाहि घातला आहे. बघा तर खरं कसं रुचकर झालं आहे तें! मुरलीधरपंत, तुमच्या आमच्या घराण्याची जुनी ओळख आहेच थोडी. ती आणखी वाढूं दे. या दुसऱ्या गृहस्थांना मात्र मीं प्रथमच पाहतो आहे.

हातिसिंगः--पण मला वाटतं तुमच्या घरच्या इतर कांहीं माणसांच्याहि ओळखीचा आहे मीं थोडा बहुत.

मुरलीधर:—( स्वगत ) मालकसाहेब मोठे गमत्ये दिसतात. व्यक्ति आहे ! आपणहि थोडा विनोद करावा, म्हणजे बरी संगत रंगेल. (उघड) हूं आपण तयार केलेलं पेय खूप रंगलं आहे मालकसाहेब. आपणांला याचा बराच सराव दिसतो.

हातिसिंग:– हां. नित्य दहावीस गिऱ्हाईक यायचंच-म्हणजे पाहुणे मंडळी–आणि निवडणुकी वरचेवर होऊं लागल्या त्यामुळं या पेयाचा खपहि पुष्कळच असेल.

खंडेराव:—छेः मी निवडणुकीच्या भानगडींत हल्लीं मुळींच पडत नाहीं. तें काम परवडत नाहीं आपणांला. तें काम मीं दुसऱ्या लोकांकडं सोपवून दिलं आहे सारं. ते लोकहि समजुतीनं जथीमथीनं एकमेकांच्या निवणुडकी करून देतात.

मुरलीधर:— म्हणजे तुम्ही राजकारण अगदींच अंगाबाहेर टाकलं आहे म्हणायचं ?

खंडेराव:- असं खरं. पूर्वी मी राजकारणांत खूप लक्ष घालीत असे. पण सरकार करील तें मला पटूं नये, मी खूप रागवावं, असं होऊं लागल्यापासनं मी तें सोडून दिलं. आणि आतां सोम्या निवडला काय, अन् गोम्या काय, दोघेहि मला सारखेच वाटतात. लोकहित करण्याची खरी हौस. इच्छा, कुणालाच नाहीं. निडवणुकीच्या जाहीरनाम्यांत तेवढ्या यांच्या वल्गना ऐकून घ्या. असो. घ्या, आणखी एक पेला घ्या. सुरईत आहे अजून.

हातिसिंग:—पण या विश्रामधामांत विश्रांति घेण्याला येणारे लोक रोज कांहीं थोडे थोडके नसतील. त्यांतून मालकसाहेब पडले अगत्यवादी. म्हणून राजकारण नाहीं तर समाजकारण. मिळून तेंच. येणार जाणारांची गर्दी असायचीच. स्नेही आहेत, सोबती आहेत. गांवचे आहेत, परके आहेत !

खंडेराव:—आहे खरी लोकांची माझ्यावर कृपा. या दहावीस

कोसांतले बहुतेक तंटे या घराच्या ओटीवरच मिटतात म्हणाना. सर्वांना मी हवा.

मुरलीधरः—बरोबरच आहे. दारु, मद्य असली पेयें जशीं भांडण लावणारीं आहेत. तशीं भांडणं मिटविणारीहि आहेत. कोर्टात जाऊन तरी पैसाच खर्चायचा आणि तोहि बिनाकारण. मग इथं खर्चलेलाच काय वाईट?

हातिसिंगः—आणि इथल्या स्वादिष्ट पेयांप्रमाणेंच मालकसाहेबांचा सदुपदेशहि! शहाणपणाचा सल्लाहि पुष्कळ उपयोगी पडत असेल.

मुरलीधरः—ठीकच आहे. कुणी समजूतदार भेटला तर त्याच्याशीं समजुतीनं शहाणपणानं बोलावं. पण कुणी आडमुठा भेटला तर तो या स्वादिष्ट पेयानं तरी वठणीला यायचाच. असं नाहीं तर तस. चौफेर हल्ला चढाविला म्हणजे कोणत्या तरी बाजूनं किल्ला सर व्हायचाच. मालक साहेब वृद्ध झाले आहेत! त्यांचा अनुभव फुकट कसा जाईल?

खंडेरावः—शहाणपणाच्या गोष्टी निघाल्या म्हणजे मला नाना-फडणीसाच्या चातुर्याची आठवण होते.

हातिसिंग.—जसे महादजी शिंदे तसेच नाना फडणवीस. दोघांच्या कारभारांत आपले कुणी पूर्वज असणारच.

मुरलीधरः—पण मला वाटतं आतां रात्र होत चालली. तेव्हां नानाफडणीसाच्या चातुर्यापेक्षां मालकसाहेब जेवण्याखाण्याच्या कांहीं गोष्टी काढतील तर अधिक बरं नव्हे कां?

खंडेरावः—( स्वगत ) पाहुण्यांनीं आपण होऊन जेवणाची चौकशी करावी हा संभावितीचा नमुना मी प्रथम पाहतो आहे.

हातिसिंगः—मुरलीधर म्हणतो तेंच बरोबर आहे. मलाहि पण खूपच भूक लागली आहे. वाटतं कीं समोर येईल तें सगळं अन्न मी फस्त करीन.

खंडेरावः—( स्वगत ) ही स्वारी देखील तशीच कीं! आहेत झालं! ( उघड ) जेवणाची गोष्ट निघाली ती ठीक आहे. पण मला त्याविषयीं आंत जाऊनच चौकशी करावी लागेल. स्वयंपाक, माजघरांतला कारभार मी आमच्या कुटुंबाकडंच सारा नेहमीं सोपवितों.

हातिसिंगः— आम्हांला तुमच्या घरगुती कारभार वांटणीची चौकशी कशाला? आपलं वेळेवर हवं तसं जेवण मिळाल्याशीं गांठ.

खंडेरावः—मला वाटतं आतां स्वयंपाक घरांत बहुधा त्यांच्या त्यांच्यांत तीच म्हणजे जेवणाचीच वाटाघाट चालू असावी.

मुरलीधरः—मग आम्हांला घेतील का बाईसाहेब त्या वाटाघाटींत? मला घरीं तशी संवयच आहे. मी प्रवासांत माझ्या खाद्य पेयाची व्यवस्था स्वतःच तंत्रानं अन् अधिकारानं करतों. आपण स्वयंपाक घरच्या मालकीण-बाईंना इथं बोलावलंत तर बरं होईल कीं. यांत आपला उपमर्द नाहींना मी करीत.

खंडेरावः—उपमर्द कसला म्हणा. पण आमच्या स्वयंपाकीण बाई आहेत मुलखा वेगळ्या जहाल. त्यांना इकडं बोलावलं तर त्या रागावून ओरडून घर डोक्यावर घेतील ना. आणि आल्या तरी तोंड उघडून फारशी बोलायच्या नाहींत.

मुरलीधरः—त्या न घेतना. पण आज जेवायला काय काय पदार्थ केले आहेत हें आम्हांला सांगितलं तरी चालेल. कारण पुढं काय पदार्थ येणार, काय वाढप येणार, हें आधीं कळलं म्हणजे पूर्वीचा पदार्थ किती खावा याचा थोडा अंदाज करतां येतो, खरंना!

खंडेरावः—( त्यांच्या तोंडाकडं आश्चर्यानं पाहतो. )

हातिसिंगः—यांत आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे! मींहि पण त्याच मताचा आहे मालकसाहेब.

खंडेराव:—ठीक आहे. दिग्या आंत जा आणि आज जेवायला काय काय पदार्थ केले आहेत हें थोडें विचारून ये पाहूं ? आपण पदार्थांची चौकशी करतां फारशी कांहीं चूक नाहीं. माझे एक काका होते ते नेहमीं म्हणत कीं आधीं खाऊन घ्यावं आणि मगच खाऊ घालणाराला भलं म्हणायचं तर म्हणावं.

दिग्या:—ही घ्या धनी, मी यादच करून आणली आजच्या जेवणांतल्या जिनसांची ! बाईसाहेबानी तोंडानं सांगितली तशी.

मुरलीधर: हे हो काय मालकसाहेब ? इतके पदार्थ एका जेवणाला आणि तेहिं रात्रींच्या जेवणाला ? आम्ही माणसं नसून कुणी राक्षस आलों आहों असं वाटलं कीं काय या बायांना ?

हातिसिंग:—अरे, पण आधी याद वाच तर खरा.

मुरलीधर:— सांजा.

हातिसिंग:—म्हणजे भात नाहीं ? आपणांला तर भाताशिवाय चालायचं नाहीं.

खंडेराव:—आपण गव्हाच्या मुलखांतनं आलेलें पाहुणें म्हणून त्यांनीं भाता ऐवजीं रव्याचा सांजा केला असेल झालं !

मुरलीधर:—बटाट्याचा रस्सा आंबट गोड.

हातिसिंग:—चालेल चालेल. मात्र त्यांत कांदे असले पाहिजेत.

मुरलीधर:—पुऱ्या.

हातिसिंग:—चालतील, चालतील. पुऱ्या चालतील. बहुधा तुपातल्यांच असाव्या.

मुरलीधर:—या यादींत आणखीहि तीन चार पदार्थ आहेत. पण इतके कशाला ?

हातिसिंग:—रात्रीच्या जेवणाला दोन तीन साधे पदार्थ असले म्हणजे मला पुरतात.

**खंडराव:**—आपला पाहुण्यांचा अधिकार ! आपणांला काय हवं नकों तें सांगा. अजूनहिं बदल करतां येईल.

**हातिसिंग:**—तसं कांहीं नाहीं मालकसाहेब; काय असेल तें येऊं दे. त्यातल हवं ते आम्ही खाऊं. त्याचं काय एवढं मोठं. आम्ही आपल्या पदार्थांना नांवं ठेवीत नाहीं, आहों पदार्थ सगळेच चांगलें दिसतात. त्यांतले कोणतेहि आम्हांला चालतील.

**मुरलीधर:**—हें झालं जेवणाचं. पण बिछान्यांचं काय ? मला मोठी खोड आहे त्या बाबतींत. मला अंथरुणावरचे पलंगपोस अगदीं स्वच्छ, परीट घडीचे लागतात. असल्या घरीं—

**खंडराव:** असल्या घरीं म्हणजे ?

**हातिसिंग:**—असल्या घरीं म्हणजे नित्य पाहुणें येणार, जाणार अशा घरीं. त्याच्या डोक्याखालच्या उशा घामट होतात इतकंच.

**मुरलीधर:**—तें कांहीं नाहीं. आपला कुणी नोकर माझ्या बरोबर द्या. म्हणजे मीच स्वतः पाहून येतों तीं सारी बिछान्यांची व्यवस्था.

**खंडराव:**—छे, छे, आपण कशाला तसदी घेतां ?

**मुरलीधर:**—तसदी पडली तरी चालेल मला. तुम्ही कां यांत मध्यें उगीच बोलतां

**खंडराव:**—( स्वगत ) ध्या, हे म्हणे संभावित पाहुणे. ( उघड ) निदान मी तरी बरोबर येतो. म्हणजे सारं ठीक होईल.

( ते दोघे जातात. )

**हातिसिंग:**—मालक झाला तरी खानावळवाल्यानं इतकी लुडबुड करूं नये. पण या गृहस्थाचा हेतु एकदरीन आम्हांला खूष ठेवण्याचा दिसतो. तेव्हां त्याच्यावर रागावूं नये हेंच बरं. अरे पण ही कोण इकडं येते आहे ! ही तर नीलाच. मग आणखी काय पाहिजे. !

( नीला येते )

नीलाः—हें काय हातीसिंग? तूं केव्हां आलास? इकडं कसा? हा काय योगायोग! सुदैवच सहयाला धावलं म्हणायचं. कल्पना नव्हती मला कीं तुझी इथं आज गांठ पडेल अशी.

हातिसिंगः—मीहि झालं तरी त्या दैवाचाच आभारी आहें! एरवी त्या आडगांवातल्या खाणावळींत तुझी अशी अवचित भेट कशानं झाली असती? कल्पना तरी करतां आली असती कां कुणाला?

नीलाः—(आश्चर्यानं) अय्या—काय म्हणालास? खाणावळींत? म्हणजे काय?

हातिसिंगः—काय असायचं? आम्हीं आज उतरलों आहों ही खाणावळ नव्हे कां?

नीलाः—जुलूम आला म्हणायचा! तूं शुद्धीवर आहेस काय? अरे ही खाणावळ नव्हे. माझी सख्खी मावशी म्हाळसाबाई त्या या ठिकाणीं राहतात. खंडेराव इनामदाराचं आहे हें घर! कुणी सांगितलं ही खाणावळ म्हणून?

हातिसिंगः—म्हणजे ही खाणावळ नव्हे? तर माझा मोठा गावढपणा झाला. तोंडांत मारून घ्यायची वेळ आली म्हणायची (तोंडांत मारून घेतो) त्यापलीकडच्या ताडीमाडीच्या दुकानाशीं एक मुलगा भेटला सहज आम्हांला त्यानंच लावून दिलं इकडं आम्हांला. ही खाणावळ म्हणून सांगून, खरंच सांगतों! माझ्या बरोबर माझा मित्र मुरलीधरहि आहे.

नीलाः—झालं. आलं लक्षांत. हें आमच्या लंबोदराचं काम. त्याचांच हा खोडसाळपणा तुम्हांला भोंवला. मी तुझ्या जवळ केव्हां केव्हां एका खोडकर व्रात्य तरूण मुलाविषयीं बोलतें ना, तोच हा लंबोदर.

हातिसिंगः—म्हणजे हाच कां माझ्या तुझ्या प्रेमांतला माझा प्रतिस्पर्धी! तुझी मावशी तुझं लग्न ज्याच्याबरोबर लावायला पाहतें ते

हेच कां राजेश्री ? हीच कां माकडाची अवलाद ? मग याचीच कां मला भीति बाळगायची ? हातेच्यारे ? हा काय माझं वाकडं करणार ?

**नीला**:—(हंसून) नाहींच मुळीं. आणि मी आहे ना खंबीर ! याची भीति कसली तुला आणि मला ? शिवाय तो होऊनच माझा द्वेष किती मनापासून करतों तें काय तुला माहीत ? तें सारं तुला कळलं तर उलट तूं त्याचे आभारच मानशील ? माझ्या मावशीला हे सारं माहीत आहे. पण माझं त्याचं लग्न लावायची कल्पना आणि सारी खटपट तिची आहे. त्याची नव्हे. मावशीला मात्र उगीच आपल्या ठिकाणीं वाटत आहे कीं या तिच्या खटपटीला यश येणार ! तीच माझी प्रेमाराधना करीत असते खुळी बिचारी ! तो त्या भानगडींत मुळींच पडत नाहीं.

**हातासिंग**:—अस्सं कां ? मग खुशाल चालूं दे. बरं मुरलीधर, माझा मित्र इकडं कशाला आला माहीत आहे ना तुला ?

**नील**:—नाहीं बाई.

**हातासिंग**:—या वाड्याच्या मालकानं आपली मुलगी——

**नीला**:—म्हणजे मंजुळा ?

**हातासिंग**:—होय. ती त्याला द्यायचं मनानं योजलं आहे. आणि म्हणून तिला पाहायला त्याला बोलावलं आहे. त्याच्या येण्याचा फायदा घेऊन आलों मीहि इकडं. वरून दिसावं कीं मित्रा बरोबर मित्र आला. पण मी कां आलों हें माहीतच आहे निदान तुला तरी. मग बोल. आमचे घोडे थोडी विश्रांति घेऊन ताजे तवाने झाले म्हणजे आपण निघून जाऊं या कुणाला नकळत इथून एकदम.

**नीला**:—आणि माझ्या दागिन्यांची आणि पैशाची काय वाट ? पैसे असे वेगळे फारसें नाहींत. पण माझ्या चुलत्यानं आपल्या पैशांतून बहुतेक जवाहिरच खरेदी केले माझ्याकरतां. तें आहेत मावशीच्या ताब्यांत. मी तें अंगावर घालायला दे म्हणून मागतें आहे रोज तिच्याकडं. पण ती

कसली वस्ताद ? दाद लागूं देत नाहीं. तिच्या मनांत असं आहे कीं लंबोदराशीं माझं लग्न लावून दिलं कीं झालं. पूर्वीचे भाचीचे दागिनें आतां सुनेचे म्हणून आपल्याच ताब्यांत राहतील. पण त्याची नको तिला आशा. लंबोदरच मुळीं माझ्याशीं लग्न करायला तयार नाहीं. तेव्हां जरा धीर धर. कसें तरी दागिनें माझ्या हातीं आलें कीं मी तुझ्याबरोबर वाटेल तिकडं यायला तयार आहे एक पायावर ?

**हातिलिंगः**—जाऊं दे ग. मरोत तें दागिने. मला एरवीं काय कमी आहे ? तूं माझी झालीस म्हणजे मला सर्व कांहीं मिळालं बघ. बरं. पण एक ध्यानांत ठेव. ही खाणावळ नाहीं हें आतां माझ्या ध्यानांत आलं. पण तें मुरलीधराला तसं इतक्यांत सांगायचं नाहीं एकदम. कारण तें बाळ आहे असं लहरी, मित्रं, खुळं कीं या घरांला आपण खाणावळ समजलों ही चूक का त्याच्या लक्षांत आली कीं त्या क्षणीं तो गाडींत बसून चालूं लागायचा. तुझ्या मैत्रिणीची आणि खंडेरावांची निराशा होईल. त्यालाहि ती चूक पुढं केव्हां तरी कळणारच. पण हळूहळू दमादमानं कळलेली बरी. आमचा बेत पारपडेपर्यंत तरी मला आणि त्याला इथ रहायला हवं.

**नीलाः**—तर मग मला मंजुळेला विश्वासांत घेतली पाहिजे पहिल्या प्रथम. हें गुपीत तिच्याजवळ उघड करून आमच्या कारस्थानासह सगळं तिला सांगून ठेवलं पाहिजे. ती आलीच पहा इकडं. किंवा तिलाहि कांहीं वेळ भ्रमांत ठेवतां येतं कां पाहतें. मी जातें हें नीट सांभाळ.

( मुरलीधर येतो )

**मुरलीधरः**—खाणावळवाल्याचं आमच्याशीं वर्तन सगळं कांहीं अगत्यवादामुळं चाललं आहे. पण अगत्यवाद सुद्धां फार झाला म्हणजे त्याचाच जुलूम वाटूं लागतो. हे खंडेराव आणि म्हाळसाबाई जरा सुद्धां कधी तीं माझी पाठ सोडीत नाहीं. काय करावं, शुष्ककाष्ठ चिकटून राहतात. मला एकटा सोडीतच नाहींत मुळीं कसा तो.

हातिसिंग:—मुरलीधर मजा आहे. ऐकलंस? आतां इतक्यांत आगखी कोग कोण येऊन दाखल झालं आहे तें?

मुरलीधर—कोण कोण सांग ना?

हातिसिंग:— माझी नीला आणि तुझी मंजुळा. आम्ही दोघे जसे मित्र तशाच त्या दोघींहि पण मैत्रिणी आहेत. अगदीं जिवलग. जिवश्च कंठश्च. त्या दोघी इकडं एका गांवीं आल्या होत्या. पण टप्पे बदलून नवे घोडे गाडीला जोडायला त्या या खाणावळींत आल्या आहेत. देऊं कां ओळख करून तुझी आणि नीलाची?

मुरलीधर:—नीलाची चालेल. पण मंजुळेची भेट घ्यायची म्हणजे उरांत धडकी भरते रे. नको आज नको. पाहिलेस कां आमचे हे पोशाख कसे गलिच्छ आहेत? अशा पोशाखांत का कुणी आपल्या प्रेयसींना भेटतात? तिला जाऊंदे तशीच आपल्या घरीं. आम्हीहि ही खाणावळ सोडून जाउंच उद्यां तिच्या घरीं. तिथंच तिची गांठ पडलेली बरी नव्हे कां? या खाणावळींत कशाला उगीच! नीला बाई, नमस्कार. कसं काय ठीक आहे ना?

नीला:—पण मंजुळेला हि भेटा ना तसेंच. पोशाख असे ना साधाच. पण अशा साध्या पोशाखांत तिला भेटलांत म्हणजेच तिला भेटण्याची तुमची उत्सुकता तिला पटेल. प्रेम हें नेहमीं भेटीला उतावळ असतं. तें पोशाखाकडं पाहत नाहीं ती या घरांत आहेच. आणि तुम्ही इथं आहां हेंहि तिला कळून चुकलं आहे. मग भेटा कीं! तिला तें बरंच वाटेल. आम्ही जातों हवे तर बाजूला.

मुरलीधर:—नको नको हातिसिंग. मित्रा, जाऊं नको सबाजूला. तिला भेटायचं तर तूं मला हवास जवळ.

हातिसिंग—काय मूर्ख आहेस अगदीं. एका स्त्रीला, त्यांतुन तुझ्या प्रेयसीला भेटायला तुला बरोबर सोबतीला मीं पाहिजे काय? काय बोल-

तोस गाढवासारखं ? कां ती राक्षसी आहे म्हणून तुला तिची भीति वाटते ? अरे भित्र्या, एक झपाटा मार. पहिला शब्द बोल. म्हणजे जाईल भीति सगळी निघून.

**मुरलीधरः**—अरे भीति कसची ? पण प्रेयसीला, नवऱ्या मुलीला भेटायचं हेच सर्वांत अधिक अवघड काम ठरतं माझ्यासारख्या भिडस्त स्वभावाच्या पुरुषाला. ती सभ्य स्त्री आहे, अशी तशी नाहीं.

**हातिसिंगः**—या या, मंजुळाबाई. हे मुरलीधर. मुरलीधर या पहा मंजुळाबाई. अशीं दोन रत्नं एकत्र यावी केवढं हे पहाणाराचं भाग्य ? तुम्हां दोघांची एकदां नुसती ओळख झाली कीं पुरे. तुम्हाला परस्पराविषयीं अगत्य व प्रेम वाटूं लागेल अशी माझी खात्री आहे.

**मंजुळाः**—(स्वागत) हं हे कां मुरलीधर ? ऐकलं होतं यांच्याबद्दल ! तसे विनयी दिसतात. (तो खालीं मान घालतो.) आपण खुशाल आहां ना ? प्रवासांत तुम्हाला फार त्रास झाला म्हणें. फार अडथळे आले म्हणें.

**मुरलीधरः**—(खालीं मान घालून) हं. थोडेसे झाले खरे. पण नाहीं म्हटलें तरी पुष्कळ अडथळे आले खरे, पण त्यांचं काय ? अडथळें आलें तें वाईटच, नव्हे पण चांगलंच कीं—आपल्या सारख्यांची अभावित गांठ—भेट, (खाकरतो)

**हातिसिंगः**—(हळूच मुरलीधराच्या बरगडींत डिंवचून) हं चालू रे. प्रारंभ ठीक आहे. बोल असाच बोल. म्हणजे सारं ठीक होईल.

**मंजुळा**—आमच्या सारख्यांची गांठ भेट त्यांत काय मोठसं ? आम्ही यःकश्चित् खेडवळ माणसं. आपण मोठमोठ्या शहरांत राहिलेले वागलेले. असल्या कुग्राम वस्तींत आपल्यासारख्यांची काय करमणूक होणार ? कशानं मन रमणार ?

**मुरलीधरः**—मोठमोठ्या शहरांत मीं राहिलेला असलों तरी काय ?

माझा स्वभावच असा घडलेला आहे कीं मीं स्वतः कांहींच करीत नाहीं. जग काय करतं तें दुरून पाहत असतों. निव्वळ साक्षीदारासारखा. अगदीं तटस्थ म्हणाना ?

**मंजुळा:**—( हंसून ) हं. पण त्यांतच जीवनाचं खरं मर्म असत. स्वतःचं कौतुक करण्यापेक्षां लोकांचं पाहण्यांतच अधिक गंमत वाटते.

**हातीसिंग:**– ( हळूच ) बोल, बोल कांहीं उत्तर दे.

**मुरलीधर:**—( हळूंच ) सुचेवना थोंडसं काय बोलावं तें.

**मंजुळा:**—दुसऱ्याचं जीवन पाहण्यांत गंमत वाटते असं मीं म्हटलं पण हें पाहतांना दिसतं तें चांगलं असतं कीं वाईट असतं ? स्तुति करण्यासारखं कीं निंदा निषेध करण्यासारखं असतं ? तुमचा काय अनुभव आहे?

**मुरलीधर:**—दुसऱ्याची शहाणपणाची कृत्यं पाहून आनंदच होतो. पण कोणी मूर्खपणा केला तरी तो पाहून दुःख वाटत नाहीं मला. फक्त करमणूकच होतें. हंसू येतं !

**हातीसिंग:**—मंजुळाताई, मुरलीधर, तुम्ही बोलत बसा असेंच. ठीक चाललं आहे. आम्ही इथं राहण्यापासनं उगाच थोडासा व्यत्ययच यायचा तुमच्या संभाषणाला.

**मुरलीधर:**—( हळूंच ) ए. हे काय ? जाऊं नको मी तुला सोडणार नाहीं. ए जाऊं नकोरे. पायां पडतों. तूं गेलास म्हणजे माझं कसं होईल ?

**हातिसिंग:**—अरे, पण आम्हांलाहि आमचं कांहीं बोलायचं आहेना एकांतांत ! ( हातिसिंग व नीला जातात )

**मंजुळा:**—आपण जगाकडे केवळ साक्षीदाराच्या तटस्थाच्या दृष्टीनं बघतां हें ठीक आहे. पण आपणांला कांहींतरी लोकांशीं स्वतःचं म्हणून कांहीं बोलावं लागतच असणार—पुरुषांप्रमाणं स्त्रियांशींहि एरवीं व्यवहार कसा चालणार !

**मुरलीधरः**—हो पण स्त्रिया म्हणजे काय ? किती मोठ्या योग्यतेचीं माणसं ती ! त्यांच्याशीं वागतांना माझ्या सारख्यानं आपली योग्यता पाहूनच वागावं लागतं. त्यांच्या पुढं मी स्वतः क्षुद्र यःकश्चित् असाच वाटतो माझा मला.

**मंजुळाः**—( हंसून ) ठीकच आहे. स्त्रियांचा आदर, प्रेम संपादायची हीच खरी युक्ति असते. विनयी माणसंच जग जिंकतात. पण कुणी म्हणतात की स्त्रियांशीं पुरुषांनीं भिडस्ताप्रमाणं वागूं नये. धीटपणानं वागावं पुरुषांचा तो अधिकारच आहे.

**मुरलीधरः**—हं त्यांतल्या त्यांत मी असं करतों कीं गंभीर वृत्तीच्या विचारी अशा स्त्रियांशींच होतां होईल तों बोलण्या चालण्याचे प्रसंग आणतों. समजूतदर स्त्रियांशीं बोलणं चालणं कठीण वाटत नाहीं. पण जाऊं दे–माझ्या बोलण्याचा तुम्हांला कंटाळा येत असेल. जातों मीं.

**मंजुळाः**—छेः छेः मुळींच कंटाळा येत नाहीं. उलट आनंद वाटतो आहे मला तुमच्याशीं बोलण्यांत. उथळ भावनेची माणसं हवं तितकं अघळ पघळ बोलतात. पण ते बोलणं मला तरी पटत नाहीं. असं बोलावं असं वागावं कुणींहि कीं त्यानं दुसऱ्याच्या मनाचा ठाव घ्यावा.

**मुरलीधरः**—हं असं कुणा कुणाला बोलतां येतं. आहेत कुणी कुणी तसेंहि बोलणारे.

**मंजुळा**—मी पुष्कळ लोक असें पाहिलें आहेत कीं ह्यांना स्वतःला सुंसस्कृत मनाचं सुख किंवा आनंद भोगण्याची पात्रता नसते म्हणून ते उगाच ऐटीनें अशा सुखाविषयीं तुच्छताः तिरस्कार दाखवितात.

**मुरलीधरः**—हं हं. तुम्ही बोललां तेंच बरोबर–नाहीं म्हटलं अगदींच कांहीं तसं नाहीं. पण जाऊं दे. पण मला काय म्हणायचं ते तुम्हीच माझ्या पेक्षां अधीक चांगलं बोलवून दाखवितां म्हणून स्वतः गप्प राहून तुमचंच

बोलणं ऐकावंसं वाटतं. आणि फिरून त्याचं असं आहे—जाऊं दे पण ते तुम्हांच बोला. तुम्ही काय म्हणत होतां बरं ?

**मंजुळाः**—मी बोललेच. पण तुम्ही काय म्हणत होता तें सांगाना. बोला, मन मोकळ करून बोला.

**मुरलीधरः**—मी असं कायसंसं म्हणत होतो कीं लोकांच्या अंगीं ढोंगच फार असतं.

**मंजुळाः**—हो सरळ स्पष्ट बोलणारे कमी ! ढोंगी फार. पण मनांतून ढोंग करायचं, नसतांनाही फारसं बोलत नाहींत-तोंड नीट उघडीत नाहींत-आणि यामुळच स्वतः विषयीं गैरसमज करून घेतात.

**मुरलीधरः**—हं समजलं, समजलं-त्याचं असं-म्हणजे मी काय म्हणतो हें तुमच्या लक्षांत आलंच असेल.

**मंजुळाः**—हो हो. तुम्हांला उघड न बोलतांही आपल्या मनांतलं लोकांना फारच चांगलं सांगतां येतं. तुमचं म्हणणं असं होतं कीं पुष्कळ लोक घरीं खाजगीं रितीनं हवे तसे वागतात. पण तेंच सार्वजनिक रीतीनें उघडपणें बोलायची वेळ आली म्हणजे त्याला खुशाल नावं ठेवतात. त्यांना वाटतं कीं आपण असं बोललों म्हणजे सद्गुणाची प्रशंसा केली असं लोक म्हणतील. आणि आपणाला वाहवा मिळेल.

**मुरलीधरः**—हं. मुखीं राम आणि-आणखी म्हणताताना काय ते.

**मंजुळाः**—मी सांगतें. ' मुखी राम बगलमे छुरी. '

**मुरलीधरः**—वा फार चांगलं सांगितलंत. तुमची स्मरणशक्ति माझ्याहून चांगली आहे. पण मला वाटतं मी आतां यापुढें तुम्हांला बोलण्याचा शीण न द्यावा हे बरं नव्हे कां ?

**मंजुळाः**—छे, छे, भलतंच ! तुम्ही कितीतरी छान बोलतां. ते आनंददायक तर आहेच पण त्यांत तेजस्वी बोधही पण आहे. बोला, बोला, आणखी बोला.

**मुरलीधरः**—पण मनांत धीटपणा नसला म्हणजे मग तोंडाला कांहींतरीच येतं.

**मंजुळाः**—पण तो भ्रम असतो ऐकणारांचा. कुणी बोलण्यांत धीट नसला म्हणून त्याच्या अंगीं शहाणपण नसतं असं थोडंच आहे. बोला, बोला, आपण काय बोलत होतां ते पुढं.

**मुरलीधरः**—हो. पण–नाहीं. नको–हं–बोलेन थोडंसं. पण ते पहा तिकडं ती दोघं आम्हांला बोलावतां आहेत. खुणा करतां आहेत.

**मंजुळाः**—मग नाहीं आपल्या मनांत आणखी बोलायचं? बरं. तुम्ही व्हा पुढं मी आलेच.

**मुरलीधरः**—[ बरं बरं, म्हणून खाली मान घालून नमस्कार करतो ]

**मंजुळाः** – [ स्वगत ] काय बाई चमत्कार ! हा गृहस्थ इतकं बोलला माझ्याशीं पण यानें एकदा सुद्धां नीट वर मान करून माझ्याकडे डोळे उघडून बघितलं नाहीं. नवी नवरी देखील इतकी लाजाळू असत नाहीं. यांच्याहून अधिक धीट असते. पण रूप किती चांगलं. विनय, सभ्यता, यांची तर परमावधी आहे. [ हंसून ] पण हा गृहस्थ भीत कुणाला होता एवढा. त्यामुळं असं वाटे कीं या शहाण्या पण भिडस्त माणसाशीं बोलल्यापेक्षां एखाद्या ढोंब्याशीं बोललेलं अधिक बरं. पण जाऊं दे. स्वारी हस्तगत झाली अन् ताब्यांत आली म्हणजे मी यांचा सारा लाजाळूपणा काढून टाकीन आणि धीट बनवीन तें माझं काम. मलाच करायला नको कां ? ( जाते )

• • •

# अंक १ रा

## प्रवेश पहिला

[ लंबोदर, नीला येतात. त्यांचे मागून हातिसिंग व खंडेराव येतात. ]

**लंबोदर**—हें ग काय निलिटले ! माझी अगदीं पाठ सोडत नाहींस ते ! तुला लाज कशी वाटत नाहीं माझ्यासारख्या पुरुषाशीं लगट करायला.

**नीला**:—म त्यांत काय बिघडलं ? तूं पुरुष असशील पण माझा मावस भाऊ लागतोस ना ! मग मी थोडी लगट केली तर काय झालं ?

**लंबोदर**:—हो हो. तोंडानं सांगायचं नातं मावस भावाचं. पण मनांत दुसरं एखादं नातं माझ्याशीं जोडायचं आहे तुला.हें कळतं म्हटलं मला. मी एकदांच सांगतो, कीं माझ्यापासनं एक हात वर दूर उभी रहात जा. याहून अधिक जवळचं नातं मला नको [ लंबोदर पळून जातो. नीला त्याला धरायला त्याच्यामागून धांवते ]

( म्हाळसाबाई व हातिसिंग येतात. )

**म्हाळसा**:—काय हातिसिंग तुम्ही शहरवासी चैनी लोक, तुमच्याशीं बोललं म्हणजे तिकडचं पुष्कळ कळतं. मला सगळ्या नव्या गोष्टींची आवड आहे मनांतून. पण आमचं शहरांत राहणं घडत कुठं ? हे आहेतना आमचे मालक साहेब—या खेडेगांवांतून बाहेर पाऊल टाकायचं नाहीं अशी शपथ घेतली आहे जणूं कांहीं त्यांनीं.

**हातिसिंग**:—छे भलतंच. तुम्हांला माहीत नाहीं अशी नवी गोष्ट मला दिसतच नाहीं. प्रत्यक्ष परिचय नसतां शहरांतल्या अगदीं सधारल्या,

शिकलेल्या तरुण बायकासारखं तुम्ही बोलतां. आश्चर्य आहे. ते ऐकून कोणी म्हणेल तुमची पुण्यामुंबईतच वस्ती फार.

**म्हाळसा:**—छे, छे, मला नव्याची आवड म्हणून तोंडून त्याची वर्णनं येतात. गांवच्या बायका काय गांवढळच ! म्हणून माझं बोलणं ऐकून त्यांना मोठं कौतिक वाटतं. तुमच्यासारखं त्याही मला म्हणतात, आम्हांला न कळत तुम्ही पुण्यामुंबईत जाऊन रहातां कीं काय ? खरं म्हणायचं तर माझी शहर गांवची माहिती सांगोवांगी दुसऱ्याच्या तोंडून ऐकलेली. मी फक्त मुंबईचे एक वर्तमानपत्र वर्गणी भरून घरी यांना नकळत आणवतें. त्यांत तुम्हां सुधारलेल्या शिकलेल्या, लोकांची भांडणें, शिव्या गाळीं, निंदा, बदनामी सगळी वाचायला मिळते. त्यांतलं कांहीं एखादं उदाहरण मी दिलं म्हणजे लोकांना वाटतं ही बाई पुण्यामुंबईला जाऊन राहते. तसंच पुण्यामुंबईस एक दोन मैत्रिणी आहेत. त्या मला पत्रांतून लिहितात कीं अलीकडं नव्या चालीच्या बायका असा असा पोषाख, पेहराव करतात मग मी तसाच करायचा यत्न करते. एखाद्या चित्रांत बघावं तसं लुगडं नेसावं, तशीं चोळी शिवावी, तसा भांग काढावा, तसं कुंकु लावावं झालं.

**हातासिंग:**—छेः छेः काय बोलतां ? तुम्ही या पोषाखानें मुंबईच्या एखाद्या थेटरांत जाऊन समोरच नाटक पहायला बसाल तर मला वाटत लोक नाटक न पाहतां तुमच्याकडंच बघत राहतील.

**म्हाळसा:**—त्याचं असं. देवीची लस टोचण्याचं निघाल्यापासनं बायकांच्या तोंडावरचे देवीचे वण नाहिंसे झाले. आणि सगळ्याच बायकांची तोंडं उजळ दिसू लागलीं पण त्यांतूनही आपलं तोंड उठावदार दिसावं असं एकादीला वाटलं तर तिनं थोड्या वेगळ्या रीतीनें नटलं थटलं पाहिजेच कीं.

**हातासिंग:**—छेः छेः तुम्हांला तर तसलं कांहींच वेगळं करायला नको.

म्हाळसा:—पण हें आहेतना असले बुरसलेले सनातनी मला चिकटून बसलेले. नवं आणि बरं दिसतं म्हणून यांना सांगितलं तर अंगरख्याची एक गुंडी देखील कमी करायचे नाहींत. मी त्यांना म्हणत असते कीं टक्कल झांकायला ह्या केसाचा टोपच घालायला पाहिजे असं नाहीं. रंगीत पावडर फासूनही तें काम होईल.

हातीसिंग:—खरं म्हणतां ते, आतां या दिवसांत कुरुप बायका आणि म्हातारे पुरुष राहिलेच नाहींत.

म्हाळसा:—पण त्यांना मी जेव्हां म्हटलं कीं केसाचा टोप विकत आणा तर ते मला म्हणाले, कीं तुलाहि आतां म्हातारपणीं टक्कल पडूं लागलं आहे तेव्हां तुलाहि टोप घालवासा वाटतो कीं काय?

हातिसिंग:—दुसऱ्या कुणा बायांना वेषभूषेची गरज असेल पण तुम्हांला त्याचं काय? तुमच्यासारखे उजळ चेहरे शहर गांवांत तरी कितीसे पाहावयाला मिळतात? 'जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभते' हें नाटकांत पद तुम्ही ऐकलं असालच.

म्हाळसा:—नाटकांतलं पद आणि मी ऐकणार! हे आहेतना घरधनी सनातनी, मला कधीं नाटकाला जाऊं देतील तर! तुम्हीच सांगा माझ्या सारख्या प्रौढ बायकोनं नाटक पाहिलं तर बिघडेल कां?

हातिसिंग:—तुमच्यासारख्या तरुण स्त्रीनं स्वतःला प्रौढ म्हणवून घेणं म्हणजे अन्याय आहे. आणि तुमचं वय असलं तरी दिसतंय कुठं? आमच्या पुण्या मुंबईत सुद्धां कोणीहि बायको पन्नास वर्षांची होईपर्यंत तिला प्रौढ म्हणत नाहींत. आणि तुमचं वय तितकंहि नाहीं. शिवाय एक सांगतो, शहरगांवच्या बायका प्रौढ होईपर्यंत अंगावर दागिनेच घालीत नाहींत, कारण दागिने घालणें म्हणजे अंगच्या स्वाभाविक सौंदर्याचा अपमान करणं असंच त्या समजतात.

म्हाळसा:—होय ना! मग बघा बरं. माझी भाची नीला अलीकडं

दागिन्यांचा आग्रह धरून बसली आहे. मग तुम्हांला वाटत नाहीं का कीं तिनं या वयांत दागिनें घालणें ही चूक आहे.

हातिसिंग:—चूक नाहीं तर काय ? पण ती तुमची भाचीच कां ? मला नव्हतं माहीत. आणि तो तरुण मुलगा ? तिचा भाऊ कां ?

म्हाळसा:—भाउच म्हणा. पण सख्खा नाहीं. मावस भाऊ. (थोड्या हलक्या आवाजानें ) तो माझा मुलगा आहे. आणि त्या दोघांचं लग्न मी करून देणार आहे. मावस बहीणभावाचं लग्न होतंच. कशी दोघं जुळून दिसतात नाहीं, एकमेकानां शोभून ? एकमेकाभोंवतीं पिंगा घालीत रहातात दिवसभर. आणि घुमतात पाखरांसारखे. लंबोदर, ए, लंबोदर, काय चाललय तुझं आणि नीलेचं ? सांग पाहूं, अरे खुळ्या, प्रत्यक्ष लग्न व्हायच्याआधीं इतकं खेळीमेळीनें वागायचं नसतं, प्रेम असलं तरी.

लंबोदर:—नाहीं ग आई. मी कुठं काय बोलतो तिच्याशीं प्रेमाचं आणि कधीं तरीं ? उलट तीच कधीं माझी पाठ सोडीत नाहीं. तिला झिडकारतो तरी. तिच्यामुळं मला असं झालंय् कीं मला केव्हां एकांत हवा असला तर तबेल्यांत जाऊन बसल्या शिवाय गत्यंतर नाहीं. इतकी लगट करते माझ्याशीं.

म्हाळसा:—नीले, त्याचं बोलणं लक्षांत नको घेऊं अगदीं. तुझ्यामागं तुझी कितीतरी स्तुती तो करतो.

नील:—लंबोदर आहेच तसा उदार आणि प्रेमळ. आणि लबाडहि. लोकांच्या तोंडापुरतं माझ्याशीं भांडतो आणि खाजगी भेटला म्हणजे म्हणतो–' नीले, माफ कर, मी उगीच गंमत केली, लोकांदेखत तुला शिव्या देऊन.'

लंबोदर:—आई तिचं बोलणं मनावर घेऊं नको. अशी द्वाड आहे.

**म्हाळसाः**—बघितलंत ना हातिसिंग, या दोघांचं कसं चालतं तें. ये ना बाळ, लंबोदर, आणि तूंहि ग नीला. या. अशी जवळ जुळून उभी रहा पाहूं. कोण अधिक उंच बघूं. ( ती दोघं जवळ जवळ उभी रहातात व हंसतात. ) बघिलंत ना कसा जोडा शोभून दिसतो तो.

**नीला**—( ओरडून ) बघ ग आई, शेजारी उभी राहिले तर डोक्यावर डोकं आदळलन्. टेंगूळ येईल कीं !

**म्हाळसाः**—हें रे काय लंबोदर असं करावं तें ? तूं पुरुष आहेस, ती बायको आहे. आणि उद्यां नवरा बायको व्हायची; मेला राक्षस नाहीं तर. असं कां डोकं आपटावं कुठं ? तूं आतां मोठा झालास. कळावं थोडं.

**लंबोदरः**—मग आई, मी मोठा झालों आहे तर माझे पैसे, दागिने माझ्या स्वाधीन करीनास. मी नाहीं आतां यापुढं ऐकायचा तुझं.

**म्हाळसाः**—बघा हो, पोरगा किती कृतघ्न आहे तो. पोरट्याला पाळण्यांत घालण्यापासनं संभाळला. चमच्यानं दूध पाजलं. लहानाचा मोठा केला. औषध पाणी दिलं. चांगले चांगले कपडे शिवले. येवढंसं कुठं याला दुखलं खुपलं तर माझ्या डोळ्यांत पाणी आलं, आणि हा जरासा मोठा झाला म्हणून पैसे नि दागिने ताब्यांत मागतो.

**लंबोदरः**—ठाऊक आहे तुझं डोळ्यांतलं पाणी. पण आतां यापुढं मी मुळींच ऐकणार नाहीं.

**म्हाळसाः**—अरे, पण मी तुझ्या हातांत पैसे दागिनें देत नाहीं म्हणते ते मूर्खा, तुझ्या हिताकरतचा ना ?

**लंबोदरः**—पुरं झालं आईसाहेब, माझं तुम्ही हित पाहाणं. माझं हित आपोआप होईल, नाहीं तर माझं मी करून घेईन. तुला त्याच काय ?

**हातिसिंगः**—म्हाळसाबाई, राहूं द्या. तुम्ही नका बोलूं. मी घालीन त्याची समजूत.

( म्हाळसाबाई व नीला जातात )

लंबोदरः—( गाण्याचं कडवं म्हणतो, हातवारे करतो ) जाऊं द्या हो हातिसिंग. रडूं दे तिला. रडल्याशिवाय तिला बरं कुठं वाटत, आणि ही नीला तिला रडायला मदत करते. एखादी दुःखाची कहाणी वाचली म्हणजे एक रडते, आणि दुसरी डोळे पुसते.

हातिसिंगः—( आश्चर्य दाखवून ) म्हणजे खरंच कीं काय लंबोदर तुम्हांला या दोघीहि आवडत नाहींत? तुमची आई राहो पण ती नीला बरी दिसते समजूतदार. तिचा तरी स्वभाव चांगला दिसतो.

लंबोदरः—( हंसून ) अगदीं फसला तुम्ही तिचं तोंड पाहून. साऱ्या मुलखांतली लबाड आणि द्वाड आहे ती नीला. तुम्हांला तिचा अनुभव कुठं आहे?

हातिसिंगः—( स्वगत ) नीलेचा मला अनुभव किती कसा आहे हें या मुर्ख्याला काय माहीत? ( उघड )आणि नसला तरी काय झालं?

लंबोदरः—ती येवढी होती लहान तेव्हां पासून तिला मी पाहतो आहे. अशी ग्वाडकर कीं बोलायची सोय नाहीं

हातिसिंगः—वा! मला तर वाटतं कीं ती बिनबोली समजूतदार असावी.

लंबोदरः—छे, छे, हो लोकांपुढं ती चांगली वागते पण आम्हां खेळगड्यांत असली म्हणजे हिचं खरं रूप प्रगट होत. चावरी मांजरी आहे नुसती!

हातिसिंगः—मग चार लोकांत ती गोड स्वभावाचं सोंग आणतो म्हणतात तें सोंग असेल कदाचित् पण तें सोंग तिला शोभून दिसत खरं.

लंबोदरः– जरा तिच्या मनाविरुद्ध गेलं कीं घोड्यासारखी टांपा मारील, आणि तुम्हाला खड्डयांत टाकील.

हातिसिंगः—जाऊं द्या हो, स्वभाव तेजस्वी, तरतरीत असला म्हणजे असं व्हावयाचंच. पण मुलगी कशी सुंदर देखणी आहेना? तुमच्या आईचा

विचार तिचं तुमचं लग्न करून द्यायचं आहे. ती बात लपवूं नका म्हटलं आमच्यापासून.

**लंबोदरः**—म्हणे सुंदर ! हीच कां तुमची कल्पना सौंदर्याची ? ही सुंदर पुतळी तुम्ही घेउन जातां का बोला.

**हातिसिंगः**--हो, हो, एका पायावर तयार. समजा मी ती पत्करली तर मला काय मदत कराल ?

**लंबोदरः**—बोला काय लागेल ती. तुम्हांला काय मदत लागेल, मी तुम्हांला एक तापट घोड्यांची जोडी देईन, अशी कीं तासांत सहा कोस मजल मारील, या नीलेला पळवून नेतां का बोला. म्हणजे आईच्या ताब्यांतले तिचे दागिनेसुद्धां मी मिळवून देईन

**हातिसिंगः**—शाबास, मैतर मिळावा तर असा उमदा ! ( हातांत हात घालून ) मग ठरलं ना ? एकात दोघांची कामं होऊन जातील.

( जातात )

भारत इतिहास संशोधन मंदिर
३१२, सदाशिव पेठ, पुणें २.

## प्रवेश २ रा

( खंडेराव येतो )

**खंडेरावः**—काय मौज आहे पहा. सर चिंतामण लिहितात कीं माझा मुलगा मुरलीधर मोठा भिडस्त, लाजाळु, मुखस्तंभ आहे. तुम्ही त्याला थोडा संभाळून घ्या. पण इथं पहावं तर उलटा प्रकार. कोण त्या मुरलीधराचा उद्धटपणा. माझी मानाची खुर्ची घरमालक म्हणून तिचाच ताबा घेतला यानं. बूट माजघरांत आणतो, काढून काय ठेवतो आणि मलाच म्हणतो

हं चाकराना सांगा हे बूट संभाळायला. पण मंजुळेच्या हें कसं काय लक्षांत आलं आहे कीं नाहीं. त्याचा उद्धटपणा तिला खचित आवडला नाहीं. आणि मग बिनसायचं !

( मंजुळा येते )

**खंडेराव:**— मग काय बाळ मंजुळे, मी सांगितला तसा पोषाख केलास?

**मंजुळा:**—हें हो काय बाबा ? तुम्ही सांगावं आणि मी न ऐकावं असं होईल कां कधीं ? मग तें कसं कां असेना.

**खंडेराव:**— मला भीति इतकीच वाटते कीं तुला दाखविण्याकरितां नवरदेव घरीं बोलावून आणले खरे पण ते तुला कसे काय पटतात ? किती उद्धट दिसतो हा मुरलीधर ? प्रवास करून जग पालथं घातलं म्हणजे माणस अशीच बेमुर्वतखोर होतात.

**मंजुळा:**—म्हणजे म्हणतां काय बाबा ? इतका भिडस्तपणा मी कुणाहि पुरुषांत अजून पाहिला नव्हता. त्याला कुणी लाजाळु देखील म्हणेल!

**खंडेराव:**— काय म्हणतेस काय पोरी ? मुरलीधर भिडस्त, लाजाळू. मला तर तो उद्धटांतला उद्धट दिसतो.

**मंजुळा**—आणि मी तर इतका विनयशील भिडस्त तरुण पाहिलाच नव्हता या पूर्वी.

**खंडेराव:**—अग काय सांगू. पहिल्या भेटीपासून तो मला एखाद्या नोकरा सारखा वागवितो आहे. तोंड टाकून बोलतो, कुत्र्यासारखा आंगावर येतो, आणि बडबड वटवट तरी किती.

**मंजुळा:**—छे, भलतंच कांहींतरी तरी बोलतां. माझी गांठ पडली तेव्हां त्यांनीं एकदा जी खाली मान घातली ती आमचं सगळं बोलणं पुरं होईपर्यंत वर केलीच नाहीं मुळीं. बोलणं किती आदबशीर, तोंडातनं शब्दहि

पुरा काढीत नव्हते. त्यांचं बोलणं मलाच पुरं करावं लागत होतं. मी तर एवढीशी मुलगी, पण एकाद्या राजाच्या राणीसारखं त्यांनीं मला सन्मानानं वागवलं. हल्लीच्या दिवसांत तरूण बायका छचोर ढंग करतात तें मला आवडत नाहींत. बायकांनीं फार हसूं नये असलं संभावितीचं ते माझ्याशीं बोलले. आणि गेले ते अगदीं वांकून नमस्कार करून.

**खंडराव**:—(हंसून) घ्या. आणि माझ्याशीं तो वागला इतक्या सलगीनं कीं जणूं कांहीं तो आणि मी बाळपणाचे सोबती. प्रश्नांची सरबत्ती उडविलीन् माझ्यावर. आणि धड उत्तर ऐकायलाहि थांबेना. मी विनोद करूं लागलों म्हणजे तो असा चेहरा करी कीं, जणूं कांहीं त्याला दुःखच झालं. आणि एखादी गोष्ट सांगूं लागलों म्हणजे मधेंच बोलून ती संपवून टाकी.

**मंजुळा**:—छे, छे, यांत कांहींतरी, कुणाचा तरी गैरसमज आहे. हीं दोन वर्णनं एकाच माणसाला कशी लागतील ? मग बाबा मी चूक, कीं तुम्हीं चूक ?

**खंडराव**:—छे ! असला उद्धट जांवई नको आपल्याला.

**मंजुळा**—आणि असला भिडस्त, लाजाळु, नवरा तरी कुणा मुलीला आवडत ?

**खंडेराव**:—मग एका गोष्टींत तरी तुझं माझं जुळलं, कीं याला जांवई करून घ्यायचा नाहीं !

**मंजुळा**:—पण तुमच्या माझ्यापैकीं तुमचं खरं ठरलं तर—पण माझं खरं ठरलं तर ? मग मात्र थोडा विचार करावा लागेल.

**खंडराव**:—तें कसं ?

**मंजुळा**:—तें असं कीं एखादा पुरुष भिडस्त, लाजाळु असेल पण त्याच्या अंगांत इतर चांगले गुण असले तर.

**खंडेराव**:—आलं ध्यानांत थोडसं. हा मुरलीधर सुंदर आहे रूपानं हें मलाहि कबूल. पण तो दिसायला सुंदर आहे म्हणून त्याच्या अंगांतले

सद्‌गुण हुडकून काढायचा तुझा हा प्रयत्न सुरू झालेला दिसतो. तुम्हां तरुणमुलींना वाटूं लागतं कीं सुंदर रूपाबरोबर सद्‌गुणहि अंगीं असायचेच.

**मंजुळाः**—वा हो बाबा ! बोलतांना प्रथम माझा समजूतदारपणा तुम्हांला पटला आणि आतां असं बोलतां कीं माझ्या अंगात खरा समजूतदार-पणाच नाहीं. म्हणजे जशी कांहीं मी सुंदर रूपाला भाळून जाणारीच मुलगी असेल.

**खंडेराव:**—आणि असंहि कां न होईल कीं हा मुलगा लबाड, आंतल्या गाठीचा म्हणून आम्हां दोघांशीं दोन वेगळ्या तऱ्हेनें वागतो. तसं असलं तर शेवटीं मेळ पडेल आणि तूं म्हणतोस तसं होईल. आणि मला तरी तें तसं व्हायला कुठं नको आहे ?

**मंजुळाः**—म्हणजे एकूण थोडं थांबलं पाहिजे आपल्याला, खरं काय तें कळायला. पण मी सांगते, माझंच खरं होणार शेवटीं.

**खंडेराव:**—नाहीं, नाहीं, माझंच खरं होणार. ( जातात )

( लंबोदर एक पेटी घेऊन येतो. )

**लंबोदर:**—चला, निलीटर्लीचे दागिने तर हस्तगत झाले एकदांचे. ही मोत्याची माळ, हा चपालाहार, हें डूल, हीं मोत्याचीं कांकणं. सर्व कांहीं आहे. काय आई तरी. या सगळ्यांचा अपहार करण्याची तिला इच्छा आणि त्याकरतां मी नीलेचं लोढणं गळ्यांत बांधून घ्यायचं.

( हातिसिंग येतो )

**हातिसिंगः**—हं. अहो मित्रवर्य, तुमचं कुठपर्यंत आलं. तुमच्या आईनं कांहीं ठाव लागूं दिला का ? तोंडापुरतं तुम्ही नीलेवर खूप प्रेम प्रकट केलंत कीं नाहीं आणि तिच्याशीं लग्न करायला तयार झालांत कां नाहीं? इकडं आमचीहि तयारी कांहीं कमी नाहीं म्हटलं. आमच्या घोड्यांना विश्रांति मिळून चंदी वैरण खरारा सर्व कांहीं झालं आहे. जुपले कीं निघालोंच.

**लंबोदर:**—असं. मग तुम्हांला वाटखर्ची कांहीं हवीच असेल. चला, ही घ्या दागिन्यांची पेटी. नीलेचेच आहेत तें सारें. नीट संभाळा.

**हातिसिंग:**—अरे, पण हे तुम्ही कसें मिळविले. म्हाळसाबाईच्या कुलपांत होते ना?

**लंबोदर:**—लागलेत प्रश्न विचारायला. मी कसेंहि मिळविले तुम्हांला काय त्याचं! तुमच्या प्रश्नाला उत्तर देत कोणी बसावं. सांगू कां तुम्हांला, तिच्या सगळ्या कुलपांना चालणाऱ्या किल्ल्या या पहा माझ्याजवळ आहेत. त्या मला लागतातच. माझेहि पैसे ती आपल्या ताब्यांत ठेवते. मग मला ते तिला नकळत काढून घेतल्याशिवाय कसं चालेल? माझ्या वैनीचा खर्च थोडा कां आहे म्हणतां. हां, चोरी असली तरी आपल्याच पैशाची. त्याला कोण नांवं ठेवील?

**हातिसिंग:**—हो. सगळे असंच करतात कारण पडलं म्हणजे. आतांच नीला ते दागिने मागत होती म्हाळसाबाईजवळ. आणि ती मागणी त्यांनीं कबूल केली तर मग जुळलंच. कारण कबुली आणि दागिने दोन्ही हातांत.

**लंबोदर:**—अहो भ्रम आहे तुम्हांला–म्हाळसाबाई आहे ती! सुखासुखी हातचे दागिने जाऊं देईल म्हणतां?

**हातिसिंग:**—पण आईसाहेब नाहीं द्यायचे म्हणाल्या म्हणजे मग कसं? आणि दागिने पेटीतनं गेले असं त्यांना आढळलं म्हणजे मग! भडकाच उडेल ना एकदम.

**लंबोदर:**—ऊं. त्याची काय मला भीति घालतां. माझी आई मला अधिक माहित कीं तुम्हांला. ती बिघडली तरी तिला वठणीवर आणणारा मी वस्ताद आहे—( जातात. म्हाळसा व नीला येतात. )

**म्हाळसा**—काय तरी आश्चर्य? तूं एवढीशी मुलगी अजून आणि तुला इतक्या वयांत हिऱ्यामोत्यांचे दागिनें हवेत कशाला? वीस

वर्षांनीं तूं म्हातारी दिसूं लागलीस, चेहरा कोमेजला म्हणजे मग दागिन्यांची गरज लागावी.

**नीला:**—पण मावशी चाळीशीच्या वयांत दागिने शोभा देतात तर विशीच्या-वयांत ते अधीकच शोभा देतील ना !

**म्हाळसा:**— अग तुझ्या सौंदर्यात भर घालायला जागा कुठं आहे. तुझा हा नाजूक, गोड चेहरा त्याचीच शोभा हजार दागिन्याबरोबरीची आहे, कांहीं अधिकच. शिवाय मोठमोठ्या शहरांतून देखील आतां बायका आंगावर दागिने घालीत नाहींत !

**नीला:**—पण समज मावशी, तूं अंगावर दागिने घातलेलीच मला बरी दिसतेस असाच म्हणणारा कोणी नवरदेव भेटला तर ?

**म्हाळसा:** – असा कोण बाई, नांव तरी सांग बाई त्याचं. अग तूं नुसतं आरशांत बघ, म्हणजे मी बोलतें तें किती खरं आहे हें तुला कळून येईल

(लंबोदर येतो)

शिवाय हा एक साक्षीदार, लंबोदर, जवळ आहे. विचारुं या त्यालाच आपण. काय रे लंबोदर, या निलीनं अंगावर दागिने घातले म्हणून ती अधीक सुंदर दिसते का रे ?

**लंबोदर:**—आई, तूं तिला दागिने दे, ती ते अंगावर घालूं दे. अन् मग सांगेन कसं तें.

**नीला:**—ते कांहीं नाहीं मावशी. मला एकदां दागिने द्यायची कृपा करच ना.

**म्हाळसा:**—अग वेडे, दागिने सारे जुन्या चालीचे आहेत. ते तूं आंगावर घातलेस म्हणजे कुणी म्हणेल कीं जुन्या पेशवाई काळांतली ही कोण अंबाबाई या युगांत अवतरली ! आणखी हें बघ, ते दागिने बाजूला ठेवून दिल्याला कितीतरी दिवस झाले आहेत. लक्षांत कुणाच्या कुठं कधीं

ठेवलें ते कारण ते पुढ काढून घा लेच नाहींत आज कितीतरी वर्षं, मी नाहीं आणि तूं हि नाहीं. हुडकायला गेले तर लवकर सांपडायचे देखील नाहींत. आणि कदाचित् कुणी चोरूनही नेलें नसतील कशावरून ?

**लंबोदरः**—[ म्हाळसाबाईच्या कानांत हळूच ] हं हं, छान युक्ती काढलीस आई. एकदाच सांगून टाक जरा धीटपणानं, म्हणावं दागिनें चोरिला गेले. म्हणजे तिचा हट्ट थांबेल, आणि दागिनें चोरिला गेले याला हवी तर मी साक्ष भरीन.

**म्हाळसाः**—[ हळूच ] हं, ठीक आहे. शेवटीं दागिनें तुझेच व्हायचे यग ते चोरीला गेलें अशी खोटी साक्ष दिलीस तरी काय बिघडलं. देशील ना साक्ष ?

**लंबोदर**—यांत काय संशय. तू नुसतें दागिनें चोरिला गेलें येवढें म्हण म्हणजे मी सांगेन कीं चोरान चोरी करतांना मी या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलं.

**नीलाः—माव**शी देना दागिने. अगदीं एका दिवसांकरितां मी ते घालून एकदां आरशांत पाहीन आणि परत तुजजवळ ठेवायला देईन. मग तर झालं कीं नाहीं ? माझ्या मैत्रीणी म्हणत होत्या तुझे ते जुन्या चालीचे दागिने एकदां आम्हांला दाखीव. म्हणून ते मला दाखवावयाचे आहेत.

**म्हाळसाः**—खरंच सांगूं कां बाळ नीला ? ते सांडले आहेत अशीच भिती मला वाटते. आज उद्यां हुडकीन. आणि सांपडले म्हणजे तुला देईन. जरा धीर धर.

**नीलाः**—हें काय ग मावशी ? कांहीं तरी खोटं सांगून मला उडवून देती आहेस झालं. काय म्हणे दागिने सांडले, सांपडत नाहींत. या म्हणण्यावर विश्वास कोण ठेवील ? तो काय असा चार दोन पैशांचा जिन्नस

आहे म्हणून त्याची अशी कुणी हेळसांड करील ? दागिने सांडले तर तुला भरून नाहीं कां द्यावे लागणार ?

**म्हाळसा:**—अग भिऊं नको अशी. सांडले तर मी भरून देईन. भरून द्यायलाच पाहिजेत. विचार या लंबोदरालाच तें सांडले, चोरीला गेले कीं नाहीं तें ?

**लंबोदर:**– होय तर ! ते सांडले, सांपडत नाहींत याला मी साक्ष देईन.

**म्हाळसा:**—बाळ नीले, एकादेवेळीं होतंच असं. ठेवला जिन्नस सांडतो म्हणून ! ते असं मनाला कां लावून ध्यायचं ? शहाण्या माणसानं धीर धरायला शिकलं पाहिजे. येवढी चोरी झाली पण मी आहे कीं नाहीं शांत ? रडले, कुढले तरी काय ? सांडलेला जिन्नस परत कां येतो ?

**नीला:**—तर तर ! तुला शांत न राहायला काय झालं ! दागिने गेले ते माझे, तुझे नव्हे. दुसऱ्याचे दुःख पाहून कुणालाही धीर धरतां येतोच कीं.

**म्हाळसा:**—अग होय. मी धीर धरला आहे, कारण ते सांपडायची आशा माझी अजून संपली नाहीं. बरं. दागिने नाहींत तर त्याऐवजीं माझी लुगडीं पातळें नेस. माझे जिन्नस घाल अंगावर.

**नीला:** – मला नाहीं आवडत ते तुझे जिन्नस.

**म्हाळसा:**—तें कां ? मी काळसर आहे तरी ते मला शोभतात. आणि तूं तर माझ्याहून अधिक गोरी आहेस. शोभलेच पाहिजेत तुला ते ! देतेच मी ते हं तुला काढून. [ म्हाळसा जाते. ]

**नीला:**—काय जळला मेला त्रास ! माझे चांगले दागिने हरवते आणि मला म्हणते आपलं किडूक मिडूक घाल.

**लंबोदर:**—नीले, वेडी आहेस, किडूक मिडूक देती ते नको म्हणूं नकोस. मी सांगतो तुला कीं हे चोरीला गेलेले तुझे दागिने तुला खचित

परत मिळतील. त्याच्या भरीला हे किडूक मिडूक फुकट्यांत मिळणार घेईनास कां ? [ तिच्या जवळ जाऊन कानांत सांगतो ] घे मुकाट्यानें काय देती आहे ते, जा हातीसिंग सांगेल तुला सगळं खरं खरं, मी इथं आईला पाहून घेतो.

**नीला:**—खरंच असं कांहीं आहे कीं काय ? माझा गुणाचा लंबो-दर ! तुझ्या जिवावर माझा निभाव आहे सारा.

**लंबोदर:**—नीले, वेडे जा पळ धांव मार. आई कशाला आंत गेली माहिती आहेना ? दागिने हुडकायला आणि आणायला. पण नीला, टेवल्या-जागीं ते थोडेच सांपडणार आहेत. मी त्याचा केला आहे बंदोबस्त. फुकट नाहीं साक्ष द्यायला तयार झालों. दागिने सांडले म्हणून. आत्तां ती परत येईल बघ. खरोखरच दागिने गमावलेले पाहून आणि मग इथं घालील थैमान कडकलक्ष्मी सारखं.

[ म्हाळसाबाई आक्रोश करीत येते ]

**म्हाळसा:**—धांवा धांवा, चोरी झाली. पेटी फोडली चोरानं. दागिने गेले. आता काय करूं आपलं कपाळ ! कोण मेला वैरी पाळतीवर होता कुणाला ठाऊक ! मी दागिने सांपडत नाहीं म्हणायला आणि ते खरेंच चोरीला जायला कशी एकदम गांठ पडली.

**लंबोदर:**—[घाबरल्याचं ढोंग करून] काय काय आई, काय झालं ? घरांतलं कुणी माणूस तर दगावलं नाहींना ? तूं ओरडतीस त्यावरनं कांहीं तरी मोठा घांत झालेला दिसतो.

**म्हाळसा.**—होय रे लंब्या, अगदीं घात झाला. चोरी झाली. दरोडा घातला. पेटी फोडली. दागिने गेले आतां मी काय करूं ?

**लंबोदर:**—छत् बोलू नको अगदी (हसून) मोठं छान नाटक चालविलं आहेस तूं. देवा शपथ अशी चांगली बतावणी मी पाहिली नव्हती कधीं. खरच सांगतीस ना दागिने चोरीस गेले म्हणून !

**म्हाळसाः**—होय रे कारट्या. खरं खरं म्हणून आणखी अधीक जीव तोडून ते कस सांगू. खरेंच दागिने चोरीस गेले.

**लंबोदरः**—हं आईसाहेब. चालूं द्या असंच चालूं दे. मी तुझ्या बाजूनें साक्ष भरायची कबूल केली आहे ना. बोलाव मला साक्षीला. दागिने चोरीला गेले येवढंच म्हणायचं ना मी म्हणतो कीं कुणाही पुढं ! त्यांत काय अवघड. येवढच नव्हे तर कुणी चोरले हेंहि मला पक्कं माहीत आहे. [हंसतो]

**म्हाळसाः**—जळलं मेल्याच तोंड ! आतां याला हें खरं म्हणून पटायला प्राण देऊ कीं काय ? हा गाढव सगळं आपलं थट्टेवारी न्यायला पाहतो आहे. कारट्या, ही थट्टा नव्हे, नाटक नव्हे, खरेंच दागिनें चोरीला गेले.

**लंबोदरः**—मग त्यांत काय. नाटक करून दाखवायला सुद्धां डोळ्यांतन पाणी काढावं लागतं. बरोबर ! ओरड आणखी थोडी. रड थोडी. म्हणजे कुणाला तुझा म झा संशय यायचा नाहीं. तूं छाती बडीव मी साक्ष देतो

**म्हाळसाः**—आतां आई काय करावं ? इकडं चोर भेटला. अन् इकडं असा हा मुलगा भेटला !

**लंबोदरः**—होय कीं ! त्यालाहि पण मींच साक्ष.

**म्हाळसाः**—घोडक्याची साक्ष. घालवून देईन घरांतनं. केवढं मोठं नुकसान झालं या मेल्यानं म्हणजे माझं. आणि हा कारटा आपला दांत काढून हांसायला तयार वरती!

**लंबोदरः**—होय त्यालाही पण मीच साक्ष ! कबूलच केलं ना साक्ष द्यायची ! मग नाहीं म्हणून कसं होतं [तो पळून जातो. ती त्याच्या मागून धांवते. मंजुळा आणि दासी गजी येते ]

मंजुला:--काय तरी नेम धारिष्ट या लंबोदराचं! आमच्या या बंधुराजांनीं घरच्या पाहुण्यांना खानावळ म्हणून सांगून आमच्या घरीं पाठविलं याहून आणखी धारिष्ट काय ते असणार?

गजी:--आणि ताईसाहेब, तुम्ही हा असा साधा पोषाख केला आहे। ते पाहून या पाहुण्यांना खरंच वाटल कीं तुम्ही पाट पाणी झाडलोट करणारी या खानावळातली कुणबीण आहां म्हणून! मला त्यांनी विचारलंच असं होय ना म्हणून.

मंजुला--बरी झाली गमंत म्हणायची. आतां तिचाच थोडा उपयोग करून घेऊं झालं. गजे, सांग ना मी खरीच कां दिसते खानवळींतल्या कुणबिणी सारखी.

गजी--होय तर! घर-कामाचा तुमचा हाच पोषाख असतो नेहमीं.

मंजुला--मला वाटते या मुरलीधरानें माझं तोंडही धड अजून अजून पाहिलं नाहीं आम्ही भेटलों तेव्हां माझा पोशाख असा नव्हता. पण तोंड न पाहिलं तर माणसाची ओळख काय रहाणार. आम्ही थोडं नाहीं बोललों एकमेकांशीं. माझ्या डोक्यावर पदर होता हें कांहीं खोटं नाहीं. तरीपण या गृहस्थानं एकदासुद्धां वर तोंड करून माझ्याकडं पाहिलं नाहीं हें मात्र खरं.

गजी:--पण ताईसाहेब, यांना असें भ्रमांत ठेवून तुम्हांला काय मिळणार?

मंजुला:--या गृहस्थाचा जसा स्वभाव तसं त्यांशीं वागलं पाहिजे.

गजी:--तें कसं!

मंजुला: --सभ्य स्त्री भेटली कीं खालीं मान घलाणाऱ्या या गृहस्थाची मान वर कशी होईल सांग बरं.

**गजा**:—हां समजलं. त्याला वाटलं पाहिजे कीं आपण जिच्याशीं बोलतों ती बाई कांहीं सभ्यांतली नाहीं. आहे नोकर, चाकर, कुणबीण, माळीण, फेरीवाली अशी कुणीतरी !

**मंजुळा**--बरोबर ! म्हणूनच या चाकर वेषाच्या पोषाखानं आतां मीं त्याला भेटेन. म्हणजे माझं तोंड तो डोळे भरून पाहील. आणि तसं झालं म्हणजे मीं त्याला जिंकलं म्हणून समज. वर मान करून दोघं बोलूं लागलों म्हणजे मोकळ्या मनानं बोलणं होईल. आणि या स्वारीचं खरं अंतरंग कळेल.

**गजा**:—पण ताईसाहेब मोलकरणीचं सोंग पोशाखानं घेतलं तरी बोलणं मोलकरणीसारखं साधलं पाहिजे ना ?

**मंजुळा**:—तें आहे मला माहित. हें बघ मी आतां बोलूनच दाखवतें तुला ! ( तसा आवाज काढून बोलून दाखवते )

**गजा**:—ठीक ठीक सोंगाची बतावणी बरीच केलीत कीं ताई-साहेब ! मला वाटलं कीं माझी मैतरण रखमीच बोलती हाये जणुं. पण हे बगा पाहुणंच आलं—

( मुरलीधर येतो )

**मुरलीधर**:—कोण गडबड या घरांत जावं तिकडं ! स्वस्थपणा म्हणून कसा तो नाहींच ! एक क्षणभरहि निवांत वाटत नाहीं. बाहेरच्या खोलींत जावं, तर मालकसाहेब बसले आहेत वाट पाहात ! ते आपल्या गोष्टीचं चऱ्हाट वळायला सुरू करतात. आंतल्या खोलींत जावं तर तिथं म्हाळसाबाई आहेतच तयार पायापर्यंत लवून नमस्कार करायला. चला आतां एक क्षणभर असा मिळालेला दिसतो कीं इथं दुसरं कुणी नाहीं. स्वस्थ विचार करायला सांपडेल पुढच्या बेताचा. ही मंजुळा फारच गंभीर आणि भावनाप्रधान दिसते. मग इचं माझं कसं जमणार ?

मंजुळाः—(कृत्रिम बनावट आवाज काढून) कुणी आपण कां हांक मारली कुणा नोकर माणसाला ? ( थेट मुरलीधरासमोर जाऊन धीटपणं उभी राहते )

मुरलीधरः—(तंद्रीत) नाहीं. नाहीं. मी नाहीं हांक मारली कुणा नोकरा चाकरांना ! मी वर मान करून क्षणभरचं तिच्याकडं पाहिलं तेव्हां वाटलं कीं ती किंचित् तिरळ्या नजेरची असावी. मग खरं काय कुणाला ठाऊक ?

मंजुळाः—घंटा वाजल्याली ऐकली साहेब !

मुरलीधरः—(तंद्रींत) जाऊंदे झालं. बाबांना खूष करायला इकडं आलों. आतां मला स्वतःला खूष करायला इथून उद्यां निघून जावं झालं. (कागद काढून वाचतो)

मंजुळाः—आपुण न्हाई तर दुसऱ्या कुणीबी असंल कदाचित्. पण न्हाई. वाटतं आपणच बलावलं मला.

मुरलीधरः—(तंद्रीत)नाहीं हो तसं कांहीं.

मंजुळाः—असं नका करूं साब. आमच्या हतंच नोकर चाकर अडाणी हायती. याद करून सांगा नीट. म्हटलं आपलं काम अडाया नगं.

मुरलीधरः—नाहीं हो नाहीं. (वर मान करून मंजुळेकडं पाहिल्यावर )हं हं. थांब थांब. होय मीच हांक मारली होती. अन् तीहि पण तुलाच हाक मारली होती. थांब थांब ग जाऊं नको. अहाहा ! देवानं तुला हें किती सुंदर रूप दिलं आहे. वा !

मंजुळाः—असं नका साहेब. मला लाजून मरायला व्हईल.

मुरलीधरः—छेः छे, काय ही मारू गहिरी नजर ! काळजांत कशी तीरासारखी घुसते आहे.

मंजुळाः—काम नसलं खरं, तर मी आपली जाते कशी !

**मुरलीधरः**—छे जायचं नाहीं तूं. हो हो. काम आहे तर तुझ्याशीं. नाहीं कसं. हें पहा मी विचारणार होतो कीं या घरांत तें-हें-तें-हें आहे काय? असलं तर थोडं आणून दे पाहूं.

**मंजुळाः**—पण तें हें काय, तें समजलं पाहिजे ना मला. मला वाटतं-आपलं तें हें संपलं आहे घरांतलं, आज पंधरा दिवस.

**मुरलीधरः**—असली कसली ही खाणावळ? मागावा तो जिन्नस मुळीं मिळतच नाहीं.

**मंजुळाः**—पण काय तो सांगाना साहेब. पाहीन मिळतो कां?

**मुरलीधरः**—हां सांगतो घे. हें तुझ्या ओठांतलं अमृत. वाटतं कीं एकदा चाखून पाहावं थोडं!

**मंजुळाः**—अमृत! अमृत तें काय देवा? आम्ही तसलं कांहीं प्यायचं-निशापाणी-इथं ठेवीत नसतों. तुम्ही म्हणतां तें कांहीं वेगळंच दिसतं. मी आज अटरा वर्षं इथं या घरांत नोकरी करते. पण व्हटातलं अमृत कीं काय तें नाहीं ठावं हतं कुणालाबी! आपण म्हणतां तें नागपुरी संत्र्याचं पाणी. रस तर न्हवं?

**मुरलीधरः**—होय होय. संत्र्याच्या फोडीसारखे लाल ओठ हे तुला देवानं दिले आहेत त्याचा रस-मी म्हणत होतों. ( ती जाऊं लागते ) अग थांब, थांब अशी जाऊं नको. पण काय ग, तूं या घरीं अठरा वर्षं काम करती आहेस असं म्हणालीस-म्हणजे काय जन्मायच्या पूर्वीपासनं? लबाड नाहीं तर! तुझं वय सतरा देखील नाहीं-मी सांगतों. सांग बरं खरंच तुझं वय किती आहे?

**मंजुळा.**—वाः साहेब. बायकांना कां कुठं आपली उमर ठावी असती? आन् ठावी असली तरी खरं कोण सांगेल?

**मुरलीधरः**—न सांगितलं तरी हुडकून काढतां येतं कीं! ये पाहूं अशी जवळ. म्हणजे थोडं पहातों. ( ती पुढं येते )- छे, छे, तुझं वय

चाळीस असावं. पण नाहीं -फिरून जरा पुढं ये—हां, आतां वाटतं तुझं वय पंचवीस नाहींतर वीस असावं. ( तिच्या हनुवटीला हात लावण्याकरतां पुढें करतो )

**मंजुळाः**—ई काय पाव्हणं, व्हा दूर. अशी बेअदबी नाहीं चालायची माझ्याशीं ! मी काय घोडी आहे कीं माझं दांत पाहून माझं वय सांगाल ?

**मुरलीधरः**—अग, वयाचं राहो, तूं अगदींच तिऱ्हाइतासारखं वागतेस ! जवळ ये जरा. तुझ्या सारख्या माणसाची थोडी ओळख असावी. दुरून कशी होईल ?

**मंजुळा :**—हवी कुणाला तुमची ओळख व्हायला ? नकोच मला असल्या माणसाची ओळख. मघाशीं आमच्या ताईसाहेब तुमच्या म्होरं आल्या व्हत्या तवां बोललां कां त्यांच्याशीं नुसती मान तरी वर करून ? आणि आतां मी आलें तुमच्या म्होरं, तर अशी दांडगाई करतां माझ्याशीं.

**मुरलीधरः**—( स्वगत ) अरे, हिनं मगाशीं पाहिलं होतं कीं काय ! ( उघड ) म्हणजे मी तिला भ्यालों असं म्हणायचं आहे कीं काय तुला ! कसली ती बेढब मुलगी. तिरळी काय बघते ! म्हटलं जाऊं दे, कोण तिच्याशीं ओळख करून घेतो.

**मंजुळाः**—पण बायका माणसांना तुम्ही लई आवडतां जणूं.

**मुरलीधरः**—हां. असें वाटतं खरं. त्यांनीं माझी मोठ्या गमतींचीं नांवें ठेवलीं आहेत लाडिकपणानं !

**मंजुळाः**—मग जा कीं त्या आपल्या बायाकडं. आम्हां नोकर चाकरिणीकडं कशाला बघतां अशा द्वाड डोळ्यांनीं ! तुम्ही आपल्या त्या बायांत लई मजा मजा करीत असाल नाहीं ?

**मुरलीधरः**—(स्वगत) अरे, हिनं माझा खरा स्वभाव ओळखला कीं काय ! ( उघड ) काय लबाड आहेस तूं. हंसते आहेस. काय तुझ्या मनांत आहे सांग पाहूं.

**मंजुळाः**—मनांत काय असायचं ! शहरगांवच्या बाया ! घरीं काम करायला नको. भाईर उनाडाला व्हावं. घरीं बसून काय शिवतील टिपतिल कां पोरांबाळांकरतां चार अंगडीं करतील. त्ये नाहीं कांहीं व्हायचं. उगाच कळपांत जाऊन पाय तणावून खुर्च्यांवर बसत्याल, हातरुमाल काढून तोंडं पुसत्याल, खात्याल. पित्याल, अन् चटोरपणाच्या गोष्टी बोलत्याल. अशा या तुम्ही तिकडच्या शहरगांवच्या बाया.

**मुरलीधरः**—अरे वा ! तूं घरचं काम करतीस. शिवति–टिपतीस वाटतं ? कां कशिदा काढतीस ? तसलं कांहीं केले असलंस तर मला दाखीव ना मला यांतलं फार कळतं बरं कां. मी सांगून देईन तुझं बरोबरं चुकलं तें. ( तिचा हात धरण्याचा प्रयत्न करतो. मी झिडकारून दूर जाते )

**मंजुळाः**—हां दाविन कीं कांहीं बाहीं तुम्हांसनी कळत असलं तर. पण या मेणबत्तीच्या दिव्यानं तें नाहीं चांगलं दिसणार. दाविन उद्यां सकाळींच, नाहीं तर दुपारीं.

**मुरलीधरः**— नाहीं ग मला आतांही दिसतं कीं नीट. नाहींतर मी तुझं रूप पाहून-( तिचा हात धरतो )

( खंडेराव येतो )

अरेच्या, मालकसाहेबांची स्वारीच आली कीं ! आणि यांनीं पाहिलं कीं काय ?–( पळून जातो )

**खंडेरावः**—मंजुळा, हेंच कां तूं सांगितलेंस ते विनयी, मुखस्तंभ गृहस्थ ! बरेंच विनयी आहेत कीं. म्हणे सर्व वेळ खालीं मान घालून होते ! दुरून बोलत होते. मंजुळे, मला असं फसविलंस काय ? कांहीं थोडी लाज, तुझ्या हनुवटीला त्यानं हात लावला, तुझा हात धरला, हें मी डोळ्यांनीं पाहिलं.

**मंजुळाः**—होय बाबा. खरोखरच ते भिडस्त आणि विनयसंपन्न आहेत. पुढं तुमची खात्री होईल मी सांगतें. माझी पूर्वीच झाली आहे.

यांचा जो दोष तुम्ही पाहिला त्याचीं कारणं आहेत. आणि तो दोष मीं घालवूं शकेन.

**खंडेराव:**—मला तर वेड लागण्याची पाळी आली त्याच्या वागण्यानं. इथं येऊन तीन तासहि झाले नाहींत तोंच त्यानं मला माझ्या मालकीवरनं दूर करून या घराचा ताबाच घेतला म्हणेनास? याचा हा उद्धटपणा तुला आवडत असेल तर आवडून घे त्याला तूं. वाटेल तर विनय म्हण पण मला असला जांवई चालायचा नाहीं सांगून ठेवतो. मीं त्याला घरांतून घालवून द्यायचा विचार केला आहे.

**मंजुळा:**—पण बाबा याला एक दोन तासाची तरी मुदत द्याना.

**खंडेराव:**—ठीक आहे. देतों मुदत. पण त्यानंतर थांबणार नाहीं.

**मंजुळा:**—ठीक आहे. तुमचं मी ऐकलं नाहीं असं कधीं तरी झालं आहे का आजवर.

**खंडेराव:**—मग आतांहि तसंच होऊं दे.

भरत नाट्य संशोधन मंदिर
३१२, सदाशिव पेठ, पुणें २.

# अंक दुसरा

## प्रवेश ३ रा

[ हातिसिंग व नीला प्रवेश करतात ]

**हातिसिंग:**—काय म्हटलंस नीले, सर चिंतामणराव आज रात्रींच इथें येत आहेत? आणि हे तुला कसं कळलं.

नीळा:—त्यांचं पत्र खंडेरावांना आलेलं मी आतांच पाहिलं. तें म्हणे आमच्या मागोमाग स्वतः लवकरच निघाले इकडे यायला.

हातसिंगः—अरे, तर मग तुम्ही आम्हीं तें येण्यापूर्वीच निघून गेलं पाहिजे.

नीलाः—पण दागिन्यांची पेटी नीट सांभाळून ठेवली आहेतना!

हातिसिंगः—होय तर! आमच्या साऱ्या सामानाच्या किल्ल्या मुरलीधराजवळ असतात, म्हणून ती दागिन्याची पेटी मी त्याच्याजवळच ठेवायला दिली आहे. लंबोदरानें दोन ठाणबंद घोडे मला द्यायचे कबूल केलं आहे, तेव्हां आतां मी जातो. आणि त्याला पुढचा बेत कळवितो. [ जातो. ]

नील :—मग आहि पण हा थोडा वेळ कसातरी नीट काढलाच पाहिजे. म्हणजे काय? लंबोदराशी थोडींशीं दिखाऊ प्रेमाची झटपट करीत राहिलं पाहिजे.

[मुरलीधर येतो]

मुरलीधरः—ही दागिन्यांची पेटी हातिसिंगानें माझ्याकडे पाठिविली ती कशाला? ती मी कशी संभाळणार? कायरे, ए हऱ्या—हऱ्याचना नांव तुझं? ती मगाची पेटी तूं आपल्या मालकिणी जवळ, म्हाळसाबाईजवळ, नेऊन दिलीस ना? अगदीं तिच्या हातांत.

हऱ्याः—होय तर धनी. त्या म्हणाल्या " मी जी पेटी नीट संभाळीन म्हणून!' आणिक म्हणाल्या, " कायरे ही पेटी तुझ्या जवळ कशी आली? चोरीचा माल तुझ्या हातीं कुणी दिला." [ जातो ]

मुरलीधरः—कांहीं असो, पेटी सुरक्षित आहे. इथली बाकी सगळीं माणसं मोठीं तऱ्हेवाईक दिसतात. पण या एका मुलीनें मात्र मला जिंकलं खरं. काय होईल ते होवो, मी तिला आपलीशीं करणार. [ हातिसिंग येतो ] गड्या झालं काम फत्ते! विनय संभाळून देखील बायकांचें मन जिंकतां येतं!

हातिसिंगः—अरे वा! तूं तर मोठा खुषींत दिसतोस. अगदीं असं उदूं येऊन बोलतो आहेस तसं झालं आहे तरी काय!

मुरलीधरः—अरे. ती मुलगी असेल कुणी कुणबीण इथली! आपल्याला काय, किल्ल्याचा जुडगं हातांत घेऊन इकडून तिकडं एकाद्या स्वारी गिलोरी सारखीं तुरुतुरु धांवते, पळते ती! किती सुंदर, किती देखणी किती चपळ!

हातोसिंगः—मग तिचं काय?

मुरलीधरः—तिचं काय काय? झाली ना ती मला वश! काय डोळे, काय ओंठ! मोठी तेजस्वी पाणिदार आहे बच.

हातिसिंगः—मग ती तुझी झाली कशावरून म्हणतोस?

मुरलीधरः—वा. उद्यां सकाळीं ती मला आपलं सारं कलाकुसरीचं काम दाखविणार आहे. माडीवर बोलावून घेऊन! आणि त्यांत सुधारणा सुचवायचे आहे ते मीं तिला कबूल केलं आहे.

हातिसिंगः—मग सांभाळ रे बाबा, इथं आपण कशाला आलों हें ध्यानांत ठेव. तुझं लग्नाचं जमेल न जमेल तें पाहून घेऊं, पण भलती ब्याद गळ्यांत घेऊं नको.

मुरलीधरः—मी भलतं करणारा नाहीं. ही खानावळींतली कुणबीण झाली तरी मला पसंत पडल्यावर तिच्याशीं मी लग्न करीन. त्याला काय हरकत? सभ्यतेला सोडून मी कांहीं करणार नाहीं. माझी अब्रू मला आहेच कीं नाहीं? आतां मंजुळा कीं ही मुलगी एवढाच प्रश्न. कारण ही इथली कुणबीण असली तरी तिचं शील, तिचा विनय हीं मला मोहक वाटतात!

हातिसिंगः—ते झालं, पण दागिन्याची पेटी नीट ठेवली आहेस ना?

**मुरलीधरः**—ती नीट ठेवली आहे रे. पण ती माझ्याकडे कां पाठविलीस ते कळेना.

**हातिसिंगः**—ती नीट ठेविली आहेस म्हणजे काय केलंस ?

**मुरलीधरः**—थेट घरमालकीणीच्याच स्वाधीन केली. याहून सुरक्षित ठिकाण कोणचं ?

**हातिसिंगः**—भले बहादर ! सत्यनाश झाला. एका चोराच्या हातून निघून ते परत दुसऱ्या चोरांच्या हातींच पडले ते दागिने. असा कसा तूं अगदीं मूर्ख ! तिच्या जवळ ठेवायचे असते तर मीच नसते कां ठेवले ?

**मुरलीधरः**—वा ! वा ! मी अगदीं बजावून स्वाधीन केले तिच्या ! अगदीं नीट संभाळ म्हणून. लागतील तेव्हां परत घेईन असं निक्षून सांगितलं आहे. तूं मला वेन्धळा समजत असशील पण मी कसा पक्का आहे तो ! असल्या खानावळींत मालकिणीच्या कुलपापेक्षां अधिक सुरक्षित जागा दुसरी कोणती असणार ?

**हातिसिंगः**—[ स्वगत ] फसलं खरं सारं ! पण तें कसं हे या मूर्खाला इतक्यांतच सांगू नाहीं हे बरं !

**मुरलीधरः**—कायरे, तुला थोडीशी शंका आलेली दिसली ती कां ?

**हातिसिंगः**—नाहीं, ते कांहीं नाहीं. उगीच आपलं वाटलं थोडं ! ( स्वगत ) तात्पर्य काय, दागिने नशिबीं नव्हते हेंच खरं. त्यांची आशा सोडूनच आतां निघून गेलं पाहिजे. वाटतं कीं लेकाला शाप द्यावा. माझं फसलं तसं तुझंही फसूं दे म्हणून. पण जाऊं दे. [ हातिसिंग जातो. खंडेराव येतो. ]

**खंडेरावः**—या घरचा मालक मी आहे कीं दुसरा कोणी आहे हेंच कळेनासं झालं आहे. सगळं कसं उलटं पालटं झालं आहे. या पाहुण्यांचे नोकर, लेकाचे दारु पिऊन अगदीं तर्र झाले आहेत. या मुरलीधराला थोडं सटकावलंच पाहिजे. [ उघड ] पाहुणेसाहेब, यावं, ठीक आहे ना सारं ?

मुरलीधरः—हो, नसायला काय झालं ? खानावळींत मनाला हवी तशी व्यवस्था करून घ्यायला मी शिकलोंच आहे. येवढा युरोपचा प्रवास काय उगंच केला ?

खंडरावः—मी प्रथम तुमच्याबद्दल नाहीं बोलत, पण तुमच्या नोकरांच्या दारू पिण्याबद्दल.

मुरलीधरः—म्हणजे ते थोडी पितात हीच ना तक्रार ? गाढवांना कळायला पाहिजे कीं ही खानावळ आहे. दारुचं बील अधिक झालं पाहिजे. बिल देणारा मी आहे. मग आणखी थोडी ढोसायला यांच्या बापाचं काय जातं ? कोण आहेरे तिकडे, बारक्या, ये इकडे पाहूं. [ नोकर येतो ] कायरे लेकांनों, तुम्हांला सांगितलं नव्हतं कां माझ्यावाटची तुम्हीच दारुं प्या म्हणून ?

खंडरावः—भले ! म्हणजे तुमच्या हुकमानंच हे इतकी दारु पिऊन धुंद झाले आहेत म्हणायचे ?

मुरलीधरः—अहो, मी समजत कां नाहीं ? त्यांना कमी प्यायला मी कसं सांगेन ? आडवळणाची तुमची ही खानावळ. आमच्या सारखं गिऱ्हाईक क्वचित् यायचं. ते खूप खाल्ले, प्याले तरच तुमचा निभाव लागायचा !

खंडरावः—[ स्वगत ] आतां काय करावें या नशिबाला !

[ दारुनें झिंगलेला एक नोकर येतो. ]

नोकरः—नाहीं धनी, आम्ही नाहीं कांहीं कमी केलं. इतकंच कीं खाना खायच्या आधीं नाहीं प्यायलों. जेवल्यावर मात्र पोटभर प्यायलों. कांहीं बाकी ठेवली नाहीं धनी !

मुरलीधरः—झालं ! पहा मी सांगतों तें खरं कीं नाहीं तें ! तुमची दारु थोडी कां खपिवली यांनीं ? अगदीं झिंगले आहेत पहा. आतां शेपटी धरून

उंदराला पाण्यांत बुचकळतात तसा या लेकाला दारुच्या पिपांत बुचकळायचा तेवढा राहिला आहे ! अहो, माझ्यासारखा माणूस तुमच्या बिलाची कां पर्वा करील ?

**खंडेराव:**—( रागानें ) झाला ! कडेलोट झाला ! याच्या उद्धटपणाला सीमा राहिली नाहीं. आपलं अन्तरंग प्रकट केल्याशिवाय आतां निभाव नाहीं. अहो मुरलीधरराव, बस झाला हा तुमचा फाजिलपणा ! मी या घरचा मालक आहे आणि मालक म्हणून तुम्हांला सांगतो कीं तुम्ही आणि हे तुमचे दारुडे नोकर इथून एकदम चालते व्हा पाहूं.

**मुरलीधर:**—तें कां हो मालकसाहेब ? आमची अशी थट्टा कां करितां ? तुमचं बिल पुष्कळ व्हावं तें सारं मी करतोच आहे कीं नाहीं ? मला कळत कां नाहीं ते !

**खंडेराव:**—तें कांहीं नाहीं. चालते व्हा पाहूं.

**मुरलीधर:**—वा मालक ! चालते व्हा आणि अशा रात्रीं ! उगाच आमची थट्टा करतां आहांत झालं.

**खंडेराव:**—आतां काय करावं या धटिंगणांना ! अहो, मी अगदीं तुम्हांला खरं सांगतो आहे. जीव तोडून सांगतो आहे. तुम्ही सारे चालते व्हा. घर माझं आहे. यापुढें एक क्षणभर देखील मला तुम्हांला इथं ठेवून घ्यायचे नाहीं !

**मुरलीधर:**—आहे, आहे. समजलं, हें घर तुमचं म्हणतां काय ? खानावळ म्हणजे बोलून चालून सार्वजनिक जागा ? कोणी तिथं जाऊन बसला कीं तोंच मालक त्या वेळेपुरता ! बिल असेल ते दिलं म्हणजे झालं ! असं पहा, टांग्यांच्या अड्ड्यावर टांगा उभा असतो त्यांत हवं त्यानं जाऊन बसावं, नियमाप्रमाणं भाडं दिलं म्हणजे झालं ! टांगेवाल्याला नाहीं म्हणतां येत नाहीं. तसं तुमचं खानावळीचें, दुसरं काय ? उद्धट कोण मी कां तुम्ही !

**खंडेराव**:—झालं. आतां हंसून बोलल्याशिवाय बाकीच उरली नाहीं. बरं आहे मालकसाहेब, हें घर तुमचं. चला, उचला यांतलं काय काय सामान पाहिजे ते ! मी नाहीं कोण म्हणणार ?

**मुरलीधर**:—समजलं समजलं ! चला आणा पाहूं तुमचं बिल ! काय तें आत्तां देऊन टाकतो.

**खंडेराव**:—कां घाई कां ? इथलं सामान उठवा ना हवं तें. घर तुमचं आहे.

**मुरलीधर**:—उगीच वटवट काय लावली आहेत हो ? तुमचं बील काय असेल तें आणा म्हणतोना.

**खंडेराव**:—( स्वगत ) आतां कमाल झाली. आमचा असा पाहुणचार घेऊन वरतीं हा मला खाणावळवाला म्हणतो. डोकं फिरलं कीं काय याचं ? पण जाऊं दे. या लेकाचा बापच आतां येईल. मग होईल निवाडा. काय उद्धटपणा ! काय मुसंडी ! नुसता डुक्कर आहे ! [ जातो ]

**मुरलीधर**:—(स्वगत) अरे हा गृहस्थ काय म्हणाला ? मी या घराला खानावळ म्हटलं तें चुकलं कीं काय ? दिसतं तर सगळं खानावळीसारखं ! सामान, नोकरचाकर, सगळी शिस्त खानावळीची दिसते. बरं चला, ही आली हिलाच विचारूं [ मंजुळा येते ] अहो अहो, इतक्या घाइनं कुठं चाललां ? ये ना इकडे. आणि सांग बरं मला थोडं.

**मंजुळा**:—विचारा, पण अगदीं थोडं. मला आहे घाई. [ स्वगत ] यांची चूक यांच्या लक्षांत आली कीं काय ? खजील झाल्यासारखे दिसतात ! चेहऱ्यावर–पण जाऊंदे थोडा वेळ आणखी.

**मुरलीधर**:—ए, सौंदर्यशालिनी, सुंदरी, अग, सांग तरी मला हें घर कुणाचं. तूं कोण ? इथ काय काम करतेस ?

**मंजुळा**:—काय काम करतेस ? घरमालकांची आणि मालकीणीची मी अगदीं जवळची नातलग आहे. या किल्ल्या पहाना. मी सगळं

संभाळते. त्यांचा माझ्यावर पुरा विश्वास आहे. आणि माझं पहिलं काम हे कीं इथं पाहुणे येतील त्यांची सगळी बरदास्त नीट ठेवायची.

**मुरलीधरः**—म्हणजे नोकरांतली मुख्य कुणबीण म्हणून ना या खानावळीतली !

**मंजुळाः**—[ आश्चर्यानें ] अय्या ! कुणी सांगितलं तुम्हांला खानावळ म्हणून ! आता जुलूम झाला म्हणायचा ! या दहा वीस कोसांत आमच्या घराएवढं जुनं मातबर घराणं दुसरं एकही नाहीं. कुणी चांडाळानें भरवून दिलं तुमच्या डोक्यांत, कीं ही खानावळ म्हणून ! मला वाटलं माझे बाबा खंडेराव तुमच्या ओळखीचे असतील.

**मुरलीधरः**—झालं ! केवढा मी गाढवपणा केला. आतां किती तोंडांत मारून घेऊं ? घात झाला ? फसविलं मला ! ! कोण ही माझी बेअब्रू ! खंडेराव म्हणजे आमच्या बाबांचे दोस्त. माझी चूक बाबांना कळून आली म्हणजे ते मला काय म्हणतील ? मला नांव ठेवायला त्यांना शब्द तरी मिळेल कां ? आणि हे सुंदरी, तुला मी खानावळीतली कुणबीण म्हटलं ! आतां या भोगाला काय करावं ?

**मंजुळाः**—पण माझ्या वागणुकींत तुम्हांला तसं कांहीं दिसून आलं कीं काय ? एरवीं तुम्ही तरी अशी चूक कशी कराल ?

**मुरलीधरः**—छे छेः, तुझ्या वागणुकींत तसं कांहीं नव्हते. माझेच डोळे कपाळावर उलटे लागले म्हणायचें ! मी घसरत चाललों चुकांच्या खाईत, त्यांत तूं सांपडलीस ! तुझं प्रांजलपणाचं वागणं निष्पाप होतं. पण मी अधमानें त्याचा अर्थ भलताच केला ! आतां हें काळं तोंड लपवूं तरी कोठें !

**मंजुळाः**—आतां काय तरी बाई करावं ? आपण इतके सभ्य संभावीत. माझ्यामुळं यांना घरांतनं जावं लागलं म्हणजे मला केवढं पाप

लागेल ? माझ्या पदरीं केवढा तरी दोष येईल ? ( रडूं लागते ) आणि शिवाय माझी बाहेर बेअब्रु व्हायची ? लोक माझ्या अन् यांच्याबद्दल कांहीं बाही बोलूं लागतील.

**मुरलीधरः**—अरे ही रडूं लागली. आतां कसं ? अशा संभावित स्त्रीकडनं मला इतक्या सदयतेची वागवणूक मिळाली आणि मी तिचा घात केला ? मंजुळे, या घरांतून जावं लागलं तर तें तुला सोडून जावं लागतं एवढ्या करितांच वाईट वाटेल. माझ्यावर विश्वास ठेवून तूं वागलीस त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे ! आणि म्हणूनच मला तुझा विश्वासघात करण्याची इच्छा नाहीं. तरी पण आपली कुटुंबस्थिती पाहिली म्हणजे मला तुझ्याशीं लग्न करतां येत नाहीं. म्हणूनच मी केली याहून अधिक खेळी-मेळी तुझ्याशीं करूं इच्छित नाहीं. तूं सुंदर आहेस हा कांहीं तुझा दोष नाहीं स्वभावानं साधी, प्रेमळ, प्रांजळ आहेस त्याचा फायदा मी घेऊं इच्छीत नाहीं.

**मंजुळाः**—पण असं कां म्हणतां ? कुटुंबस्थिति म्हणजे काय ? मी घरची गरीब आहे एवढंच ना ? पण एरवीं समाजाच्या दर्जाच्या दृष्टीनं मी खंडेरावाच्या मुलीच्या योग्यतेची आहे.

**मुरलीधरः**—छेः, मी अधिक इच्याशीं बोलत राहीन तर मी मोहांत पडेन. मला सुटका करून घेतलीच पाहिजे.

( जातो )

**मंजुळाः**—किती थोर मनाचा माणूस आहे हा ! मी बरा याला हातचा घालवूं देईन ? अजूनहि थोडा वेळ मी खाणावळीतली कुणबीण असं याला दर्शविलं पाहिजे. पण बाबांना मात्र याची काय चूक झाली आहे तें समजून सांगितलं पाहिजे. नाहीं तर कायमचा घोटाळा व्हायचा !

( लंबोदर व नीला येतात )

**लंबोदरः**—हें पहा नीले. मी एकदां तुझे दागिने काढून आणले. ते तुझ्या त्या वेंधळ्या मुरलीधराच्या चुकीनं परत आईच्या हातीं गेले. तेव्हां आतां ते पुन्हा चोरायचे तर पाळी तुझी. तरी बरं, अजून तिला खरं काय ते माहीत झालं नाहीं. ती समजते कीं यांत नोकर लोकांचीच कांहीं गफलत आहे.

**नीलाः**—जळोत ते दागिने! पण आम्ही-मी हातिसिंग-पळून जात आहों हें मात्र तिला कळतां कामा नये. नाहींतर मुळावरच घाव पडायचा! बोल लंबोदर, या कामीं तूं मदत करशीलना?

**लंबोदरः**—मी दोन चपळ तापट घोडे तुझ्या प्रियकराला दिलेच आहेत आणि तुम्ही पळून जाईपर्यंत आईला संशय येऊं नये म्हणून तुझ्याशी लाड-झगडा, प्रेमाचं नाटक चालूं ठेवतों. आणखी काय मदत करूं बोल. ( म्हाळसाबाई येते असं पाहून लाड-झगडा सुरूं करतात. )

**म्हाळसाः**—एकूण ती नोकरांचीच कांहीं चूक होती असंच दिसतं, चला या लंबोदराचं आणि नीलीचं लगीन लागलं म्हणजे मी सुटलें. मग दागिने काय कायमचे माझ्या घरींच राहणार! आहे, ठीक चाललं आहे हें प्रेमाचं भांडण. काय पण अगदीं खबूतरासारखीं एकमेकांना टोंचतात, बोंचतात भांडतात अन् पुन्हां एक होतात.

**लंबोदरः**—कांहीं नाहीं ग आई. पण ही नीलीटली माझ्या खोड्या करते विनाकारण, म्हणून मला तिला थोडं दटवावं लागलं इतकंच! पण त्यामुळं आमचं प्रेम कांहीं कमी होत नाहीं, आई.

**म्हाळसाः**—बरोबर आहे. थोडा फुंकर घातला म्हणजे विस्तव न विझतां अधिक पेटायचाच!

**नीलाः**—पण मी त्याच्याशीं कां भांडते आहे माहीत आहे कां तुला? मी त्याला म्हणते आहे कीं तूं घराबाहेर फार राहतोस. तो राहात

जाऊं नकोस. तूं बाहेर गेलास म्हणजे मला एकटीला कसं करमणार? नाहीं ना बाहेर जाणार यापुढं लंबोदर?

**लंबोदर:** अस्सं! हंसत हंसत बोल माझ्याशीं! म्हणजे मला बरं वाटतं. मग मला तरी बाहेर जाऊन काय करायचं आहे?

**नीला:**—मावशी, लंबोदर हंसतो त्यावेळेस किती पण सुंदर दिसतो म्हणून सांगूं? आणि लंबोदरहि कांहीं कमी सुंदर नाहीं. शिवाय त्याचा स्वभाव पण किती किती विनोदी आणि खेळकर आहे मावशी. मला फारच आवडतो तो! तोंडावर काय लाली? गाल कसे पुरीसारखे फुगले आहेत! ( त्याच्या हनुवटीला हात लावते. )

**म्हाळसा:**—गरीब ग गरीब बाई माझा लंबोदर. कुणाची खोडी म्हणून कधीं काढायचा नाहीं.

**लंबोदर:**—आई पाहिलीस कां नीलीचो ही बोटं किती लांब बारीक आणि सुंदर आहेत तीं! ती बाज्याच्या पेटीवरन फिरूं लागलीं कीं वाटतं गिरणीच्या चात्याच फिरताहेत!

**म्हाळसा:**—इतका गरीब आहे माझा लंबोदर कीं झाडावरचीं पाखरं सुध्दां विश्वासानं त्याच्याजवळ येतात. अगदीं बापासारखा मुलगा निपजला आहे. त्याला पाहिलें म्हणजे मला त्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं! नाहीं तर, हे हल्लींचे. सदा रागांत आणि कुऱ्यांत. बाळ, उद्यांच करून टाकूं हां तुम्हा दोघांच लग्न. म्हणजे दागिने पेटींतनं काढून अंगावर घालायला सुरवात होईल. याला शिक्षण हवं आहे कशाला घरचं? आहे तेवढं पुरे. ( दिग्या येतो )

**दिग्या:**—छोटे धनी! हें घ्या पतर.

**लंबोदर:**—दे तें आईजवळ. माझ्यापेक्षां तीच तें अधिक चांगलं वाचील.

दिग्या:—त्ये पाव्हणे म्हणाले कीं पतर छोट्या धन्यांच्याच हातांत दे. दुसऱ्या कुणाजवळ देऊं नको.

लंबोदर:—कुणी दिलं हे तुझ्याजवळ?

दिग्या:—त्ये त्या पत्रांतच लिहिलं असल न्हवं कां? मला कशा-पाई इचारतासा?

(लंबोदर पत्र उलथं पालथं करून पाहतो. तें नीलेच्या दृष्टीस पडते.)

नीला:—(स्वगत) झालं! फसलं! हतीसिंगाचं पत्र. अक्षरावरूनच मीं ओळखलं. तें मावशीच्या हातीं पडतां कामा नये (उघड) मावशी, इकडं ये जरा. ते मुरलीधर यांच्याविषयीं काय काय बोलत होते, तें सांगतें बघ.

लंबोदर:—हें काय अक्षर कीं कुत्र्या मांजरांचे पाय? छापील अक्षर कसं छान मोठं ठळक असतं. तेंहि मला वाचतां येत नाहीं. तर मग हें मी कसं वाचणार? अहाहा, लिहिणारा बेटा चित्रगुप्ताचा बाप दिसतो. साधीं अक्षरं काढायचीं त्याला या लपेटी, काने, कोपरे, फाटे इतके हवे कशाला? पण मग लिहिणाराची फर्डेशाही कशी दिसावी? पत्रावर माझं नांव आहे म्हणूनच तें मला थोडसं तरी वाचायला येतं (पत्र फोडून) पण आंत पहा हें सारं मोहोळावर काळ्या मधमाशा बुजबुजल्या सारखं. हें कुणी लेकानं वाचावं! पण (हंसून) मजकूर तर सारा त्यांतच असतो ना? मोठी भानगड झाली.

नीला:—अन् किनही मावशी, लंबोदरानं त्या मुरलीधराला असं पण गुंगवलं कीं——

म्हाळसा:—पण तो बघ पत्र वाचतां येईना म्हणून आतां स्वतःच गुंगून गेला आहे.

लंबोदर:—दारू प्यायलेल्या माणसाच्या झुकांड्या जातात तें मला माहीत आहे. पण बेटी हीं पत्रांतली अक्षरं कशा अशा झुकांड्या खातात! (हंसतो)

म्हाळसा:—आण ना तें पत्र इकडं. तुला नाहीं वाचायला येत तर मी वाचतें. त्यांत काय आहे मोठंसं !

नीला:—( स्वगत ) अग बाई ! हें पत्र मावशीच्या हातीं जाऊन उपयोगी नाहीं. लंबोदर. आण तें इकडं. मावशीला तें वाचायचे श्रम कशाला ? ( पत्र तिच्या हातून हिसकावून घेते ) समजलं ! लंबोदर त्या चहा-वाल्याच्या दुकानांतल्या तुझ्या कोणा मित्रानं तुला हें पत्र पाठविलेलं दिसतं. यायचं होतं कां तसं कुणाकडनं ?

लंबोदर:—होय ना ! काल दुकानच्या पटांगणांत कोंबड्यांची झुंझ लावली होती ना माझ्या सोबत्यांनीं ! त्याचं असेल कांहींतरी लिहिलेलं.

नीला.—हं. तेंच आहे. त्या तुरेवाल्या रंगीत कोंबड्यानं झुंझ जिंकली असं लिहिलं आहे. दुसरं काय ? ( पत्र चुरगाळून लंबोदराच्या अंगावर फेंकते )

लंबोदर:—वा ग शहाणे. ही तर बातमी फार महत्वाची. मी त्या झुंझेवर पन्नास रुपयांची पैज लावली होती. त्यांतली हार कळायला नको वाटतं ? जाऊं दे आईच वाचून दाखवील मला.( पत्र म्हाळसाबाईला देतो. )

म्हाळसा:—( वाचते ) अग बाई, काय लबाड आहेस तूं ! नीले. ऐकलं कां या पत्रांत काय आहे तें ? ' प्रिय लंबोदर यांस—

(पत्र वाचते)

' रा. लंबोदर यांस,

बागेशीं गाडी उभी करून नीलेची वाट पहात होतों, परन्तु घोडे अजून ताजेतवानें झाले नाहींत, तरी एक नव्या घोड्यांची जोडी ताबडतोब पाठवून द्यावी. घाई करावी, नाहींतर तुमच्या मातोश्रींना, आजीबाईला शंका यायची. हें सर्व कसं निभावून जाईल या विचारानं डोकं भणाणून गेलं आहे.'

म्हाळसाः—अगबाई! असं आहे हें प्रकर्ण आणि नीलेनं भलतंच वाचून दाखविलं, बनावट मजकूर मनाचा रचून! आणि हा मला म्हणतो, "आजीबाई!" इतकी कां मी म्हातारी आहे?

नीलाः—माफ कर मावशी, इतक्यांतच रागाऊं नको. ऐकून घे, यांतलं खरं काय तें तुला लौकरच कळून येईल. कुणी कांहीं भलतंसलतं मनांत आणलं नव्हतं. फार तर त्याच्या मनांतून गाडींत बसून स्पेटीला जायचं असेल. निदान त्यांचा बोल तूं मला लावूं नको.

म्हाळसाः—( वेडावून दाखवून ) असं का बाईसाहेब? मोठ्या नवलाचं बोलतां तुम्ही! काय ही सभ्यता, काय विनय, आणि लंब्या, तुला हें सगळं माहित असून गप्प राहिलास कां त्यांच्या या कटांत? थांबा लबाडांनो, तुमचे सगळे कट एका क्षणांत मोडून टाकते पहा. येऊं देत ताज्या दमाचे घोडे. म्हणजे तेच जुंपून या कार्टीला गाडींत घालून नेते त्या तिच्या दुसऱ्या मावशीकडं! ती चांगली सांभाळील हिला. आणि तूं रे लंब्या, आपल्या घोड्यावर बसून आमच्या गाडीबरोबर ये. सगळे चाकर हरामखोर बनले आहेत. त्यांनींच दागिन्यांची चोरी केली. आणि या कटांतहि तेच सामील आहेत. पण काढते म्हणावं सगळ्यांची खोड. (जाते)

नीलाः—घात झाला बाई, सगळा.

लंबोदरः –होय झालाच झाला मग त्याचं काय?

नीलाः—या ठोंब्याला इतकं मी खुणावीत होते. डोळ्यांनीं हातांनीं इषारा देत होते. पण याच्या मठ्ठ डोक्यांत कांहीं शिरेल तर ना? केलान् मेल्यानं सगळा घात!

लंबोदरः—अहाहा! काय पण बोलली अवदसा. तिच्याच मूर्खपणामुळें हें सगळं फसलं आणि मला ठोंब्या म्हणून दोष देते.

( हातिसिंग येतो )

---

**हातिसिंगः**—भले बहाद्दर ! माझा नोकर सांगतो की, माझं पत्र तुम्ही आपल्या आईला दाखविलंत ? काय दोस्त, अशी आमची फजिती कां केलीत ? आतां हसूं कीं रडूं ? असा विश्वासघात करणं शोभतं कां तुझ्या-सारख्या आपल्या भल्या माणसाला ?

**लंबोदरः**—हां. आतां आले हे तिस्मारखान. विचार, विचार याच तुझ्या प्रियतमेला घोंटाळा कुणी केला तो. माझ्याकडं अगदीं दोष नाहीं. लबाडी करावी तर पक्की करावी. भोळसट नाहींतर ! पत्राचा मुद्देमाल नाहींसा करायचं सोडून भलतं भलतं वाचीत होती.

(मुरलीधर येतो)

**मुरलीधरः**—झाला ! घात झाला ! अब्रु गेली. मालकसाहेबांनीं जर आतां माझा अपमान केला, माझ्या तोंडावर थुंकले, मला हांकून दिलं तरी त्याना मी काय बोल लावणार ? हंसा म्हणावं सारे मिळून आतां मला ! केलाच मी तसा गाढवपणा मग कोणत्या तोंडानं त्यांना दोष देऊं ? या घराला खाणावळ म्हणणाऱ्या माझी अक्कल कुठें गेली होती ?

**लंबोदरः** —झालं. हे आले दुसरे वेडेपीर, मगाच्याच्या त्या दुसऱ्याच्या जोडीला ! गळ्यांत गळा घालून रडा म्हणावं दोघेही. आज झालं तरी काय ? वेड्यांचें इस्पितळांतले सगळे लोक बाहेर पडले कीं काय ?

**नीलाः**—आणि आम्हां सगळ्यांचा घात या लंबोदरानं केला. बघा ना, बाळ पराक्रमी किती ते !

**मुरलीधरः**—तुमचा घात केलान् तसाच माझाही. खाणावळ म्हणून हें घर दाखवून मला यानेंच गाढव बनाविलं. असं वाटतं कीं बुटासकट चार लाथा माराव्या. पण वयानं लहान आणि बोलूनचालून मूर्ख.

**हातिसिंगः**—जाऊं दे, आपल्यालाच लोक नावं ठेवतील याला कांहीं शिक्षा केली तर—

**नीला**:—बाळ अज्ञान आणि लहान, पण आम्हां सर्वांची फाजिती पाहून निर्लज्जपणानं हंसायचं आणि आमची चेष्टा करायची इतकं ज्ञान आहे त्याला.

**मुरलीधर**:—छे, छे, इतका खट्याळपणा, खोडयाळपणा जगांत पाहिला नव्हता.

**हातिसिंग**:—आणि लाज तरी आहे का बोलल्याची? बोल ना बाबा! अकलेच्या कांद्या, आम्ही चुकत होतो. भलतं करीत होतों हे दिसत असून तूं एका शब्दानं तरी आम्हांला सावध केलंस कां?

**मुरलीधर**:—घ्या, हा सावध करणार आम्हांला? मूळ फसवून खड्यांत घातलं यानंच! हा बरा सावध करील झालं त्याबद्दल!

**नीला**:—राहूं दे, राहूं दे, नका त्याला बोलूं अजून होईल कदाचित् दुरुस्त.

**लंबोदर**:—बोला, बोला, बोलून घ्या. जो करील तो निस्तरील. तुम्हा सगळ्यांना मी शत्रूसा वाटतो नाहीं कां? पण हें तुम्हांला कुठं माहीत आहे कीं हें सगळं निस्तरायची किल्ली पण माझेच हातीं आहे.

**हातिसिंग**:—आणि दागिने तुझ्या हातीं दिले मुरलीधर, तूं ते भलत्याला कां दिलेस? ती खोडी कांहीं यानं केली नव्हती. तो मूर्खपणा तूंच केलास ना?

**नीला**:—प्रथम लंबोदराशीं भांडले आणि आतां आपआपसांत भांडूं लागले. बाबांनो कृपा करा. आमचं फसलं तर फसलं. पण तुम्ही तरी भांडून त्रास करून घेऊं नका.

(नोकर प्रवेश करतो.)

**नोकर**:—नीलाबाई, चला बिगी बिगी, आजीबाई तुमची वाट बघत्यात. अक्षी गाडीघोडं जोडून उभ्या हैती. ह्रीं घ्या आपापली आंथरुणं अन् चला बिगी बिगी. नाहींतर आजीबाई चवताळत्याल!

**नीला:**—बरं जाते मी ( रडूं लागते ) होऊं दे माझं काय व्हायचं तें. फिरून गांठी पडतील तेव्हां खऱ्या. मावशी, मला कुणाच्या स्वाधीन करायला नेती आहे तें आलं माझ्या लक्ष्यांत. पण करणार काय ?

**मुरलीधर:**—नीला बाई, माफ करा, आमच्या हातून अपराध झाले त्याबद्दल !

**नीला:**—त्यांत माफी काय करायची ? सगळ्यांचा घोटाळा झाला. पण सगळ्यानींच चुका केल्या. उगीच एकाला दुसऱ्यानं नांव ठेवण्यांत काय अर्थ ? हातिसिंग, येते मी आतां. पण धीर धरायचा हं. यांतूनही मार्ग निघेल. आजचं उद्यां भरून निघेल. मी मनाची खंबीर आहे. तूं मात्र बाजी जाऊं देऊं नको. ( म्हाळसाबाई आंतून हांक मारते—' नीले नीले, चल लवकर उशीर झाला.' ( नीला जाते. )

**हातिसिंग:**—काय करावं ? ओठाशीं आलेला पेला लवंडून गेला.

**मुरलीधर:**—पहा, पहा. भल्या गृहस्था, तुझ्या व्रात्यपणाचे परिणाम. किती निराशा ! किती दुःख ! तुझ्यामुळंच उत्पन्न झालं.

**लंबोदर:**—कळलं कळलं. मी खानावळ म्हणून तुम्हांला फसविलं ही चूक मी कबूल करितो. पण ( हंसून ) इथं आल्यानंतर तुम्हां दोघांनीं मूर्खपणा कांहीं थोडा नाहीं केला ? तो कांहीं माझा नव्हता. असो. अजून माझा पराक्रम तर पहा, घ्या पाहूं माझे हात तुमच्या हातांत. तुमची आमची दिलजमाई झाली म्हणून. आणि अशी वाघुळांसारखीं माना खालीं घालून सुतकी बनूं नका. जीते रहो मेरे दोस्त. ऐसे औरतमाफीक डरतें क्यौं ? ये लंबोदरका मजा तो देख थोडासा. दोन तासांनीं मला बागेच्या तोंडी भेटा आणि मग हा लंबोदर जसा बुरा तसाच भला माणूस आहे असं तुम्हांला न पटलं तर ही माझी घोडी—नाहीं नाहीं—चंडोल खान्यांतली माझी प्यारी तुम्हांला बक्षीस देईन.

● ● ●

भरत नाट्य संशोधन मंदिर
३१२, सदाशिव पेठ, पुणे २.

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला

[ हातिसिंग व नोकर येतात ]

**हातिसिंगः**—काय म्हटलंस हऱ्या, म्हाळसाबाई आणि नीला गाडींत बसून निघून गेलेली पाहिलीस ?

**हऱ्याः**—होय धनी, ती दोघं आंत--गाडींत बसली व्हती. अन् त्ये लंबोदरबुवा शेजारीं घोडयावर बसूनशान चालले व्हते. एव्हांना ते दहा कोस जिमीन चालून गेले असत्याल बघा.

**हातिसिंगः**—( सुसकारा टाकून ) संपलं सारं नि आतां काय ?

**हऱ्याः**—अन् धनी, त्ये नागपूरचे उमराव, मुरलीधरांचे वडील आले ना इतक्यांत हतं ! आणि त्ये आणि हे खंडेराव दोघंबी लइ लइ हंसत इकडंच येत्याती जणुं. म्हणत्यात कसं ? ही खाणावळ काय ! अन् पोट धरून हंसत्यात !

**हातिसिंगः**—तर मला आतां इथं दिसतां कामा नये ! लंबोदरानं सांगितलं आहे कीं, दोन तासांनीं बागेच्या तोंडी भेट म्हणून. ठीक आहे. तसं करावं. आणि पहावं त्यांत तरी राजेश्रींचा खरेपणा किती आहे तो.

( जातो )

( सर चिंतामण व खंडेराव येतात )

**खंडेरावः**—( हंसत ) तें कांहीं बोलूं नका दोस्त. मौजेची परमावधी झाली. तुझा मुलगा—म्हणे अगदीं विनयशील अशा जगप्रसिद्धीचा—मला

काय म्हणतो, अन् किती अंगावर येऊन ओरडून–बस्स–' खाणावळवाले मालक-- चला आणा तुमचं बिल '--दुसरी गोष्ट नाहीं !–कायरे सांगना, चिंतामणराव, मीं खराच कां दिसतो एखाद्या खाणावळवाल्यासारखा ? ( हंसतो ) अरे, मला याहून उंच दर्जा द्यायचा होता कीं !

**सर चिंतामणः**—होय रे खाणावळवाल्यासारखा. पण ती खाणा-वळ म्हणजे साधी नव्हे हं. अगदीं ताजमहाल हॉटेल ! ( हंसतो )

**खंडेरावः**—जाऊंदे ! विसरून जाऊं तें सारं. तुझ्या आमच्या घराण्याचा शरीरसंबंधानें नवा ऋणानुबंध जोडणार, जुन्या वडिलार्जी ऋणानुबंधांत वाढ होणार, या एका विचारानं मी अगदीं खूष आहे. त्या आनंदांत इतर क्षुल्लक गोष्टी–आणि त्याहि गैरसमजुतीच्या घोटाळ्यानं, अभावित निर्माण झालेल्या, त्या कोण लक्षांत घेतो ? आतां कालांतरानं असं झालं आहे खरं कीं माझ्या मंजुळेला हुंडा म्हणून द्यायला वडिलार्जित पैसा मजजवळ फार उरला नाहीं. आणि मी स्वतः फार मिळविला नाहीं–पण—

**सर चिंतामणः**—काढलीस कां फिरून गोष्ट हुंड्याची ? तुला मी शंभरदां पत्रांत लिहिलं, तोंडी सांगितलं कीं, हुंड्याचा शब्द तोंडातनं काढायचा नाहीं अगदीं ! तरी तुझा स्वभाव सोडीत नाहीं. काय करावं ? अरे, हुंडा कां कुणा नवरानवरीच्या जन्माला पुरला आहे ? आणि तूं सांगतोस तसं जर त्या दोघांत खरं प्रेम असेल तर त्या हुंड्याला घेऊन काय करायचं आणि त्याविणं अडलं आहे तरी काय ?

**खंडेरावः**—अरे, जर तर काय म्हणतोस ? अगदीं खरंच माझ्या मंजुळेवर तुझ्या मुरलीधराचें प्रेम बसलं आहे. मी स्वतः पाहिलं आणि माझ्या मुलीनं स्वतः मला सांगितलं. मग संशय कसला ?

**सर चिंतामणः**—मग बोलणं राहिलं. माझा मुलगा कसा आहे पाहिलासना ? आणि तुझी मुलगी सुंदर सद्‌गुणी आहे. मग वधुवरांचा संसार सुखाचा करायला आणखी काय लागतं ? पुन्हां हुंडा शब्द काढूं नको !

( मुरलीधर येतो )

**मुरलीधरः**—(खंडेरावाला) बाबासाहेब, मला क्षमा करा. मी फार अपराधी आहे. माझ्याकडून खराच फार मोठा अपराध घडला आहे तुमचा ! एवढा कीं मी त्याची क्षमा तरी कोणत्या तोंडानं मागूं शकेन ? माझा उद्धटपणा लक्षांत आला कीं विहीरींत उडी घ्यावीशी वाटते; इतका मी लाजेनं चूर होऊन जातों.

**खंडेरावः**—ऊं, जाऊं दे रे मुरलीधर. गैरसमजुतीनं झालेली चूक ! तूं तें मुद्दाम जाणून बुजून थोडंच केलं होतंस ? जा मंजुळेशी जरा बोल मोकळ्या मनानं, म्हणजे सर्व कांहीं होईल मनासारखं. माझी मंजुळा अविचारी नाहीं. समजूतदार आहे. प्रौढ विचाराची आहे. तिला ही चूक उमगलीच असेल यापूर्वी. ती तुझ्यावर मुळीं देखील रागवायची नाहीं मी सांगतों.

**मुरलीधरः**—तिनं मला तसं आश्वासन दिलं म्हणजे मला आणखी काय पाहिजे ?

**खंडेरावः**—हें रुक्ष वेदांती बोलणं काय कामाचं ? म्हणे तिनं मला आश्वासन द्यावं. तुझं तिचं मन कसं जमलं आहे, हें या डोळ्यांनीं पाहिलं नसेल तर मला थाप मार. फसणं आणि फसविणं आतां पुरे झालं.

**मुरलीधरः**—भलतंच कांहीं तरी बाबासाहेब !

**खंडेरावः**—पुरे पुरे. तुला वाटत असेल कीं आम्हां म्हाताऱ्यांना प्रेमाचं लक्षण कळत नाहीं. दे सोडून तें ! आज म्हातारे झालों तरी मुला, तुमच्यासारखेच तरणेबांड होतों आम्ही एक वेळ. तुमच्या प्रेमचेष्टा मी पाहिल्या नसत्या तर बोल. पण जाऊंदे. तो तुमच्या आमच्यांतला खुलं खुलं बोलण्याचा विषय नव्हे.

**मुरलीधरः**—खरंच बाबासाहेब, मी काय उर्मटपणा उद्दामपणा, केला असेल तो फक्त तुमच्या वांट्यालाच आला. बाकीच्या कुणाला तो भोंवला नाहीं.

**खंडेरावः**—ए वेदांत्या, तरुण मुलं मुली एकमेकांशीं क्वचित् गमतीनं अधिक उणं बोलतात, थोडं संकोच सोडून खुल्या दिलानं वागतात, त्याला काय उद्धटपणा, उर्मटपणा म्हणतात होय? थोडा हात घट्ट धरला, थोडा दाबला, थोडी अंगघसट केली, थोडं कानाशीं तोंड नेलं हळूं कानगोष्ट करायला—हें चालायचं आपआपल्यांत तरुण तरुणींचं—बिन लग्नाच्या स्थितींत. पण माझ्या मंजुळेनं तूं या पलिकडं जाऊन अधिक कांहीं केलं अशी नाहीं हो माझ्याकडं कागाळी केली. तीहि मोठी स्वाभिमानी, तेजस्वी मुलगी आहे माझी.

**मुरलीधरः**—आणि तिनं तसं सांगितलं नाहीं हें झालंच. पण मीहि तिनं चोरून ठेवावं, न सांगावं, असं कांहींच वर्तन केलं नाहीं तिच्याशीं—कसलाहि विनयभंगाचं.

**खंडेरावः**—पुरे पुरे आतां तुझा विनयशीलपणा! आम्हांलाहि प्रेम म्हणजे काय हें कळतं बरं.

**मुरलीधरः**—पण खरंच सांगतों बाबासाहेब--खरंच सांगतों—

**खंडेरावः**—होय. होय. होय, होय.

**सर चिंतामणः**—पण तुम्ही दोघं परस्परांना प्रिय आहां ना? सांग मन मोकळं करून. त्यांत काय मोठंस?

**मुरलीधरः**—पण बाबा, ऐकून घ्याल ना?

**खंडेरावः**—माझी आणि माझ्या दोस्ताची, तुझ्या बापाची आणि माझ्या लेकीच्या बापाची पूर्ण संमति आहे. मग उगीच कशाला आणखी खुलासे हवेत? चला आतां पुढच्या उद्योगाला लागूं या. उगीच वेळ जायला नको. हो! उशीर म्हणजे अडचणींना निमंत्रण.

मुरलीधरः—पण–पण–

चिंतामणः—खंडेराव, आतां या मुलाचं कांहीं ऐकूं नकोस. हा म्हणायला लागायचा कीं आमचं प्रेम असलं तरी तिचं तुम्ही दुसऱ्या कुणाशीं लग्न लावलंत अजून तरी त्याला माझी हरकत नाहीं. तें कांहीं नाहीं. आहे माहिती मला त्याच्या स्वभावाची बाळपणापासून.

मुरलीधरः—ज्या घरांत मी लोकांचा इतका अपमान केला, अन् स्वतःला इतकं फजीत करून घेतलं त्या घरांत—( जातो )

सर चिंतामणः—कायरे, हें कांहीं त्याचं सोंग नाहीं खास. त्याला फजीतीचं दुःख मरणप्राय होत आहे असं वाटतं.

खंडेरावः—अरे मित्रा सोडून दें तें. तो भिडस्त असेल, आहेहि. पण तिच्याशीं वागतांना मी जो त्याला पाहिला त्यांत भीडभाड कांहीं नव्हती. अगदीं धट्टपणा होता—अगदीं तो शब्द वापरायचा तर. पण जाऊं दे आपल्या आपल्यांत वाद अन् खुलासे कशाला ? माझी मुलगी तुझ्या मुरलीधराइतकी भिडस्त नाहीं अन् उद्धटहि नाहीं. ती अगदीं खरं खरं तें सांगेल. त्यावरनं होईल निकाल.

( मंजुळा येते )

बाळ मंजुळे, इकडे ये. आणि आम्ही विचारूं तें सर्व अगदीं खरं-खरं तें सांग. आम्ही इथं कुणी परकी नाहीं. हें सर चिंतामणराव, माझे बाळमित्र आहेत- आमचा स्नेह कसा आहे याची तुला कल्पना होणार नाहीं.

सर चिंतामणः—बाळ, खरंच कां तुझ्यावर माझ्या मुरलीधराचं प्रेम आहे ? लाजूं नको.

मंजुळाः—( लाजून ) बरेंच आहां कीं स्नेही स्नेही ! असला प्रश्न विचारतात कां कुणी तरूण मुलींना ?

**खंडेरावः**— तर काय म्हाताऱ्या विधवांना विचारील कुणी?

**सर चिंतामणः**—बरं तो तसा प्रश्न नको. पण सांग कीं तुझ्या त्याच्या गांठी भेटी अनेक वेळां झाल्याना ?

**मंजुळाः**—होय.

**खंडेरावः**—पाहिलंस चिंतामणी ?

**सर चिंतामणः**—( मंजुळेला ) तो तुला आपलासा वाटतो कीं नाहीं ?

**मंजुळाः**—होय.

**सर चिंतामणः**—आणि तूं त्याला आपलीशी वाटतेस कीं नाहीं ?

**मंजुळाः**—होय अगदीं कायमची.

**सर चिंतामणः**—अगदीं तुम्ही नव्हे हां--पण इतर तरुणतरुणी आपलं परस्पर प्रेम व्यक्त करतात—तुम्ही नव्हे हां—तसं त्यानं व्यक्त केलं का ?

**मंजुळाः**—होय, सर.

**सरचिंतामणः**— अग मला सर काय म्हणतेस ? तुला शाळेंतल्या शिक्षकाची जुनी आठवण झाली वाटतं ? सर म्हणायला.

**खंडेरावः**— तसं नव्हे. तुझी ही मार्मिक कुशल उलट तपासणी पाहून तिला वाटलं असेल हें कोर्ट आहे, अन् तूं फिर्यादीचा वकील आहेस. तुम्हां वकीलांची खोड.

**सर चिंतामणः**—( हंसून ) खोड कां म्हणतोस ? चतुराईची संवय म्हण ना !

**खंडेरावः**—तें असो आमचं तुमचं, पण मुरलीधराचं मंजुळेवर प्रेम आहे हें आतां तरी कळून आलं कीं नाहीं ?

**सर चिंतामण**:—तरी पण मला आणखी थोडी खात्री पटावीशी वाटते.

**खंडराव**:—जाऊं देरे हा वाद, तिच्याशीं काय म्हणून? आपण असं करूं अर्ध घटकेनं. आपण दोघे त्या पडद्याआड बसूं आणि तीं दोघं आपलीं आपण आहों असं समजून एकमेकांशीं कशीं वागतात हें समक्षच पाहूं म्हणजे झालं. (जातात) (हातिसिंग येतो)

**हातिसिंग**:—काय मूर्ख आहे मी या लंब्यावर विश्वास ठेवणारा? किती वाट पहावी याची? हा पाजी माणूस वेळेवर अवतरला म्हणजे स्वर्गच पृथ्वीवर आला म्हणावं लागेल. मला खूप बनवायच त्याच्या मनांत असावं. जाऊं दे. आपण त्याच्या करितां अधिक थांबूं नये हेंच उत्तम. अरे पण हा आला कीं! बघुं या नीलेची कांहीं बातमी सांगतों कां ती!

(लंबोदर चिखल माखलेला बूट घातलेला प्रवासी पोशाखांत येतो.)

दोस्त तो दोस्त! आहे बुवा. अगदीं म्हटल्या शब्दाला जागलास. घड्याळाप्रमाणं आलास.

**लंबोदर**:—अरे बाबा, तुम्ही मातबर मानकरी सरदार. सद्‌गृहस्थ, आमची किंमत काय तुमच्याशीं? आमच्यासारख्याच्या मैत्रीला तुम्ही थोडीच किंमत देणार? रात्रीचा प्रवास आणि तोही तट्टाच्या पाठीवर विठ्ठल विठ्ठल करतांना! त्याचे गुडघे सडकले आणि माझी कंबर हबकली. हो पण करतां काय? मित्राकरतां हें सारं केलंच पाहिजे.

**हातिसिंग**:—पण तूं ज्यांच्या बरोबर गेलास ते प्रवासी कुठं आहेत? त्यांना तूं कुठं सोडलेस? नीला सुरक्षित आहेना!

**लंबोदर**:—अडीच तासांत दहा कोस म्हणजे एकंदरींत वाटचाल कांहीं वाईट पडली नाहीं. घोड्याचं अंग घामानं कसं अगदीं निथळत

आहे. त्यांच्या तोंडांतनं फेस येतो आहे. शिकारींत कोल्ह्याच्या पाठीला लागून वीस कोसाची मजल झाली तरी मी कधीं इतका दमत नाहीं.

**हातिसिंगः**--पण गाडीतली बायकामाणसं कुठं सोडलीस तूं ?

**लंबोदरः**--( हंसून ) अगदीं जिथून निघालीं प्रथम अगदीं नेमकीं तिथंच !

**हातिसिंगः**--म्हणजे आपल्याला नाहीं हें कोडें उलगडत ?

**लंबोदरः**--त्यांत काय कठीण ? असं सांग कीं या घराभोंवतीं वाटोळ्या पन्नास साठ फेऱ्या घातल्या तर शेवटीं मीं कुठं येईन ?

**हातिसिंगः**—बः, फिरून घराशींच निघालास तिथून !

**लंबोदरः**--हं. तर मग तसंच घडलं बघ. घराभोंवतींच चक्कर घालीत होतों. पण वाटेंत किंचित् वळणं घेऊन. वाटेंत सगळ्या आसपासच्या दलदली, डबकीं, खाचखळगे, उंचवटे सगळ्यांचा समाचार घेतला. आणि फिरून जाग्यावरच. आईसाहेबांना थोडा भूगोल शिकवला त्या शाळेंत गेल्या नाहींत म्हणून !

**हातिसिंगः**—[ हंसून ] म्हणजे या बायकांना मात्र वाटत होतं कीं, आपण सरळ नाकासमोर पुढचा प्रवास करीत सरळ मजल मारतों आहे म्हणून. आणि शेवटीं पहावं तों आपल्याच घराच्या दारांत ''

**लंबोदरः**— ऐक तर गंमत. प्रथम गाडी नेली ती चिखलाच्या खड्ड्यांत जाईल अशी. मग नेली खडकाळ जागेवर. वाटेंत गोटेच गोटे. त्या एका कोसांत गाडींत बसणारांची हाडं खिळखिळी झालीं असतील. मग नेलं मसणवटींत. प्रेतं जळत होतीं तिकडं. मग शेवटीं घराजवळच्या तळ्यांत आणि ती कशीतरी काढून आणून केली उभी घरच्या मागील दरवाजाशीं. आली कीं नाहीं तुझी नीला तुझ्या हातांत परत ! आई तिला घालणार होती कजाग मावशीच्या राखोळीला !

**हातिसिंगः**--बरं, या भयंकर प्रवासांत कांहीं कूणाला अपघात तर झाला नाहीं ना ?

**लंबोदरः**--मुळींच नाहीं. फक्त माझी आई मात्र खूप घाबरून गेली आहे. तिला आपण कुठं आहों याचा उमज पडलेला नाहीं तिला वाटतं आपण एखाद्या जंगलांत आहों-दहा वीस कोस दूर !

**हातिसिंगः**--मग आतां पुढं कसं ?

**लंबोदरः**—कसं काय ? माझे घोडे थकले. गाडी खडी राहणार. तुम्हांला मी दोन ताजेतवाने घोडे . दिले ते जुपा गाडीला बसा नीलेला घेऊन आणि करा सूंबाल्या आणि काय ? एक चिटपाखरूं तुमचा पाठलाग करायला येणार नाहीं.

**हातिसिंगः**—खरोखर तुझे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.

**लंबोदरः** तर तर ! आतां लंबोदर आणि आभार. आणि मगाशीं अगदीं खेटरांनीं माझी पुजा बांधायची वेळ आली होतीना ! पाजी, मूर्ख, हरामखोर म्हणायची काय बाकी ठेवली होती तुम्हा लोकांनीं ? पण जाऊं दे. मी ते मनावरच घेत नाहीं मुळीं. आपल्याला एक कळतं. थोडी मस्करी करावी पण कुणाचा घातपात करूं नये.

**हातिसिंगः**—झालाच खरा गाढवपणा आमच्या हातनं. मग आतां ?

**लंबोदरः**--काय ? आतां म्हणूं कां बिनअकली ?

**हातिसिंगः**--म्हटलं नाहींत तेवढं बरं केलंत-पण-

**लंबोदरः**—फिरून-पण काय ? तुम्ही पळवून न्या नीलीला. मी इकडं आईला पाहून घेतों. तिला गुंतवीत ठेवतों. ( हातिसिंग जातो )

( म्हाळसाबाई येते )

**म्हाळसा:**—लंब्या, लंब्या, बाबा कुठं आहेस तूं. मेलेरे मेलें अगदीं. आतां धडगत नाहीं माझी. तो कुंपणाजवळ शेवटचा धक्का बसला त्यानं पेकाट मोडलं बघ.

**लंबोदर:**—पण आई, हा सगळा तुझाच उद्योग नव्हे कां? त्या दुसऱ्या मावशीकडं नीलीला पोंचयायची खरी पण ती उद्यां दिवसा नसती कां पोचवितां आली? रात्रींच काय खोळंबळं होतं? वाट नीट नाहीं आणि पुरती माहीतहि नाहीं.

**म्हाळसा:**—आतां फिरूनं घर डोळ्याला कसं दिसणार बाबा! इतक्या थोड्या प्रवासांत इतके धोके मी कधीं जन्मांत पाहिले नव्हते. चिखलांत काय रुतलों? खडकावर काय धडधडलों! खड्यांत काय पडलों? इतकं करून मुक्काम गांठला नाहीं तो नाहींच! पण आपण आहोंत तरी कुठं बाबा?

**लंबोदर:**—मला वाटतं घरापासून वीस कोसांवर वेताळ घाटा-खालच्या स्मशानाजवळ असूं बहुत करून.

**म्हाळसा:**—(किंचाळून) तें तर म्हणतात भारी धोक्याचं ठिकाण! इतक्या संकटांउपर आतां चोरा दरोडेखोरांची गांठ नाहीं पडली म्हणजे मिळविली.

**लंबोदर:**—भिऊं नको आई भिऊं नको. इथं आसपास पांचसहा अगदीं अट्टल दरोडेखोर राहत होते खरे. पण त्यांतले दोन तीन फांशी जाऊन आतां सारे तीनच उरले आहेत. आपण त्यांना थोडेच सांपडतों आहों! (दचकून-ओरडून) अरे बाप रे, पण तो कोण बरं घोड्यावर बसून आमच्या बाजूला येत आहे. लपत छपत? आई भिऊं नको अगदीं.

**म्हाळसा:**—तर मग झालंच म्हणायचं. भरली शंभर वर्षं!

**लंबोदर:**—पण आई तूंच नीट निरखून पहा बरं! त्या कुंपणाजवळ ती काळी टोपी. आमच्या बाजूला झुकत येती आहे असं नाहीं तुला दिसत.

**म्हाळसा:**—मेलें रे बाबा मेलें ! ती काळी टोपीच कीं आणि त्या-खालीं काळ कापड दिसतं डोळ्यावर ओढलेलं, आणि ती काळी दाढी ? अग बाई ! आतां ?

**लंबोदर:**—छट् दिसलं नीट. कुंपणाच्या आडोशाला तीं एक काळी गाय उभी आहे इतकंच. चोरबीर कांहीं नाहीं.

**म्हाळसा:**—नाहीं रे बाबा, तो कोणी माणूसच येतो आहे चालत आमच्याकडं. आतां काय करावं ? त्याला आम्ही दिसलों कीं झाला घात.

**लंबोदर:**—( स्वगत ) अरे हे तर बाबा ! आतां काय करावं ? हे काय झोपेंत उठून चालूं लागले ? कीं झोंप येईना म्हणून थोडी सहल करायला बाहेर पडले आहेत. ? ( उघड ) अरे बाबा. चोर ग चोर. आणि हातांत केवढा लठ्ठ सोटा. आणि केवढं लांब पिस्तूल ? चेहरा तरी किती भयंकर !

**म्हाळसा:**—(घाबरून) आला ग बाई अगदीं जवळ आला आतां !

**लंबोदर:**—जा जा. तूं लप त्या कुंपणाखालीं एकदम. मीं पाहून घेतो त्याला. धोका दिसला तर मी हळूंच खोकत जाईन. म्हणजे मग आणखी थोडी कुंपणांत शिरत जा. अंग अगदीं अंगाशीं भिडवून धर. ओंचे खोवून घे. ( म्हाळसा झाडाच्या आडोशाला जाते )

( खंडेराव येतो )

**खंडेराव:**—अरे इथं आसपास माणसं वावरताहेत असा भास झाला खरा. कुणीसं हळू हळू बोलतांना ऐकलं (पुढें होऊन) अरे पण लंब्या, गाढवा, तूं इथं कुठं या वेळीं ? त्या जखीण मावशीकडं जात होता ना सगळीं मिळून ? पण गेलांत तर पोचवून इतक्यांत परत कसा आलास ? बाकीची सगळीं माणसं कुठं आहेत ? नीट सुरक्षित आहेत ना ?

**लंबोदर:**—तर काय ? पोचवूनच आलों ना त्यांना तिकडं ? ( खोकतो )

**म्हाळसा:**—अगबाई पोरगा खोकला. तर मग दगा आहे.

**खंडेराव:**—ए पोरट्या, थापा मारूं नको अशा ? तीन तासांत वीस कोस मजल ? छट्. लबाड कुठला.

**लंबोदर:**—बाबा, तापट चलाख घोडे गाडीला जुंपलेले आणि त्यांच्या मदतीला गाडींत बसणारांच्या मनाची घाई. मग मजल गांठायला काय हरकत ?

( खोकतो )

**म्हाळसा:**—बाई ग बाई. हा चोर धाक दाखवितो आहे. पोराच्या अंगावर हातबीत नाहीं टाकणार ?

**खंडेराव:**—कायरे ? त्या बाजूला कोणी बोलल्याचा आवाज ऐकूं आला.

**लंबोदर:**—नाहीं बाबा. मींच थोडें आपल्या मनाशीं बोललों तें तुम्हांला ऐकू आलं असेल झालं, म्हटलं वीस कोसाची मजल तरी काय कठीण ( खोकतो ) या रात्रीच्या गारठयानं खोकला आला जरा.

**खंडेराव:**—तूंच प्रश्न करून तुझं उत्तर देत होतास वाटतं ? लबाड नाहीं तर ! मला दोन माणसं बोलल्याचा भास झाला. मग तूं कांहीं म्हण. ( मोठ्यानं ) बोलतोस कीं नाहीं ? तें दुसरं कोण ते मला पाहिलंच पाहिजे.

**म्हाळसा:**—आतां ? हा चोर मला हुडकून काढणार ! अगाई !

**लंबोदर:**—उगीच कां श्रम घेतां बाबा ? मी देवाशपथ खरं सांगतों. माझ्याशिवाय इथं दुसरं कुणी नाहीं.

( खंडेराव पुढें जातो. लंबोदर त्याचा हात धरून थांबविण्याचा प्रयत्न करतो )

**खंडेरावः**--चल दूर हो पाहूं. तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवण्या-इतका वेडा नाहीं मी झालों अजून !

**म्हाळसाः**--( पुढं येऊन ) अगबाई ! अरे देवा ! आतां मीं काय करूं ? नका हो बुवा–नको हो चोर दादा, माझ्या पोराला मारूं. तुमचा राग काय असेल तो माझ्यावर काढा. घ्या. हे माझ्या अंगावरचे सगळे दागिने तुम्हांला देते ते घ्या. पण पोराला सोडा. वाटलं तर माझा प्राण घ्या. पण त्याला सोडा. दया करा. दया करा येवढी. कृपा करा माझ्यावर. मी तुमच्या पाया पडतें.

**खंडेरावः**—( आश्चर्यानें ) अरे ही तर म्हाळसा ! ही आली कुठून, चालली कुठून, चालली कुठं ? काय, आहे काय हे गौडबंगाल. लंब्या, बोलतोस काय खरं तें ? कीं देऊं ठेऊन ! ही म्हणते काय तेंहि समजत नाहीं.

**म्हाळसाः**—नको नको चोरदादा. नका मारूं त्याला. ही घ्या माझी पैशाची पिशवी. माझं घड्याळ, माझ्या गळ्यांतली मोहनमाळ. आहे नाहीं तें सगळं घ्या. पण जिवं मारूं नका त्याला. ( त्याच्यापुढं गुडघे टेकते )

**खंडेरावः**—अरे वेड लागलं कीं काय ? म्हाळसे. ए म्हाळसे, तूं शुद्धीवर आहेस कां ? मला अजून ओळखलं नाहींस कां तूं ?

**म्हाळसाः**—अग बाई ! तुम्हीच कां ते ? भीतीनं मी जशी कांहीं आंधळी झालें. अन् निदान मी तुमचा आवाज तरी ओळखावा ? बरं बरं. आम्ही गाडीतनं आलों म्हणून इतक्या दूर पोचलों. तुम्ही कसं आला ? वीस कोस ? या भयंकर स्मशानाजवळ ?

**खंडेरावः**--अरे काय वेडी आहे ही ? कां डोकं फिरलं ? झालं झालं तरी काय ? अग ए शहाणे ? घरापासनं वीस कोस हें तुला कुणी

सांगितलं ? बघ ना नीट डोळे उघडून ! हें आपल्या बागेतलं मागचं दार नव्हे का ? आलं सारं लक्षांत. लंब्या पोरट्या, दिवट्या, गाढवा ही सारी तुझीच करामत दिसते. म्हाळसे, हे आपल्याच बागेंतलं मोठं आंब्याचं, तें दुसरं चिंचेचं, तें तुतीचं झाडं नव्हे का ? आणि उजव्या हाताला हें मासेमारीचं तळं ?

**म्हाळसा**:—अगबाई, खरंच कीं ! या तळ्यांतच नाहीं कां आमची गाडी रुतली कडेच्या चिखलांत ? आलं, आलं सारं लक्षांत. या कारट्याची सारी करामत असं तुम्ही म्हटलंत तेंच खरं. थांब दाखविते तुला कसं काय ते !

**लंबोदर**:—( मोठ्यानं हंसून ) मला काय म्हणतीस आइडे मायडे ! विचार साऱ्या गांवाला मला खोडकर कुणी केलं तें ? कुणी व्रात्य-पणा शिकविला तो. मला आपण बिघडवून फिरून मलाच दोष देती ! बघाहो, काय जुलूम आहे तो. ( तो पळत जातो, ती त्याच्या मागून पळत जाते. )

**खंडेराव**:—पोरगा व्रात्य खराच. पण त्यानं आपल्या आईला दोष लावला तो मात्र कांहीं खोटा नाहीं. सगळा जन्म असा काढला ना मी. पण बायको राणीसाहेब ! करतां काय ?

( हतीसिंग व नीला येतात. )

**हातीसिंग**:—नीले, हं आटप आतां. कां बरं विनाकारण असा विचार करीत बसली आहेस ? एकदां चुकलं, बिघडलं तें फिरून सावरलं. यापुढं आणखी एक क्षण वाया जातां कामा नये.

**नीला**:—पुरे झालं भोगलं तेवढं संकट. थांबूं आणखी कांहीं दिवस अशीच म्हणजे बसेल बस्तान. आतां एखाद्या संकटांत फिरून पडायची भीतीच वाटते !

**हातिसिंगः**--काय बरं असं ? वर्षानुवर्ष असं तिष्ठत रहा म्हणण्या-पेक्षां माझी आशा सोड असंच कां म्हणत नाहीं ? या क्षणीं बाहेर पड म्हणजे आपल्या नव्या जीवनाला प्रारंभ होईल. जळेनात ते दागिने आणि तो पैसा ! आपल्या प्रेमापुढं त्याची काय किंमत आहे ? जो सुखी, समाधानी आणि प्रेमावर जगणारा तो राजापेक्षांहि श्रीमंत म्हणावा. ऐक ऐक माझं थोडं.

**नीला**---हें तुझं तत्वज्ञान अगदींच कांहीं खोटं असं मी म्हणत नाहीं. पण फिरून दागिने मिळवायची मला आशा वाटूं लागली आहे. मिळाली नवी संधी त्याचा मी फायदा घेणार आहें. मीं खंडेरावांनाच विनंति करून पाहाणार आहे. ते न्यायी आहेत. ते मला न्याय देतील. आजवर माझी तक्रार मीं त्यांच्या पर्यंत कधीं नेलीच नव्हती. पण आतां पहाणार आहे प्रयत्न करून.

**हातिसिंगः**--त्यांना न्यायबुद्धि असेल. पण सामर्थ्य नसेल तर ?

**नीलाः**--मनावर घेतील तर होईल त्यांच्या वजनाचा कांहीं उपयोग.

**हातिसिंगः**--बरं आहे. तुझ्यापुढं माझं केव्हां काय चाललं आहे ? तुला वाटेल तसं कर. मीं जातो ( जातात )

( सर चिंतामण व मंजुळा येतात. )

**सर चिंतामणः**—केवढा पेंच पडला आहे मला. एक म्हणणार माझा मुरलीधर भिडस्त विनयसंपन्न आहे—इतका कीं त्याच्या तोंडावरची माशी उडून जायची नाहीं. दुसरा म्हणतो तो फाजील, उन्मत्त निर्लज्ज आहे. याचा निर्णय कसा लागणार ?

**मंजुळाः**—आपणांला मी पसंत पडलें, पुष्कळ झालं. येऊन जाऊन काय माझ्याविषयीं त्यांना खरं वाटतं हें त्यांच्या स्वतःच्या तोंडूनच तुम्हांला ऐकायचं ना ? ठीक आहे. आपण रहा त्या पडद्याआड आणि ऐका.

( सर चिंतामण जातो : मुरलीधर येतो )

**मुरलीधरः**—मंजुळे, मी आतां तुझा निरोप घ्यायलाच आलों आहे. या वियोगाचं मला किती दुःख होतं म्हणून काय सांगूं ?

**मंजुळाः**—( लबाडीनं ) दुःख, दुःख तें असं कितीसं होणार ? दृष्टीआड सृष्टी ! चार दिवस दूर झालांत म्हणजे जाल विसरून सारं. तुम्हांला कळूनहि येईल कीं एकंदरीनं आपली कांहीं अशी फार मोठी हानी झालेली नाहीं. जग पुढं जातच असतं आपल्या पावलांनीं.

**मुरलीधरः**—नाहीं नाहीं. मंजुळे, मी मनाशीं पुष्कळ हुज्जत घातली पण माझा सर्व स्वाभिमान सगळा गर्व पार नाहींसा झाला. प्रेमाचा विजय झाला. तूं कोणतीहि कारणं न सांगण्याची कृपा कर. शिक्षण संपत्ती सर्वांची कधींच सारखी नसते. आईबापांचा रागहि होतो. मित्रमंडळी तुच्छता प्रगट करतात. पण हें सर्व सोसण्याला मनुष्य तयार होतो. आणि ते एका प्रेमाच्या आधारावर. मनाच्या निश्चयाच्या आधारावर.

**मंजुळाः**—समजलें, समजलें. माझं कुलशील, शिक्षण हें अगदींच कांहीं फारसं कमी नाहीं. पण गरिबी आहे खरी. तीच आड यायची.

**मुरलीधरः**—भलतंच कांहीं तरी ! प्रथम तुझ्या सौंदर्यानं मी मोहित झालों आणि नंतर ज्या प्रत्येक प्रसंगीं तुझ्याशीं संभाषण झालं त्यांत तुझ्या बुद्धीचा कलाविलास मला दिसून आला. प्रथम तूं मला गांवढळ वाटलीस, पण पुढें मला दिसून आलं कीं तो मावढळपणा नसून सुसंस्कृत असा साधेपणा होता. आणि जरी मला तूं कित्येक वेळां उद्धट, पुरोगामिनी, आणि मर्यादा सुटलेली अशी दिसलीस तरी त्यामुळें तुझा सद्गुणावरील आत्मविश्वास व खंबीरपणाच प्रगट झाला. आपल्या सद्गुणावर, शीलावर भिस्त ठेऊनच तूं बेदरकापणं वागलीस. म्हणून मी निश्चय केला आहे कीं तुझा लाभ करून घेतल्याशिवाय येथून जायचं नाहीं आणि या कामीं माझे बाबा, मला निःसंशय मदत करतील.

**मंजुळा:**—पहा हो, भलतंच करून बसाल, आणि मग पश्चात्तापाची पाळी येईन. क्षणभर भावनेची ऊमी तुमच्या मनांत आली असेल पण त्याचा फायदा जर मीं घेतला तर तुम्हांला पश्चात्तापाची पाळी येईल कां अशी मला भीति वाटते.

**मुरलीधर:**—मुळींच नाहीं, मला सर्वस्वीं सुखी करणं तुझ्या हातीं आहे. तुझ्यावर प्रेम केल्याचा मला कधीं पश्चाताप होणार नाहीं. मला वाईट एवढेंच वाटतें कीं, तुझे सद्‌गुण मला या आधींच कसे कळले नाहींत. म्हणून मी आतां इथंच तळ देऊन रहाणार. आणि तूं मला झिडगारलंस तरी मी तुझ्याशीं पूर्वीं किंचित् सलगीचं छचोर वर्तन केलं त्याची भरपाई करून देईन.

**मंजुळा:**—मीही कदाचित् तशीच मर्यादा सोडून तुमच्याशीं वागलें असेन कीं ! तरी पण मी संपत्तीला भुललें आणि तुम्ही आपली साव-धगिरी सोडली असं लोकांना म्हणतां येऊं नये.

**मुरलाधर:**—( तिच्यापुढें गुडघे टेकून ) नाहीं, नाहीं, माझी साव-धगिरी सुटली म्हणण्याचं काय कारण ? उलट तुझ्या आंगचे गूण जसजसे मला अधिक दिसतात तसतसा माझा माझ्यावरील विश्वास मात्र कमी होतो खरा. पण यांत तूंच मला हातभार लावला पाहिजेस.

( तिचा हात धरतो )

**सर चिंतामण:**—दिसलं एवढं पुरे झालं, ( पुढें येऊन ) कायरे, मघाशीं तिच्याविषयीं बोलतांना जशी कांहीं फकिराची उदास वृत्ति दाख-विलीस आणि आतां हें कसं ?

**खंडेराव:**—हं. आतां बोला; तिच्याशीं तुझं वागणं उगीच औप-चारिक होतं असं भासवलंस. पण आतां कसं ?

**मुरलीधर:**—( खाली मान घालून ) काय सांगू मी ? माझा गोंधळ झाला आहे खरा.

**खंडेराव**:— काय सांगणार ? न सांगतांच आम्हांला दिसून आलं कीं राजेश्री, तुम्ही एकाशीं एक आणि एकाशीं एक बोलण्यांत मोठे पटाईत आहांत. आम्हांला एक भासवितां बोलतां. आणि माझ्या मुलीला दुसरंच !

**मुरलीधर**:—(अगदीं चाट् पडून) काय ? मंजुळा तुमची मुलगी ! ही तुमची मुलगी ?

**खंडेराव**:—जुलूम झाला म्हणायचा, ती माझी मुलगी नव्हे तर कुणांची ?

**मुरलीधर**:—संपलं ! सगळं संपलं, माझ्या फजितीला पारावार उरला नाहीं !

**मंजुळा**:—आतां बोलूं का मी थोडं ? माझ्या बाबांची मुलगी मीच. तुम्ही जिच्यापुढं खालीं मान घालून बोललांत ती मीच. जिच्याशीं खाणावळींतील कुणबीण म्हणून लगट केलीत ती मीच ! एखाद्या साधूच्या गंभीरपणानं, सभ्यपणानं जिच्याशीं बोललांत ती मीच आणि एखाद्या नवथर चटोर फाजील प्रेमवीराप्रमाणें मगाशीं वक्तृत्व केलंत आणि सुभाषितांची फुलं उधळलीत ती पण मीच.

**मुरलीधर**:—आतां काय करूं ? कुठं जाऊं ? कुठं उडी घेऊं !

**मंजुळा**:— मग आपण कोण हें आतां तरी निश्चित सांगा ना ! बायकासारखी खालीं मान घालून तोंडांतल्या तोंडांत बोलणारे ते, कीं तरारून जाऊन हनवटीला हात लावणारे ते—

**मुरलीधर**:—दोन्ही एकच, त्यांतला तूं म्हणशील तो मी. पण मी आतां जातोच. जरा आत्मविश्वासानं मान वर करावी तों फजितीचा तडाखा डोक्यांत बसतोच. आतां वागूं तरी कसा ?

**खंडेराव**:—ए घालवेड्या मुला, बस्स झाला हा गोंधळ आणि कौतुक. तूं जातो म्हणतोस पण जाऊं देतो कोण ? कळला, कळला तुमचा

विनय आपल्याला ? आम्ही सर्वांनीं एकदम तुम्हाला माफी दिली आहे या मंजुळसुद्धां.

( म्हाळसा व लंबोदर येतात )

**म्हाळसाः**—मग ते गेले म्हणतोस ? ती दोघंहि. ? बरं जाऊं देत मला काय त्याचं ?

**खंडेरावः**—कोण ? कोण ? गेले कोण ?

**म्हाळसाः**—माझी भाची नीला, आणि तिचा तो प्रियकर हातिसिंग. जांवई करायला म्हणून तुम्ही आणलेतना ते मोठे भिडस्त गृहस्थ. त्यांचेच स्नेही सोबती.

**सर चिंतामणः**—हातिसिंगच ना, मग छान झालं. त्यांत वाईट काय ? तुमच्या नीलेला असा दुसरा नवरा मिळायचा नाहीं.

**खंडेरावः**—तर मग हेही काम आयतं परस्पर हातावेगळं झालं कीं.

**म्हाळसाः**—पोरगी उपटून नेली नेईना, तिचे दागिने तर राहिले कीं नाहीं मागं.

**खंडेरावः**—काय मूर्ख आहेस तूं ! आपल्या भाचीला सुख कसं लागेल हें पाहायचं. कां तिच्या डबोल्यावर पापी नजर ठेवायची ?

**म्हाळसाः**—तें माझं काम आहे, तुमचं नाहीं. तुम्ही कां त्यांत बोलतां ? लंबोदरानं तिच्याशीं लग्न करायचं न कबूल केलं तरच तिच्या दागिन्यांचा प्रश्न येतो.

**खंडेरावः**—पण तो अजून वयांत यायला अवकाश आहे ना ?

( हातिसिंग व नीला येतात. )

**म्हाळसाः**—( स्वगत ) आणि गेले इतक्यांत परत कसे आले ?

**हातिसिंगः**—बाबासाहेब, आम्ही जायचा बेत केला होता खरा, पण फिरून वाटलं कीं असं पळून जाणं बरं नव्हे. वाटलं कीं तुमच्याकडं परत येऊन न्याय मागावा.

**खंडेरावः**—न्याय कशाबद्दल !

**नीला**:—आम्ही पळून जायचं म्हणजे माझ्या हक्काचे दागिने गमावून बसायचं. पण असं आम्हीं काय केलंय, करतो आहों, कीं या दागिन्याचा दंड द्यावा ?

**म्हाळसा**:—तर, तर. लंबोदरानं तुझ्याशीं लग्न करीत नाहीं म्हटलं तर दागिने तुझे.

**खंडेराव**:—असं कां ? हिच्याच तोंडून न्याय झाला. बरा लंबोदरहि जवळ आहे. लंबोदर ये पाहूं, बोल तुला ही नवरी हवी कां ?

**लंबोदर**:—(हंसून) पण बाबा, मी वयांत आलों आहे कां ?

**खंडेराव**:—होय, होय तूं वयांत आला आहेस. तूं हिच्या पहिल्या घरोब्याचा मुलगा. तिनं तुझं वय तीन वर्षें कमी सांगितलं. मलाहि वाटलं कीं तुला जरा वयाच्या मानानं ज्ञान कमी. तीन वर्षे गेलीं म्हणजे तेवढा मोठा आणि जाणताहि होशील. पण त्या कपटाचा ही असा दुरुपयोग करूं पहाते. तेव्हां आतां खरं तेंच करुं म्हणजे मी जाहीर सांगतो कीं तूं वयांत येऊन तीन महिने झाले आहेत.

**लंबोदर**:—( आनंदानं टाळी वाजवून, उडी मारून ) तर मग काय बाबा मी वयांत आलों ? ( आपलं अंग चांचपून पहातो ) अरे होय कीं मी वयांत आलों ! ए, आई ऐकलंस कां मी वयांत आलों ? आणि हा बघ मी वयांत आलाचा पहिलाच उपयोग काय करतो तो.

**म्हाळसा**:—तो काय बाबा करणार ? वाटतं की पोर मला दगा देणार.

**लंबोदर**:—हं ऐका तर सगळीं मंडळी. हा पहा मी लंबोदर. वयांत येऊन तीन महिने झालेला, जबाबदार माणूस. माझा मी धनी. शपथ घेऊन सांगतो कीं या निलिटलींशीं मला लग्न करायचं नाहीं. ती दुसऱ्या कुणा वाटेल त्याशीं लग्न करूं दे, नाहींतर हात धरून जाऊं दे. मी ब्रम्हचारी आहे आणि हा असाच सरळसोट ब्रम्हचारी रहाणार ! कुणा लेकाला हवी बायको ? उगाच डोक्यावर बसायची ! आपला माझा मी एकटा आहे तो बरा आहे. मग आतां झाले कीं नाहीं दागिने नीलीचे ?

**सर चिंतामणः**—शाबास! गडी उमदा आहे खरा.

**हातिसिंगः**— गड्या किती तरी उपकार झाले तुझे.

**म्हाळसाः**—अरे, मेल्या चांडाळा, पोटी पोर आलं पण त्यांनीं माझी अशी फजिती केली कीं!

**मुरलीधरः**—हातिसिंग, तुझं मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. (मंजुळेकडे पाहून) आतां आमचंच काय होईल तें पाहायचं. कां? येतंय कां कांहीं मनांत सौंदर्यदेवीच्या? सोडा आतां राग मनांत काय असेल तो. क्षमा करा. सगळे अपराध पोटांत घाला आणि (हंसून) मला आपला म्हणा, दुसरं काय?

**हातिसिंगः**—मंजुळाबाई, आपण केल्या त्या सगळ्या युक्त्या प्रयुक्त्या आमच्याही लक्ष्यांत आल्या. मासे पकडणारा कोळी देखील इतक्या सफाईनं जाळं टाकीत नाहीं. तुम्हां दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे हें नवं कळायचं, नवं बोलायचं काय राहिलं आहे! मग आतां पडूं द्या आमच्या आनंदांत तुमच्या आनंदाची भर.

**खंडेरावः**—काय दोस्त, माझ्या बोलण्यावरून नागपुराहून यायचे श्रम घेतलेस त्याचं फळ मिळालं कीं नाहीं? तुमचा आमचा ऋणानुबंध आतां कायम झाला. अहो जांवईबोवा! आतां तरी भीड लाज सोडून सरळ वागायला शिका.

**सर चिंतामणः**—(मुरलीधरास) आणि त्यांतून तुझ्या अंगीं कांहीं खोडी राहिली तर मलाहि पण अशी सून मिळाली आहे वस्ताद कीं ती सारी खोड काढून टाकील. असो. झालं तें सगळं चांगलंच झालं. अशा गमती, गफलती, गैरसमजुती फजिती तरुण मुलांमुलींच्या जीवनांतच व्हावयाच्या. आणि आमचं सुख येवढंच कीं त्यांचा गोड शेवट आम्ही म्हाताऱ्यांनीं पाहायचा.

**खंडेरावः**—हं, या तर पुढें आतां दोघं. कन्यादान करण्याचा अधिकार माझा आहे. तेवढे घालू दे तुम्हां दोघांचे हात एकमेकांच्या हातांत. येवढीशी एक रात्र पण त्यांत किती घोंटाळे आणि गमती झाल्या. पण आतां उद्यां सगळा दिवस मोकळा आहे. घरीं मेजवानी करूं. आणि या आनंदाकरितां गांवजेवणाची समाराधनाहि घालणार आहे मी.

—समाप्त—

सुनन्दा प्रकाशन

पुष्प २ रें

*

*

'फुले-भालेकर-लोखंडे'

लेः—प्रा गं. बा. सरदार

**सुनन्दा प्रकाशन**

१९८।७ सदाशिव, पुणें २.

*

*

**—पुढील आकर्षणें:—**

*

- श्रीधर-काव्यविवेचन
- Classification of Books
- फुले-भालेकर-लोखंडे
- नव्या जगाचे निर्माते
- विज्ञानाच्या जगांत
- रामजोशी : चरित्र : विवेचन
- वैष्णव-जन ( नाटक )

*